साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास ........................८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........८१ ०६
दुसरे खेपेस .... .......८१

Six monthly......... 3 ............... 8 as
Single copy ............................ 4 as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ...... 4 as
Repetition Peline......3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXI — AKOLA MONDAY 8 NOVEMBER 1897 — NO 43

वर्ष ३१ — आकोला सोमवार तारिख ८ माहे नोवेंबर सन १८९७ इ० — अंक ४३

### जाहिरात

सर्वत्र भाईबंद व एवं इतर लोक यांसः- खाली सही करणार याजकडून असें कळविलें जाते कीं, मी तारिख १९।४।९७ इ० रोजीं दत्तका संबंधानें बाळकृष्ण देवराव बोंडगावकर व इतर सर्वत्र मंडळी यांस नोटीस वऱ्हाडसमाचारातून दिली होती त्याचा जबाब ता० ३।५।९७ चें वऱ्हाडसमाचार पत्रांत बाळकृष्ण देवराव यानीं दिला कीं हल्लीं सिंहस्थ आहे पुढें विचार पाहूं तर आतां सिंहस्थ निवृत्त सरासरी दोन महिनें होत आले आहेत तरी अद्यापपर्यंत कांहीं खुलासा केला नाहीं माझा तर आतां फार वृद्धापकाल झाला आहे या मुळें मला हे करणें अगदीं अगत्य आहे करितां फिरून आतां सर्वत्रांस जाहिर केले आहे तर जाहिरात प्रसिद्ध झाल्या बरोबर दोन दिवसाचे आंत काय तो अखेरचा जबाब द्यावा नाहीं तर आह्मी तारील १३।५।९७ इ. चे नोटीशी प्रमाणें सर्व तजवीज करित आहों कळावें तारिख ४।११।९७ इसवी.

सही
चिमणाजी नारायण कुळकर्णी कदमापूर दस्तूर खुद.

---

### नोटीस

रा. रा. बाळकृष्ण देवराव कुळकर्णी बोंडगांवकर यास नोटिशीनें कळविणार चिमणाजी नारायण कुळकर्णी कदमापूर यान कडून असे कळविलें जातें कीं, तुह्मास आह्मी तारिख १९।४।९७ इसवीचे वऱ्हाडसमाचार पत्रांतून दत्तक घेण्याचे संबंधानें नोटीस दिली. त्याचा जबाब तुह्मी तारीख ३।५।९७ इसवीचे वऱ्हाडसमाचार पत्रांतून दिला तो लिहिलेंप्रमाणें, (सालमजकुरी सिंहस्थ चार महिनें राहिला आहे तो निघाल्या नंतर याजबद्दल विचार केला जाईल मात्र आमचे परवानगी शिवाय तुह्मांस कांहीं हालचाल करिता येणार नाहीं केल्यास भाऊबंदकीच्या संबंधानें उत्पन्ना बद्दल तुमच्या अशा करण्यानें आमचें नुकसान होईल त्याजबद्दल जबाबदार धरले जाईल.) अशा प्रकारचे उत्तर आह्मांस तुह्मापासून मिळाले. आतां आमचा दत्तक घेण्याचा विचार यापूर्वी तारीख १३ एप्रिल सन ९७ इ० रोजीं नोटिशीनें कळविला आहे. तर आपण तारीख ३।५।९७ इ० चें उत्तरामध्यें सिंहस्थाचा प्रतिबंध कळविला होता. त्यास सिंहस्थ जाऊन कन्यागत सुरूं होऊन अजमासे दोन महिने झाले आज पावतों आपलेकडून दत्तका बद्दलचें काहींच उत्तर समजलें नाहीं. आह्मास तर त्वरा आहे तर ही नोटीस पावल्यापासून चार दिवसाचे आंत कायते शेवटचें उत्तर कळवावें. असें जाले नाहीं तर मी यापूर्वी कळविल्या प्रमाणें दत्तकाबद्दल ची व्यवस्था करीन कळावें ता० ४।११।९७

( सही )
चिमणाजी नारायण कुळकर्णी
कदमापूर.

---

### नोटीस

नोटीस तिमाजी नागोजी खडसे व मोतीराम केसोजी खडसे दुकान मौजे महमदपूर प्रगणे नांद्रे यानी नोटीस देणार अनंदा वल्लद चांगोजी इंगळे दुकान नांदुरा बुजरूख नोटीस देतो कीं तुमचा बाप माझा सासरा केसोबा उमाजी खडसे नांद्रेकर हे मयत होण्यास सुमारे बरेंच दिवस झाले असोन त्यानीं काशियात्रेहून आल्यावर त्याना आपला मरणकाळ समीप आला असें वाटून मरणाचें पूर्वी त्यांनीं दोन तीन बोलावणें पाठविलें त्यांचे बोलावण्याचा मजकूर कांहीं कांहीं सभ्य गृहस्थांनींही ऐकिला आहे व त्यानीं आपले हातानें खात्याचे बाकीसुद्धां दाखला दिलेला आहे. त्या दिवसापासून आपल्यास पुष्कळवेळां आपसांत आमचा डागीना मागितला परंतु आपली उभयतांची देण्याची नियत दिसत नाहीं त्यालाही बराच वेळ लोटत चालला आहे. अखेर तुमच्या बेमानीच्या वार्ता कानीं ऐकूं येत आहेत तुमच्या मनांत आपसांत तंटा वाढविण्याचा व बेमानीचा इरादा झाला आहे ह्यातान्यानें दत्त केलेला डागीना माझे बायकोचा ( आमचे घरचा ) सोन्याचा चितांग २, कड १, हस १ असे अजमासे ताळे ३८ चा नोटीस दिल्यापासून आठ दिवसाचे आंत आणून द्यावे नाहींपेक्षां रीतिप्रमाणें तजवीज करण्याचा प्रसंग आणावा लागेल. कळावें ता. २६।१०।९७.

( सही ) आनंदा चांगोजी इंगळे
नांदुरा दस्तुर खुद

---

### नोटीस

सारजी मर्द पांडू व देवलाजी अगि बजी मर्द देवलाजी गव्हाणकर राहणार वरवट तालुके जळगांव यांस—

पांडु वलद भोनाजी हादरकर राहणार बावनबीर तालुके जळगांव याजकडून देण्यांत येते कीं सारजी ही माझे लग्नाची बायको असून वयातींत आहे. तिचा बाप देवलाजी व आई बजी यांचें येथें थोडे दिवसांनीं परत येईन ह्मणून अंदाज चवदा महिन्यापासून गेली. तिला आणण्यासाठीं चार पांच वेळां गेलों असतां ती आपले आईबापाचे भरीनें आली नाहीं. हल्लीं असेंही ऐकतों कीं ती गंधर्व लावणार आहे या साठीं वरील तिघांस व सर्व लोकांस कळवितों कीं ही नोटीस पावल्यापासून चार दिवसांत सारजी इनें माझे येथें नांदण्यास यावें व देवलाजी आणि बजीनें तीस पाठवावें तिचें बरोबर कोणी गंधर्व लावूं नये या विरूद्ध वर्तन केल्यास कायदेशीर तजवीज होईल व मी कोणतेच जबाबदारीस पात्र होणार नाहीं या साठीं नोटीशीनें सर्वांस कळवीत आहे. कळावें ता. १।११।९७.

निशाणी पांडू वल्लद भोनाजी

---

### LORD ULLIN'S DAUGHTER

A Chieftan to the Highlands bound
Cries ' Boatman, do not tarry!
And I'll give thee a silver pound
To row us o'er the ferry!'

' Now who be ye, would cross Lochgyle
This dark and stormy water?'
' O I'm the chief of Ulva's isle,
And this, Lord Ullin's daughter.

' And fast before her father's men
Three days we've fled together,
For should he find us in the glen,
My blood would stain the heather.

' His horsemen hard behind us ride—
Should they our steps discover,
Then who will cheer my bonny bride
When they have slain her lover?'

Out spoke the hardy Highland wight
' I'll go, my chief, I'm ready:
It is not for your silver bright,
But for your winsome lady:—

' And by my word! the bonny bird
In danger shall not tarry;
So though the waves are raging white
I'll row you o'er the ferry.'

By this the storm grew loud apace,
The water-wraith was shrieking,
And in the scowl of heaven each face
Grew dark as they were speaking.

But still as wilder blew the wind
And as the night grew drearer,
Adown the glen rode armed men,
Their trampling sounded nearer.

' O haste thee, haste!' the lady cries,
' Though tempests round us gather;
I'll meet the raging of the skies,
But not an angry father.'

The boat has left a stormy land,
A stormy sea before her—
When, O! too strong for human hand
The tempest gather'd o'er her.

And still they row'd amidst the roar
Of waters fast prevailing:
Lord Ullin reach'd that fatal shore,—
His wrath was changed to wailing.

For, sore dismay'd, through storm and shade
His child he did discover:—
One lovely hand she stretch'd for aid,
And one was round her lover.

' Come back! come back!' he cried in grief,
' Across this stormy water:
And I'll forgive your Highland chief,
My daughter!—O my daughter!

' Twas vain: the loud waves lash'd the shore,
Return or aid preventing:
The waters wild went o'er his child,
And he was left lamenting.

*T. Compbell.*

---

### संग कन्या

चपल-तुरग-पृष्ठीं बैसुनी शीघ्र आला
वरतनु-सह मानी जातसे स्वापुराला।
' कनक कट तुला घे नाव काढी जलांत
' लवकरि पर तीरा नाविका! ने क्षणांत ' ॥ १ ॥

' जलद मुसल-धारा वर्षती; चंड वारे
' सुटति; दश दिशाही व्याप्त या अंधकारें
कवण तरु पहासी चंद्र-कासार-वारीं '
' उलव नृपति मी-हे संगराणा कुमारि ' ॥ २ ॥

' सुतनु मजसवें हे धांवते तीन राती।
झटति चरहि त्याचे आमुच्या पाठि येती॥
परम कुपित राणा संगतीं या आह्माला।
निरखुनि मम रक्तें रंगवील स्थलीला॥ ३॥
निकट सुभट आतां पातला राजयाचा।
पथहि गवसतां ह्या आमुच्या या दरीचा॥
प्रथम सुतनुचा या कांत हा ठार होई।
मग कवण सखीला शांतवी तूंच पाही ॥४॥'
वचन विशद तेव्हां बोलिला मर्द तो हें।
' तरि मन परतीरा जावया सज्ज आहे॥
कनक-कट-मनीषा या क्षणीं अल्प नाहीं।
परि सुतनु भयार्ता देखवेना मला ही ॥ ५ ॥
उसळाति लहरी या फेनशुभ्रा जलांत।
तरि पर तट तुह्मा दावितों मी क्षणांत॥
त्रिकट समय येतां राहणें कोमलांगी।
अनुचित मज वाटे फार ही याच जागीं ॥ ६ ॥
प्रळय पवन वाहे या परी बोलती तों।
श्रवण-कटु-निनाद क्षुब्ध वार्दी उठे तो॥
भय विगलित धैर्यें बोलती सर्व तेव्हां।
यमसम विकराल क्रुद्ध तें व्योम जेव्हां॥ ७॥
प्रबल पवन घोंघो घोर निस्वान वाहे।
निबिड तर तमीं त्या व्याप्त होता निशा हे॥
निकट हय खुरांचा शद्ब हा स्पष्ट होतो।
नृपचर दरिमाजी ( अन्य हें विघ्न ) ये तो ॥ ८ ।
वरतनु वदली तैं ' पोतवाहो! त्वरा रे
निबिड तिमिर वाढो चंड वाहोत सारे
खचित मज सुखाचा वास या वात डोहीं
कुपित-जनक-वक्त्रा पाहणें शक्य नाहीं ॥ ९ ॥

पवन हत महीला सोडुनीया तरी ते
पवन हत जलीं त्या निर्भया शीघ्र जाते।
विधि पुढति नराचा पाड तो काय त्याचा
झटिति झटिति वाढे क्षोभ त्या मारुताचा ॥१४॥

अमित-लहरि- संघीं चालली शीघ्र नाव
उदक पवन युद्धीं कोठली तीस वाव।
कठिण गति दिसे तों पातला संग राणा
त्याजि निरखुनि कोपा- होई उद्विग्न जाणा ॥ ११ ॥

सचर निराखि राणी दूरतः स्वात्मजाते
पवनहत जलीं त्या क्षुब्ध वाहोनि जाते।
दयित कटि करानें घट्ट एक्या धरोनि
पसरि कर दुजा तो चारु लावण्य खाणी ॥१२
' परत परत कन्ये! ' आरडे तप्त चित्तें

नृपति जर्यि असा हा मांडिला खेळ वातें !
' उलव नृपति देतो कांत कन्ये ! तुला गें !
सरसिज नयने ! गे ! लाडके आत्मजे गे !
॥१३॥

विफल सकल आशा वीचि कल्लोळ माते
फिरूनि परत येणें सर्वहि व्यर्थ होतें !
शशि-सर- जल-मध्यें तत्सुता मग्न जाणा
निरखित तर्यि ठाके स्तब्ध सोद्विग्न राणा
॥ १४ ॥

---

## वऱ्हाडसमाचार

मिती कार्तिक शुद्ध १९ शके १८१९

---

राव बहादूर सीताराम विश्वनाथ पटवर्धन यांनीं शिक्षणपद्धती संबंधानें शाळाखात्यांतील शिक्षकांची परीक्षा घेण्याची योजना केली आहे. या नवीन प्रकारची परीक्षा उमरावती व आकोला येथील हायस्कुलांतील असिस्टंट शिक्षकांची यंदा घेण्यांत आली. ही परीक्षा इतर खात्यांतील परीक्षा प्रमाणें आहे आणि तिच्या उपयुक्ततेच्या मानानें ही सर्व शिक्षकांस लागूं करण्यांत यावी असा कित्येक विद्वानांचा समज आहे. या परीक्षेविषयीं कांहीं गृहस्थें आक्षेप घेतात पण ते आक्षेप काय आहेत व त्याला आधारभूत कारणें कोणतीं हें कोठेपर्यंत अनिर्दिष्ट व मोघम आक्षेपांचा विचार न करणें हाच उत्तम मार्ग होय. येत्या कान्फरन्सच्या वेळीं उमरावतीस या विषयासंबंधानें कांहीं खल होईल असा कित्येकांचा ग्रह होता पण तो चुकीचा आहे कांकीं रावबहादूर पटवर्धन यांनीं आपल्या अनुभवावरून जी शाळा खात्याची परीक्षा सुरूं केली आहे तिच्या बरेंवाईटपणा बद्दल त्यांच्या हाताखालील लोकांस अभिप्राय देण्याचा अधिकार पोचत नाहीं. सांप्रत हायस्कुलांस जी परीक्षा लागू केली आहे ती आंग्लोव्हर्नाक्युलर शाळांतील शिक्षकांसही लागूं करण्यांत येईल तर अशी परीक्षा अनेक रीतीनें लाभकारक होईल. ट्रेनिंग कालेजाच्या मुशींतून जे शिक्षक निघाले नाहींत त्यांचा सहवास खानगी अध्ययनानें चालूं काळीं राजमान्य ठरलेल्या शिक्षणपद्धतीशी घडेल तर तो फार हितकर होईल. असा सहवास परीक्षेसारख्या एखाद्या ससेमिऱ्या शिवाय चांगलासा घडत नाहीं असा अनुभव विद्यार्थिदशेंतुन पार पडलेल्या शिक्षकांपैकीं शेंकडा ९० जणां संबंधानें आहे. परीक्षेचें दीव्य मनुष्याला कसोटीला लावतें आणि कोणत्याही विषयाचा व्यासंग एकाग्रतेनें होतो. रावबहादूर पटवर्धन यांची ही नवी योजना आमच्या प्रमाणें पुष्कळांस पसंत होईल असें वाटतें.

---

यंदा प्लेगमुळे काय काय अनर्थ ओढवतील याचा नेम नाहीं. मुंबईस या आजाराचा प्रसार थोडा कमी आहे पण पुण्यास, सोलापुरास, आणि तसेंच खालीं दक्षिण भागात मोठा कहर उसळला आहे. पटकी बरी पण ही पटकीची थोरली आकाबाई मृत्यूची रामबाण गोळी आहे. दक्षिणेंत कुटुंबे उध्वस्त झालीं, आणि हत्तीच्या पायाखालीं मुंग्या चिरडल्या जातात त्या प्रमाणें मनुष्यें या आजारानें पटापट मरत आहेत. हा आजार उम्दवला ह्मणजे त्याचा संसर्ग अन्य जनांस होऊं नये ह्मणून मरणाऱ्याला मरूं द्यावा पण अवशिष्ट लोकांचा प्राण राखावा असा विचार मनांत येतो. मरणकालीं कोण समीप राहील व शुश्रुषा कोण करील हा विचारच कोणी मनांत घेत नाहीं. आलें बोलावणें कीं तत्परतेनें व त्वरपणानें जाण्याची तयारी होती! मरणें अगदीं सोपें झालें आहे. आयुष्य खरोखरच क्षणिक आहे असें हरघडी निदर्शनास येतें. प्लेगमुळें मनुष्याचा प्रवास रेलवेनें किंवा आगबोटीनें मोठा धोक्याचा झाला आहे. गुजराथ, पंजाब, वायव्यप्रांत इत्यादि भागाकडील ठिकठिकाणीं प्लेगचा आजार सुरूं आहे. या आजाराचा प्रसार मोठ्या चमत्कारिक रितीनें होत आहे. एक वेळ या रोगाचें उद्बीज पेरलें गेलें ह्मणजे मग याच्या सारखा प्राणहारक दुसरा रोग पूर्वीं कधीं दृष्टीस पडला नाहीं असा अनुभव येतो. ईश्वरी नेमानेम चुकत नाहीं तरी मनुष्यानें या रोगाच्या प्रतिबंधा साठीं प्रयानशील असावें. हीच गोष्ट माणसाची हातची आहे. सर्व रोगांला मारक शस्त्र ह्मणजे स्वच्छता होय. तेव्हां स्वच्छते विषयीं सर्वांनीं जपावें. मुख्य स्वच्छता जागे संबंधानें ठेविली पाहिजे. पाणी जमिनींत मुरूं न देण्याविषयीं काळजी घेतली पाहिजे. घाणीचें पाणी उत्तम रितीनें घरा बाहेर लावून देता येईल तितकें बरें! पिण्याचें पाणी स्वच्छ ठेवण्याविषयीं खबरदारी विशेष घेत जावी. कपडालत्ता जाडा भरडा असला तरी चालेल पण तो स्वच्छ असलाच पाहिजे. स्वच्छता कसकशी ठेवावी हें कळविण्याची जरूरीच नाहीं. स्वच्छतेचा धर्मच असा आहे कीं स्वच्छता स्वच्छतेला आपोआप वृद्धींगत करिते. स्वच्छते विषयीं काळजी घेण्यासाठीं उपदेश नको हें खरे परंतु अस्वच्छता सर्वत्र अतिशय नांदते ह्मणून आह्मी आमच्या प्रांतस्थ लोकांस स्वच्छता राखण्या विषयीं विनंती करीत आहों. प्रांतिक सरकार या प्रांतीं प्लेगचा आजार येऊं नये ह्मणून मोठ्या दक्षतेनें व्यवस्था करीतच आहे पण प्रजाजनांनीं ही सरकारच्या कृतीचें अभिनंदन करून स्वकीय व स्वावलंबी स्वच्छता चांगली राखून आपल्या शेजाऱ्या पाजाऱ्यांस व सरकारास सुख द्यावें हा विहित मार्ग होय.

---

## राष्ट्रीय सभा

प्लेग, दुष्काळ, धरणीकंप, वादळें इत्यादि ईश्वरी क्षोभाचीं लक्षणें लोकांच्या डोळ्यासमोर उभीं आहेत तेव्हां अशा आपत्तींच्या वर्षीं राष्ट्रीय सभा भरावी किंवा वर्षभर तहकूब ठेवावी अशा विषयीं प्रश्न सहजच निघाला प्लेगविषयक नियमांनीं हा प्रश्न मोठा नाजूक झाला आहे. राष्ट्रीय सभेला येणाऱ्या प्रतिनिधी व प्रेक्षक मंडळीला कारंटाईनचे नियम लागूं केले किंवा प्रांतिक सरकारानें सभा भरविण्या विषयीं मनाई केली तर काय उपाय करावा अशाबद्दल विवंचना पडली होती. पण या प्रश्नाचा निकाल चांगला समाधानकारक व निश्चयात्मक झाला हें कळविण्यास मोठा आनंद वाटतो. अलिशान रेसिडेंट मि० ल्यौडन व कमिशनर मि० बुलक यांनीं मोठ्या कृपेनें असा ठराव केला आहे कीं राष्ट्रीय सभा उमरावतीस भरण्या संबंधानें सरकाराची कांहीं हरकत नाहीं पण प्लेगच्या आजारानें जे गांव ग्रस्त आहेत तेथून येणाऱ्या प्रतिनिधींस व प्रेक्षकांस कारंटाइनमध्यें पहिली हाजिरी सात आठ दिवसांच्या मुदतीची द्यावी लागेल आणि आणि नंतर त्यांस राष्ट्रीय सभेला जाण्यास परवानगी मिळेल. कारंटाईनचीं स्टेशनें, तेथील वास्तव्याची मुदत, प्लेगग्रस्त गांवाची यादी इत्यादि गोष्टींची माहिती मागाहून प्रसिद्ध होणार आहे.

पहिली गोष्ट पक्की ठाम ठरली आहे ती ही कीं सन १८९७ सालची १३ वी राष्ट्रीय सभा उमरावतीस नियमित वेळीं पूर्वसंकेता प्रमाणें भरविण्यांत येईल. वरील प्लेग संबधी व्यवस्थेनें प्रतिनिधी व प्रेक्षक यांची संख्या प्लेगग्रस्त भागांतून फार थोडी येईल ही गोष्ट ध्यानांत घेऊनच पहिली गोष्ट मुक्रर करण्यांत आली आहे. यंदाचें वर्ष राजकीय प्रकरणांत देखील अश्रुतपूर्व आहे पुष्कळ महत्वाच्या विषया संबंधानें राष्ट्रीय सभेनें आपली मतें दर्शविणें अगत्याचें झालें आहे. राजकीय कारणामुळेंच राष्ट्रीय सभा भरविणें भाग आहे. हीं कारणें निर्दिष्ट करण्यापेक्षां गेल्या वर्षांत घडलेल्या गोष्टींच्या मानसिक सिंहावलोकनानें आपोआप लक्ष्यांत येतील. त्या शिवाय राष्ट्रीय सभे सारख्या उपयुक्त संस्थेच्या स्थैर्यसाठीं व चिरकालीनत्वासाठीं तरी ही सभा तहकूब ठेवितांच येत नाहीं. बारा वर्षे सतत चालविलेल्या राष्ट्रीय संस्थेची उपयुक्तता तिच्या वार्षिक समारंभांत खळ पडल्यानें पुष्कळ कमी होणार आहे प्रयत्नाचें सातत्य यशश्रीला संपादन करितें आणि ही गोष्ट राष्ट्रीय संस्थांस अत्यंत लागू पडते. दरसालचा समारंभ होण्याला किती परिश्रम लागतात व केवढा प्रचंड धनव्यय होता हें लक्ष्यांत घेतलें ह्मणजे बारा वर्षे संकलित केलेली राजकीय पुण्यराशी आह्मांस तशीच राहूं येतां येत नाहीं. सालोसाल या संचयांत नवीन भर घातली पाहिजे. शस्त्र जसें उपयोगानें सतेज राहते तसेंच सार्वजनिक सभा संबंधानें आहे. वार्षिक अभिवर्धनात्मक संस्कार त्या संस्थेच्या कार्यमालेला उजळा देतो आणि ती संस्था सर्व प्रकारच्या श्रीनीं पुष्यमान व वर्धमान होते. राष्ट्रीय सभेच्या वार्षिक क्रमांत अणुरेणु इतकी देखील कमताई न होऊं देण्याविषयीं आपलें कर्तव्य आहे. आज पर्यंतच्या राष्ट्रीय उद्योगासाठीं विद्वान व श्रीमान लोकांनीं उदार आश्रय दिला व राष्ट्रसेवा उत्कृष्ठ बजाविली त्या बद्दल सर्व राष्ट्रभक्तांनीं आपली कृतज्ञता त्या राष्ट्रीय उद्योगाच्या अभिवर्धनानेंच व्यक्त केली पाहिजे. आपण ज्या राष्ट्रसेवेचा लाभ उपभोगीत आहों त्या बद्दलचे आपलें ऋण ही राष्ट्रीय सभा सतत चालूं ठेविल्यानेंच फिटणार आहें. सारांश, प्राण जावो अथवा राहो, पांडुरंगीं एकच भाव तुकारामांनीं ठेविला होता तद्वत् राष्ट्रीय सभेविषयीं एकनिष्ठेनें आपण कोणत्याही विघ्नाला न जुमानतां आपली कामगिरी बजावली पाहिजे. संकटसमयीं मनुष्य कसोटीला लागतो या प्रमाणें वऱ्हाडच्या लोकांस राष्ट्र सेवेविषयीं कसोटीला सध्यां लाविलें आहे. आह्मी आमच्या स्वागत मंडळींचें अभिनंदन करितों कीं त्यांनीं राष्ट्रीय सभा बरोबर योग्यवेळीं भरविण्याविषयीं दृढ संकल्प केला तो सर्व राष्ट्रास मान्य आहे. सत्कार्याचा महिमा विचित्र असतो आणि परमेश्वर कृपेनें सर्व विघ्नें दूर होतील व इतर प्रांतस्थ मंडळी आमच्या कृतीच्या पुष्टी करणार्थ पुष्कळजण एकत्र जमून सर्व जगास इंडियन राष्ट्रत्वाची ध्वजा दर्शवितील!

---

गेल्या २७ वे तारखेला येथील नेटिव जनरल लायब्ररींत रा. रा. सदाशिव विष्णु भागवत यानीं सामाजिक परिषदेच्या उपयुक्तत विषयीं व्याख्यान दिलें. राजश्री सदाशिवराव यांच्या भाषणांत गोडी व मोहकता विशेष असून श्रोत्यांस ते फार हंसवितात. त्यांनीं कळविलें कीं गेल्या ४० वर्षांत सामाजिक सुधारणा इतकी मोठी झाली आहे कीं इतर कोणत्याही राष्ट्रांचें उदाहरण तिच्या तोडीला देतां येणार नाहीं. पूर्वींचे मुनीवर्य व राजे सामाजिक कायदेकानू करीत असत परंतु इंग्रजी अंमलाखालीं राज्यकर्त्यांचा त्रयस्थपणा असल्यामुळें सामाजिक प्रकरणांत हल्लीं कोणी अडवता व दडपता नाहीं. सर्वत्र स्वतंत्रता आहे. सामाजिक सभेच्या हातून कामगिरी उत्तम न निभण्याला मुख्य कारणें कीं सभेच्या सूचना पुनर्विवाह, स्त्रीशिक्षण, हुंडानिषेध वगैरे विषया संबंधानें असून लोकांस मोठ्या दुष्कर वाटतात, मुख्य चालकांचें वर्तन यांच्या विचारांशीं विरोधी असतें, आणि वार्षिक रिपोर्टांतून ६० सामाजिक संस्थाविषयीं चपकेदार माहिती आल्यामुळें लोकास खऱ्या गाष्टी कळत नाहींत. त्या नंतर रा० रा० विष्णु मोरेश्वर महाजनी यांनीं अध्यक्ष या नात्यानें सामाजिक सुधारणे संबंधानें नामी उपदेश केला ते ह्मणाले कीं सामाजिक गोष्टींत अनास्था फार आहे व वीज आकाशातून पडली तरी आमची झोप जात नाहीं. तथापि नाउमेदीची गोष्ट सांगण्याची जरूरी नाहीं. सामाजिक सभेला १०।११ वर्षे झालीं तरी तीं समाजाच्या चलनाला फार थोडी वेळ आहे. पुष्कळ संस्थाची स्थिती अशीच आहे. संस्था उभारतांना जो पहिला हुरूप व दम असतो तो सारखा रहात नाहीं. शिथीलता उत्पन्न होते ही गोष्ट खरी तथापि समाजाची गती वर खालीं चक्राच्या गती प्रमाणें असतें. सध्यांचा काल वर येण्याच्या गतीचा आहे. विचाराचा काल लोटून आतां आचरणानें विचाराची दिशा दर्शविण्याचा काल प्राप्त आहे. तर प्रत्येकानें मनोमय साक्षीनें निदान स्वतांला शक्य असतील तेवढ्या गोष्टी तरी आपल्या विचारा प्रमाणें आचारांत आणण्या विषयीं प्रयत्न करावा असा मोठ्या कळकळीनें अ-

ध्यक्षांनीं उपदेश करून श्रोतृमंडळीस निरोप दिला.

The Berar Samachar

MONDAY NOVEMBER 8 1897

## INDIAN NATIONAL CONGRESS

There is a wild rumour started by some mischievous people that the Berar authorities have prohibited the Congress on the ground that its sitting at Amraoti will tend to import plague into this province by the advent of a large number of delegates and their servants. The rumour is we say mischievous both because it throws an imaginary obstacle in the way of a national and progressive movement like that of the Congress and also because it misrepresents the attitude of the authorities here. They are, in common with all the good and sensible people of the province, anxious to save it from the evil consequences of dire visitation which is devastating some of the best parts of the Bombay Presidency, but they are also aware that so long as trains are allowed to run and carry both passengers and goods, from the affected to the non-affected parts of India, the danger of the spread of the plague cannot be altogether and radically removed. Short of this drastic measure, is the expedient already adopted of establishing observation camps, quarantines &c. and increasing or decreasing their stringency according to local and other circumstances. This would, it is believed, answer the purpose reasonably well and acting on this view high officers of Government and leading members of the Congress cause, have already met, more than once, to exchange and compare notes and jointly concert measures to secure a practical immunity for the province from the plague. No distinction will be made between the delegates travelling to this province and other passengers. Those coming from the affected parts whether delegates or not will be subjected to a reasonably strict examination and quarantine if necessary while those coming from the non-affected tracts will pass under the milder safeguards prescribed. This is the truth of the matter and both public officers. and Congress leaders deserve to be congratulated on the wise solution of the difficulty.

We hasten to contradict the rumour su . as it is, be causeit would be a great pity, if, for some unforeseen cause, the sitting of the Congress is not held this year, because within the last twelve months events have happened, misapprehensions have arisen and misrepresentations have been made, in a manner which all good people among the rulers and the ruled deplore most sincerely and from the bottom of their heart. The Congress sitting will afford a much needed opportunity for the country to express its thoughts, plainly, truly and in a dispassionate manner so that those on whose shoulders rests the responsibility of the good administration of this vast empire, may feel their burden lightened and made easy to bear, by melting away the mists of misunderstandings, and misapprehensions which at present dim their way. If even, the movement to secure a fair, & adequate representation of the views of the thirty and odd millions of people inhabiting this peninsula, was necessary, it is ten times more so now, and we most sincerely trust, that in the wise and all seeing providence, the sitting of the Congress will not only be permitted but rendered as successful as, if not more than, the sittings, held elsewhere in India.

## वऱ्हाड

हवामान—थंडी चांगली पडूं लागली. हवा निरोगी असून आरोग्यवर्धक आहे पिकें साधारणपणें बरीं आहेत पाऊस एकंदरीनें कमी झाल्यामुळें पिण्याच्या पाण्याचा पुरवठा प्रांतभर फार कमी आहे. धान्याचे भाव मंदीवर अद्याप येत नाहींत.

अलिशान रेसिडेंट मि. टी. सी. प्लौडन यांची स्वारी हैद्राबादेहून बदलली जाणार असून निजाम सरकारचे दिवाण देखील बदलले जाणार आहेत असें लोक बोलतात. मि. प्लौडन यांच्या जागीं सर व्रुिल्यम कर्निंगहाम हे इंडिया सरकारच्या आफिसांतून येणार आहेत.

निजाम सरकार खुद्द राज्यव्यवस्थे विषयीं काम पाहत आहेत. गेल्या शनिवारीं सर अस्मनजहा व दिवाण साहेब वगैरे मंडळीस मि. प्लौडन मेजवानी देणार होते. यंदा नोव्हेंबरच्या अखेरीला मि. प्लौडन साहेब बाहेर फिरण्यास निघणार असून कांग्रेसच्या सुमाराला वऱ्हाडांत येतिल असा रंग दिसतो.

गेल्या मंगळवारीं आकोल्यास पुन्हा सेशन कचेरी भरूं लागली. शनिवारीं आकोल्याची कचेरी बरखास्त झाली. खालील सेशन खटल्यांचा निकाल झालाः—

(अ) मेहकर येथील रामेश्वर नांवाच्या मारवाड्याच्या मुलाचा खून केल्याबद्दल रहिमखा व अमीरखा या दोघावर खटला चालून अखेरिला १७।१८ वर्षांच्या रहिमखाला फांशीची शिक्षा सांगण्यांत आली; व अमीरखा निर्दोषी ठरला. अल्प किंमतीच्या दागिन्यासाठीं मुलाचा खून मोठ्या भयंकर रीतीनें व हातपाय वगैरे अवयव निरनिराळे तोडून करण्यांत आला.

( ब ) पांगरखेड तालुके वाशिम येथें डाका घालणारे मोंगलाईत हद्दींतील आठ इसम होते. त्यांची चौकशी होऊन नऱ्ह्या, विक्रम्या, पिऱ्या, सरदारखा वगैरे पांच इसमांस काळेपाण्याची शिक्षा झाली आणि तीन आरोपी दोषमुक्त झाले.

( क ) मौजे चिखला तालुका चिखली येथील साळूबाई नांवाच्या एका वृद्ध बाईचा खून तिच्या नातलगा पैकीं शामा नांवाच्या धटिंगणानें निव्वळ अल्पस्वल्प दागिन्यासाठीं चाकूनें मान कापून केला. त्याला फांशीची शिक्षा सुनावली.

वाशिम जिल्ह्यांत दरसाल भरत असलेली नागरदासची जत्रा यंदा न भरूं देण्या विषयीं सरकारी हुकूम प्रसिद्ध झाला आहे. यात्रेकरूंनीं ही मनाई ध्यानांत घ्यावी आणि वृथा यात्रेचे श्रम घेऊं नयेत,

मि० आर. डी. हेअर साहेब यांनीं गेल्या गुरुवारीं आपल्या कामाचा चार्ज पूर्व संकेता प्रमाणें मि० प्रीडो साहेब यांस दिला आणि दुसरे दिवशीं साहेब बहादूर इनस्पेक्टर जनरल कामाचा चार्ज घेण्यासाठीं उमरावतीस गेले.

पंडित सुरज नारायण असि० कमिशनर वर्ग १ हे बुलढाण्यास गेल्या १ ले तारखेस येऊन दाखल झाले. आतां मि० माणिकशा रतनजी दस्तुर एक्स्ट्रा असि कमिशनर हे लवकरच हैदराबादेस रवाना होतील. हैदराबादेस त्यांस आसिस्टंट कमिशनरच्या दर्ज्यामध्यें बढती मिळेल असा सार्वत्रिक समज आहे.

रा. रा. रघुनाथ बळवंत टिपनीस क्लार्क आफ कोर्ट, सेशन कचेरी, हे गेल्या २३ वे तारखें पासून अडीच महिन्यांच्या हक्काच्या रजेवर गेले असून सध्यां क्लार्क आफ कोर्ट रा. रा. बळवंत यादव खोलकुटे बी. ए. हेच आहेत.

गेल्या ३० वे तारखेस मलकापूरास नवीन बांधलेल्या रमणीय लायब्ररीचा प्रवेश समारंभ क्याप्टन कोलंब यांच्या हातून झाला लायब्ररीच्या सार्वजनिक कार्याला बहुत गृहस्थांनीं उदार आश्रय दिला पण मुख्यत्वें करून रा. रा. विष्णु सावजी या तरुण विद्याभिलाषी उदार गृहस्थानें मोठी श्रेयस्कर मदत दिली. समारंभही फार वर्णनीय झाला.

क्या० आर. पी. कोलंब आफिशिएटींग डिपुटी कमिशनर, बुलढाणा यांस कायमची डिपुटी कमिशनरची जागा मिळाल्याचें आनंदकारक वर्तमान आलें आहे सोहेब बहादुरांनीं गेल्या दुष्काळांत मनस्वी परिश्रम घेऊन आपल्या जिल्ह्यांतील लोकांचे प्राण वांचविले ह्मणून गोरगरीब त्यांचें अभिनंदन मोठ्या आनंदानें करितील. आणखी सहा महिनें काम करून नंतर ते दोन वर्षांच्या च्या फर्लो रजेवर जाणार आहेत.

लेफ्टेनंट टी. सी. प्लौडन असि० कमिशनर बुलढाणा यांस येत्या ११ वे तारखेपासून १ महिना ३ दिवसांची हक्काची रजा मिळाली.

गेल्या आगस्ट महिन्यांत वऱ्हाडांत ९९७१ मनुष्यें जन्मलीं व २९८४९ मरण पावलीं. मरणाची संख्या फार मोठी आहे.

रा. रा कृष्णराव हरी कोल्हटकर एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर हे सध्यां रजेवर असून चिरंजीव राजश्री दत्तोपंत डाक्टर यांच्या पाशीं आकोल्यास आहेत. राजश्री दाजीसाहेब यांची प्रकृती समाधानकारक आहे पण चाकरीची दगदग नको ह्मणून त्यांनीं पेनशनीबद्दल अर्ज सादर केला आहे. हे जुन्या मंडळींपैकीं मनमिळाऊ व लोकप्रिय आफिसर आहेत.

रा. रा. त्रिम्बक गणेश परांजपे एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर, मलकापूर यांनीं आपले कामाचा चार्ज रा. रा. जी. सुब्रायलू नायडू एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर यांस गेल्या बुधवारीं दिला. ते तीन महिन्यांच्या रजेवर जाणार असल्यामुळें त्यांच्या सन्मानार्थ पानसुपारी व मेजवानी देण्यांत आली होती.

मि. लुकस साहेब डिपुटी कमिशनर, उमरावती यांनीं आपले कामाचा चार्ज क्याप्टन हार्सबरो साहेबांस दिला व ते रजेवर रवाना झाले.

खान बहादूर शमसुद्दीन अलीखान डिपुटी कमिशनर वर्ग ३ यांची रजा संपल्यानंतर गेल्या आगष्टच्या पहिले तारखे पासून त्यांनीं पेनशन घेतली आणि त्यांच्या जागेच्या वर्गावर्गींत खालील बदल्या देण्यांत आल्याः—

| | बढती |
|---|---|
| क्याप्टन कोलंब | डिपुटी कमि. वर्ग ३ |
| क्याप्टन हार्सबरो | असि. कमि. वर्ग १ |
| मि. एफ. एल. क्राफर्ड असि. पोलीस सुपरिन-टेंडंट | असि. कमि. वर्ग ३ |

मि. फेअरवेदर असि. पोलीस सुपरिनटेंडंट यांची कवाईत व उर्दू या दोन विषयांत डिपार्टमेंटल परीक्षा उतरली.

गेल्या लोअर-हायरच्या परीक्षेत मि. किंग एक्स्ट्रा असि. कामिशनर यांची संपूर्ण हायर व रा. रा. रघुपती मोहनराव व लक्ष्मण रेणको डोळे यांचीं संपूर्ण लोअर परीक्षा मागील वर्षांच्या परीक्षांच्या एकुणांत घेऊन उतरली आहे. खालील अधिकाऱ्यांची परीक्षा विषयवारीनें जशी उतरली तशी दिली आहे:—

| मि० | विषय आणि लोअर किंवा हायर. |
|---|---|
| सय्यद मोईनुद्दीन खान असि० कमिशनर | मराठी. |
| कृष्णराव पुरुषोत्तम भट बी. ए एल. एल. बी. अक्टिंग तहशिलदार | आकौंट हा० |
| महमद अजिमुद्दीन, तहशिदार | क्रिमिनल, रेव्हिन्यु-लो० मराठी. |
| विश्वेश्वर सिंग तहशिलदार | आकौंट-लो० |
| गणेश वासुदेव निमकर क्लार्क आफ कोर्ट | आकौंट-हा० |
| दत्तात्रय अंबादास ना० तह० | रेव्हिन्यु-लो० |
| सय्यद अबदूल कादर ना० तह० | रेव्हीन्यु- लो० |
| शहा महमद इशाख ना० तह० | रेव्हीन्यु व आकौंट लो० मराठी. |

जी. बी. शिंद्रे आणि कंपनी यांनीं आपला देशी शाईचा कारखाना चांगला चालविला आहे. आपल्या कारखान्याच्या प्रसिद्धीसाठीं व गिऱ्हाइकांच्या उपयोगासाठीं एक सुबक १८९८ सालची रोजनिशी या कंपनीनें तयार केली आहे. तिच्या एका प्रतीचा आह्मी आभारपूर्वक स्वीकार करितो. १२ आणे किमतीची शाई घेणाऱ्यास एक रोजनिशी फुकट मिळते. रोजनिशीचि किंमत ४ आणे आहे.

आह्मास लिहिण्यास दुःख वाटते कीं, रा. रा. अमृतराव आबाजी कार्णीक यांस वार्धक्यामुळें किरकोळ आजाराच्या निमित्तानें काल दोन प्रहरीं देवाज्ञा झाली. गृहस्थ मोठा, बाणीदार, विद्वान व वेदशास्त्रसंपन्न असा होता. वाणी शुद्ध, गोड, व रसाळ अशी असे. वकिलीचा धंदा करीत असतांना यांस पैसा कःपदार्थ वाटत असे. ह्मातारपणी संसाराचा व्याप व ताप मोठा होता ह्मणून राजश्री काकासाहेब जेरिला आले होते. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.

## वर्तमानसार.

निजामसरकार व तिजोरी—तिजोरीची चोख व्यवस्था राहण्या करतां व मागील व्यवस्थे संबंधानें तपास चालविण्याकरतां निजामसरकारनें जें कमिशन बसविलें ह्मणून आह्मी मागें लिहिलें होतें त्या कमिशन मधून नवाब सर अस्मानजहा यांनीं आपला पाय बाहेर काढला आहे. कमिशननें आतां पर्यंत जो कांहीं तपास केला त्यावरून असें बाहेर आलें आहे ह्मणतात कीं हल्लींच्या दिवाण साहेबांची कारकिर्द बरीच हितावह अशी आहे. प्रत्येक बाबींत काटकसर केलेली दिसून येत आहे. नवाब अस्मानजहा यांच्या कारकिर्दींत मात्र खर्चाच्या बाबींत खरी खरी मोंगलाई चालली होती. त्यांच्याच वेळीं निरुपयोगी कामांत एक कोट रुपयांची रक्कम धुळीस मिळाली होती. मोंगलाई दरबारांतील हलवायाच्या घरावर ब्रह्मार्पण करून कर्णे ह्मणवून घेणारे अस्मानजहा यांचा हात लवकर राजकारभारांतून निघाला ह्मणूनच बरें झालें नाहींतर निजामसाहेबांच्या डोळ्यावरचा धूर कांहीं निघाला नसतां आणि मोंगलाईची आठवण ह्मणून राहिलेलें हैद्राबादी राज्यही लयास गेल्याचें ऐकावें लागले असतें. पण तूर्त तर ती भीति नाहींशी झाली ह्मणावयास कांहींच हरकत वाटत नाहीं. गु.

स्टांप आक्टाच्या दुरुस्तीचे बील ता. १५ रोजीं हिंदुस्थान सरकारच्या कौन्सला पुढें आलें आहे. त्यांत कांहीं कांहीं दस्तऐवज जास्त स्टांपड्यूटीस पात्र केले आहेत. नवीन सुधारणेंत दत्तविधानाचें कागदांस १० रुपयांचा स्टांप लागणार. निरंतरच्या भाडेचिठीस १० वर्षांच्या भाड्याचें रकमेचें मानानें आतां स्टांप लावावा लागेल; गहाण देण्यासाठीं दिलेल्या मुखत्यार पत्राला रकमेच्या मानानें स्टांप लागणार एक आण्याचें स्टांप लायसेन्स दाराशिवाय इतरांस विकतां येतील अशी सवलत देणार, आणि केवळ खरेदीचे किंमतीवर स्टांपड्युटी न घेतां त्यांत जे आणखी बोजे असतील, त्यांची किंमत आणून त्यावर स्टांपड्युटी आकारली जाईल अशाबद्दल नवीन बिलांत सुधारणा होत आहे. स० शो०

सुरत शहरांत तर सांथीनें महाप्रलय करून सोडला आहे.

पश्चिम आफ्रिकेकडील पेहों पर्जांच्या सशस्त्र लष्करीलोकांना आवरण्याचा लवकर प्रयत्न होणार नाहीं तर तेथलि बंडाव्यास भयंकर स्वरूप प्राप्त होईल असें पारिस येथलि पत्रें ह्मणत आहेत.

तुफानानें हानी—चितागांग येथें झालेल्या तुफानाच्या नवीन आलेल्या बातमीवरून असें कळते कीं, तुफानाच्या वेळीं नदींत ज्या यूरोपियन आगबोटी नांगरून ठेवल्या होत्या, त्यांचे साखळदांड तुटून गेले होते. बारा गावठी बोटी तर कोणीकडे वाहून गेल्या त्यांचा मुळींच पत्ता नाहीं. बंदरांत डोलकाठ्या, सिम्रलें वगैरेंचीही पुष्कळशीं नासाडी झाली. त्याचप्रमाणें कित्येक चहाचे बगीचे व भाताचीं शेतें यांचाही फडशा उडाला आहे. सध्यां नुकसानीच्या बाजाराचच तेजी आलेली आहे. गु०

हिंदुस्थानांतील लष्कराकरितां आस्ट्रेलियांतून घोडे आणण्यासाठीं हुकूम गेले असून तीन आगबोटी भरून घोडे इकडे येण्यासाठीं रवाना झाले आहेत. लवकरच आणखी चार आगबोटी तिकडून इकडे भरून पाठविण्यांत येणार आहेत. इतके घोडे त्या देशांतून आजपर्यंत कधींही मागविण्यांत आले नव्हते असें सिडनीमेल नांवाच्या पत्रावरून कळतें.

आज सोमवारी होणाऱ्या म्याट्रिक्युलेशनच्या परीक्षेकरितां वऱ्हाड प्रांताचे डायरेक्टर उमरावतीस व्यवस्था आपल्या नजरे खालीं करून घेत आहेत. हें एक नवीन ठिकाण यंदा नेमण्यांत आले आहे.

सरहद्दीवरच्या लोकाकरतां जनरल लोकहार्टकडून एक जाहीरनामा प्रसिद्ध करण्यांत आला व त्याविरुद्ध त्या लोकांनीं आतां तक्रार आणिली आहे. त्या मसुझे लोकांनीं त्या जाहिरनाम्याच्या विरुद्ध जो अर्ज केला आहे त्यांत ते ह्मणतात कीं, सरकार आह्मास पुढील तीन बाबतींत त्रास देत आहेः— ( १ ) आमचा मिठाचा पुरवठा बंद केला; ( २ ) सामाना येथील आमचा रस्ता आजपर्यंत राजानेंही बंद केला नसून कोणी काफर राजानेंही बंद केला नव्हता तो आतां सरकारानें आपल्या ताब्यांत घेतला; आणि ( ३ ) सरकारानें खैबरखिंड व खैबर प्रांत हीं आपल्या ताब्यांत घेतली. आमच्यावर जुलूम होणाऱ्या या तिन्ही बाबी सरकार सोडून देईल तर आह्मी शांततेनें राहण्यास तयार आहों.

सरकारानें प्लेगदूषित ठिकाणें कोणती त्याबद्दलची यादी सर्व खात्यांतील मुख्यें अधिकाऱ्यांकडे पाठविली आहे. ती ठिकाणें—कोकण—ठाणें जिल्हा—कल्याण, डहाणू, पायसर, वसई, कोन, पिंपळाम, कुलाबा जिल्हा—उरण, अष्टागर ( चेऊल ) रोहें, पनवेल, डेक्कन— पुणें जिल्हा— पुणें, खडकी, लोणावळें, तुंबरली, शिरूर, वळवण, घोरपडी, बोपोडी, बोपखेल, व तरोंवे खुर्द. अहमदनगर जिल्हा— अहमदनगर, पारनेर, नासिक जिल्हा— इगतपुरी, घोटी बुद्रूक. सोलापूर जिल्हा—सोलापूर. सातारा जिल्हा— कऱ्हाड कलढोण, तासगांव, चिंचणी, मसर, वाठार, कोरेगांव, पाडळी, ह्मसवड, दहिंवडी, भोपेगांव वगैरे ३७ ठिकाणें. दक्षिण महाराष्ट्र—मणेराजुरी. गुजराथ— सुरत जिल्हा—सुरत रांडेर, वलसार तालुका, पारडी. पालनपूर संस्थान—पालापूर. बडोदे संस्थान—नवसरी प्रांत, कच्छ संस्थान—गुंडीयाली, मसका, कोडाया, बेरापूर महापूर, नागलपूर वगैरे २० ठिकाणें. क०

धरणीकंपाविषयीं माहिती—थोडक्याच दिवसा मागे बंगाल व आसाम प्रांतांत जें भयंकर भूकंप झाले त्या संबंधानें ओमोरी नांवाच्या एका विद्वान जपानी डाक्टरानें कलकत्ता येथील एका वर्तमानपत्रांत आपलें असें मत प्रसिद्ध केलें आहे कीं, वरील प्रदेशांत पुन्हां धरणीकंप होणार नाहींत कारण धरणीकंप होण्याला कारण असणारी जी जमिनीच्या सपाटी खाली दलदलीत जागा असते ती धरणीकंप झाल्यानंतर अगदीं कठीण अशी होते, आणि त्यामुळें एकावर धरणीकंप झाल्या ठिकाणीं ९९९ हिशांनीं पुन्हां धरणीकंप होत नाहीं. हें खरें असेल तर वरील प्रदेशासंबंधी बरीच चिंता दूर झाली ह्मणावयाची.

☞ एक्स किरणांचा उपयोग क्षयरोगावर युरोपांत प्रशस्तपणें होऊं लागला आहे.

आस्ट्रेलियामध्यें कांहीं अरण्यें अशीं आहेत कीं त्यांतल्या झाडांस पान कसें तें मुळींच नाहीं!

हिंदुस्थानांत पारशी लोक ९०००० आहेत. आजपर्यंत अवघे ११ पारशी ख्रिस्ती झाले आहेत.

अंड्रे ह्या नांवाचे गृहस्थ विमानांत बसून उत्तरध्रुव प्रदेशाच्या शोधार्थ गेल्या जून महिन्याच्या अकराव्या तारखेस निघून गेले आहेत. अ.

राशियन सरकारानें चिनी हुषार मनुष्य ह्मणून काकेशश पर्वतांत चहाचे मळे करण्याची पद्धती तेथले लोकांना त्यांजकडून बरोबरपणें शिकविली आणि तिज प्रमाणें त्या लोकांनीं तेथें चहाचे बरेंच मळे तयार केले आहेत त्याचें उत्पन्न सुरेख झालें आहे.

मंगळूर जिल्हा दक्षिण कानडा येथलि सब्रह्मण्य देवस्थानांत दरवडा पडून चाळीस हजाराचे जवाहीर चोरीस गेले. दि.

पुष्कर येथील गुरांचें व घोड्यांचें प्रदर्शन यंदा बंद ठेवण्यांत आले आहे.

१८८२ सालीं झालेला इंडियन पिनलकोड लवकरच सुधारला जाणार आहे.

मुलतान येथें रू चांगला व पुष्कळसा येऊं लागला आहे.

चितागांग येथील तुफान— गेल्या रविवारीं झालेल्या तुफानानें चितागांग शहरांत फारच नुकसान झालें आहे. १७६४ व १८७६ सालींही याचप्रमाणें तिकडे तुफान झालें होतें, पण त्यापेक्षांही यावेळचें तुफान फारच जबर झालें आहे. या तुफानामुळें चितागांग व ब्रह्मदेश यांच्या दरम्यानची तारेची लाईन तुटून गेली आहे. आणि नवीन आलेल्या बातमी वरून असें समजतें कीं, आणखींही पुष्कळशी प्राणहानी झाली आहे.

ग्रहणावलोकन- येत्या जानेवारी महिन्यांतील सूर्यग्रहण पाहाण्याकरतां खगोल शास्त्रांच्या ६ मंडळ्या आपल्या या देशांत येणार आहेत, ग्रहणावलोकना करतां त्यांनीं रत्नागिरी पासून विजयदुर्गापर्यंत समुद्र किनारा, सदर्न मराठा रेल्वेवर तासगाव स्टेशनानजिक आणि जी. आय. पी. रेल्वेच्या जेसूर व वर्धा स्टेशनानजिकच्या जागा पसंत करून तेथें तेथें अवलोकनगृहें स्थापन करण्याचे ठरविलें आहे यंदा सूर्य ग्रहण पूर्ण व स्पष्ट दिसलेंच तर बरीचशी नवीन माहिती ( सूर्य मंडळाविषयीं ) समजण्यांत येईल.

शिनवारीकडे छावणी देऊन राहिलेल्या लष्करावर, आसपासच्या टेंकड्यावर लपून राहून अफ्रिदी लोक राहून राहून गोळ्या झाडीत आहेत. दिवसापेक्षां रात्रीच्या वेळींच ते गोळ्यांचा अधिक भडिमार करितात. धान्य व चारा आणण्या करतां फिरणाऱ्या टोळ्यांवरही ते हल्ले करीत आहेत. अशाच प्रकारचे हल्ले अलीखेल तायफावाल्यांनीं केल्यामुळें त्यांच्या दोनतीन गांवठ्यांतील बुरूज नाश करून टाकण्यांत आले आहेत.

सर विलियम लाखार्ड यांच्या निरोपास मसाझाई तायफावाल्यांनीं असें उत्तर दिलें आहे कीं, जर इंग्रज लोक पुढें चाल करतील तर त्यांना लढाई करणेंच भाग पडेल.

चांदीचा भाव उतरण्याचें मुख्य कारण चांदीच्या उत्पन्नांत वाढ हें नव्हे, तर फ्रांन्स व जपान या राष्ट्रांनीं आपल्या शिलकेची चांदी विकावयास काढली व जपानानें सोन्याचें नाणें सुरू करण्याचा ठराव केला यामुळें चांदीचा भाव आपल्या अजमासापेक्षां पुष्कळ ज्यास्त उतरला असा प्रकार आहे. लंडन ब्यांकेनें आपल्या शिलकेचा एक पंचमांश चांदीच्या खरेदी कडे लावण्याचा जो निश्चय केला आहे त्यामुळें चांदी बाळगणारांना धीर आला असून विलायतेंत व इकडे बरीच चळवळ उडून गेली आहे या ठरावाचा अनुकूल परिणाम हिंदुस्थानांत घडून येईल असा पुष्कळांचा अंदाज आहे. तो कितपत खरा ठरतो ते अद्याप पाहणें आहे.

ब्रिटिश सरकार ५००० लोकांची एक स्वतंत्र राखून टेविलेली फौज तयार करण्याच्या विचारांत असून ही फौज विशेष जरूरीच्या प्रसंगी उपयोगी पडावी ह्मणून तिचा खर्च अंगावर ठेवण्याचे त्या सरकारच्या मनांत आहे. असे विलायतचे प्रसिद्ध मुत्सद्दी गृहस्थ सर चार्लस डिल्के यांणीं सेंट जेम्स ग्याझेटमध्यें आपल्या सहीनें प्रसिद्ध केलेल्या एका लेखावरून कळतें. न्या.

पार्नेल पक्षाच्या ऐरिश मंडळीची सभा डब्लीन येथें भरली होती. त्यांत वुइल्यम रेडमन यांनीं भाषण करून हक्कासाठीं भांडत असलेल्या हिंदुस्थानांतील लोकांचा कळकळा दाखविला. व सर्व सभेनेंही टाळ्यांच्या गजरांनीं त्याला अनुमती दर्शविली असें तारेची बातमी सांगते. ऐरिश लोकांच्या थोरपणास हें शोभेल; परंतु हिंदुस्थानांतील लोकांस चिथवण्याचा प्रयत्न केल्याचा संबंध जोडून टाइम्स व ग्याझेटकर्ते ऐरिश लोकांवर रागावतील हा विचार त्यांनीं केला आहे काय? स. शो.

क्रीटच्या संबधांत अद्याप व्हावी तशी शांतता झालेली दिसत नाहीं. सुलतान आपलें लष्कर अद्याप तेथून काढीत नाहीं. क्रीटमध्यें जो गव्हरनर नेमावयाचा तो टर्की लोकांपैकींच असावा असा ह्याचा आग्रह आहे. युरोपांतील मोठालीं राष्ट्रें क्रीटला स्वराज्य देण्याच्या विचारांत आहेत. क्रीटमधील मुसलमानलोक पुनः गडबड करूं लागले आहेत. स. वि.

उपयुक्त माहिती—लेंकराचें अन्न व दांत येणें. दांत येण्याचा काळ हा लेंकरांस किती जाचतो हें सर्वांस माहीत आहेच. असा अनुभव आहे कीं, जीं मुलें फक्त आपल्या आईच्या अंगावर पितात व ज्यांना वरचें दूध किंवा दुसरें अन्न घालावें लागत नाहीं, त्यांना दांतापासून मुळींच इजा होत नाहीं. पण ज्या मुलांचा सर्व निर्वाह बाहेरच्या दुधावर किंवा इतर अन्नावर होतो त्या मुलांना दांत येतांना फारच पीडा सोसावी लागते व त्यावेळीं त्यांचा जीव फार धोक्यांत असतो.

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे “ वऱ्हाडसमाचार ” छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अंकास ........................८४

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत रु० १

दर ओळीस........८१ ०६

दुसरे खेपेस .... ........८१

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Single copy ....................................4as

Advertisement

Below 10 lines ...... 2 Rs

Per line over 10 ......4 as

petition Peline ... 3 as

VOL XXXI — AKOLA MONDAY 15 NOVEMBER 1897 NO 44

वर्ष ३१ आकोला सोमवार तारीख १५ माहे नोवेंबर सन १८९७ इ० अंक ४४

## जाहिरात

### आयुर्वेदविद्यालय.

प्राचीनार्वाचीन शुद्ध सरणीनें शिकून तयार झालेले वैद्य उत्पन्न होऊन, आपल्या देशाच्या वैद्यकाचें खरें तेज लोकांच्या उपयोगीं पडावें ह्मणून हें विद्यालय सुरू करण्यांत आलें आहे हें आतां निराळें सांगणें नकोच. कारण, हें सुरू करण्यास ज्याप्रमाणें मान्य, वजनदार व विद्वान् लोक पुढारी होते, त्याप्रमाणेंच दिवसेंदिवस याचें काम समाधानकारक झालें आहे हें, त्याच्या आजपर्यंतच्या व्यवस्थेवरूनच सिद्ध झालें असून, नवीन व्यवस्थाही विशेष समाधानकारक करण्यांत आली आहे हें प्रत्यक्ष अनुभवानें सर्वांस कळण्याजोगें आहे.

या विद्यालयाच्या पहिल्या वार्षिक परीक्षेंत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे दुसऱ्या वर्षाचे वर्ग, बुधवार ता. १ डिसेंबर सन १८९७ पासून सुरू होणार आहेत.

### नवीन विद्यार्थी दाखल करण्याची प्रवेशपरीक्षा,

सोमवार ता. ६ डिसेंबर रोजीं विद्यालयांत सुरू करण्यांत येईल. दाखल होण्याची इच्छा करणारे विद्यार्थ्यांनी, साधारणपणें मराठी पांच सहा यत्तांपर्यंत व संस्कृत गद्यपद्याचे अर्थज्ञानपर्यंत अभ्यास केलेला पाहिजे. संस्कृत सेकंड ल्यांगवेज घेऊन म्याट्रिक्युलेशन परीक्षेंत किंवा तशाच रीतीनें ट्रेनिंगस्कुलांत पास झालेल्या विद्यार्थ्यांस, ही परीक्षा देण्याचें भाग पाडण्यांत येणार नाहीं. मराठी ६ व्या यत्तेच्या परीक्षेंत पास झालेल्यास, फक्त संस्कृतांतच तपासण्यांत येईल. डिसेंबर पासून पुढील प्रमाणें वर्ग सुरू होतील:—

| वर्ष १ लें | वर्ष २ रें |
|---|---|
| वनस्पतिशास्त्र. | औषधी–गुणदोष. |
| शारीर. | विष-प्रकरण. |
| औषधी–क्रिया. | आरोग्यता विषय |
| वाग्भट. | वाग्भट. |
| औषधांचें मिश्रण करण्याची माहिती. | औषधें करून दाखविण्याची माहिती. |

### नवीन दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांनीं आपले अर्ज,

सोमवार ता. २९ नवेंबर पर्यंत पाठविले पाहिजेत. विशेष माहिती व्यवस्थापकाबरोबर पत्रव्यवहार करण्यानें मिळेल.

ता. २६।१०।९७
आयुर्वेद विद्यालय आफीस
वैद्य प्रभुराम जीवनराम औषधालय
अनंत ऋषीची वाडी, भुलेश्वर मुंबई

पोपट प्रभुराम वैद्य,
एल्. एम्. ॲंड एस्.
व्यवस्थापक-आ नि.

---

### नोटीस.

पुंजी मर्द रामु वाघमारे वस्ती मौजे वाडी अदमपूर तालुके अकोट जिल्हे अकोले.

यासीः–

बायजाई मर्द रामु वाघमारे वस्ती मौजे वाडी अदमपूर तालुके अकोट जिल्हे अकोले इजकडून नोटीस करण्यांत येते कीं रामु वल्लद रोडी वाघमारे, याची मी लग्नाची बायको असून तूं गंधर्वाची बायको आहेस तुजला एक पुत्र झाला असुन रामु हा मैत झाला त्या वेळेस मैताचे खाते मैताचे मुलाचे नांवानें लागले. मुलगा वारला त्यावेळेस तू आपले नावानें खाते लाऊन घेतले त्या दिवसापासून मैताचे मिळकतीची अफरातफर करून सर्व मिळकत बुडविली. शिवाय कर्ज काढून तू आपले बापास पैसे दिले. आणि मिळकतीवर कर्जाचा बोजा ठेविला मी मोल मजूरी करून उपजिविका करीत अहे यास्तव नोटिसीनें कळविले जाते कीं ही नोटीस पावतांच आठ दिवसाचे आंत सर्व स्थावर मिळकत व जंगम मिळकत माझे ताब्यांत द्यावी. आणि कर्ज काढून तू आपले बापास पैसे दिले ते पैसे तू आपले बापापासून घेऊन सावकारास द्यावे याप्रमाणें तू न केल्यास नुकसानी संबंधानें योग्य कोर्टांत दावा करून कोर्ट खर्चासमेत रकम घेण्यांत येईल. तू पाटाची बायको आहेस व मी लग्नाची आहे माझा हक्क तुजपेक्षां हिंदुधर्म शास्त्राप्रमाणें ज्यास्त आहे तुजला फक्त अन्नवस्त्राचा हक्क आहे यास्तव बेहेतर आहेकीं आपसांत निकाल करावा मी आपले तर्फे आपली नणंद सकु मर्द सुरेभान कुणबी इजला मुखत्यारपत्र दिले आहे. कळावे तारीख ११ माहे नोवेंबर सन १८९७ इसवी.

( सही )

बायजाई मर्द रामु निशाणी खुद्द.

---

### ‘ एक अपरिचिता ’

लावण्योर्मि तनूवरी नुफळल्या कासारवींची परी;
कीं चित्रासम देहभाग नव्हते रेखाटलेले जरी;
कीं वासंतिक देवि तेवि नव्हती संभूषणाढ्या जरी;
लीलाशास्त्रपटुत्व तेंहि बसलें नाहीं जरी अंतरीं; ॥१॥
होती ती तरुणी, परी, किती तरी संमोहनीया कृती !
होते कुंठित वर्णण्यास निघतां तीतें कवीची कृती.
साधें चित्र दिसें, अमूल्य दुसऱ्या चित्रांमध्यें ठेविलें,
अन्याहून अनन्य चित्त करितें तें कां ? न कांहीं कळे ।
साधें एक दिसे वनस्थळ, नसे कांहीं जिथें भव्यता;
नाहीं पर्वत थोर, थोर दऱ्या, वा स्थान विस्तीर्णता;
तें साधेस्थळ, अल्प अल्प मिळती सौंदर्य एके स्थळीं,
आत्मा निस्तुळ रम्यतेंत अपुल्या गोउनि तेथें खिळी! ॥३॥
हें लोकोत्तर मोहकत्व कुठलें ये त्या स्थळा भीतरीं?
शब्दें व्यक्त न होय हें; पण कळे आत्म्यास अभ्यंतरीं ?
ह्या एकीकृतरम्यतेस पृथकत्वें वर्णितां लेखणीं
होतो गोंधळ; मूळमोहन लया जातें तसें तेक्षणीं ! ॥४॥
हें जाणोनि, मनोहरत्व पृथगाकारें तिचें गावया
मी उद्युक्त न जाहलों, मधुरता जाईल कीं ती लया-
सौंदर्यातिशयें जरी विनटती देवांगनेच्या परी
ती बाला, कवि भाग्यवान ह्मणता हा आपल्याला तरी; ॥५॥
“ चंद्राची रमणीयता, मृगकिशोरांचें तसें पाहणें
“ लावण्यांमृतमग्नदेह तुळितां रंभेस आणी उणें! ”
इत्यादि प्रतिपादनें, मग, तिचें लावण्य वर्णावया
आलें कीं असतें; परंतु खुटते येथें कवीची क्रिया! ॥६॥
नाहीं नेत्र मृगापरी, पण असे दैविप्रभा त्यांत जी,
जें लोकोत्तर शक्तिचक्र फिरतें संगूढ वक्रांबुजीं,
चित्ताकर्षक मोहकत्व भरलें सऱ्या क्रिये भीतरीं,
वर्णायास समर्थ हें सकल कां आहे वदा वैखरी ? । ७ ॥
झालें दर्शन ! नेत्र भेट घडली नेत्रांस जेव्हां तिच्या,
इच्छाशक्ति गळूनि सर्व पडली स्वाधीन झाली तिच्या.
दृष्टिक्षेपबळें भुजंग अपुल्या भक्षास आकर्षती
नेत्रें मोहन मोहनीय रमणी घाली मला ते रितीं. ॥ ८ ॥
त्या मूर्तीवर दृष्टि गच्च बसली माझी खिळोनी अती,
अर्धोन्मीलित जाहली, मग गळे ती स्थूल[1] देह-कृती,
स्थूळाची कृति बंद होउनि पुढें व्यापार सूक्ष्मीं घडे
ध्याना वाचुन वृत्तिशून्य बनली ती सूक्ष्म काया पुढें. ॥९॥
विश्वीं अन्यपदार्थ लोप घडला ती मात्र बाला दिसे;
माझें मीपण जाउनी मग पुढें तद्रूप अंगीं वसे;
ध्याता जाउनि ध्येय ध्यान मग हीं बाकी उरे, यापुढें
होतां वृत्ति विशाल विश्व अवघे बालेंत वाटे बुडे ! ॥ १० ॥
आनंद स्थिति ही ! नं भान मजला कालस्थलांचें घडे
बाह्याभ्यंतर कोंदुनी उफळला आनंद सर्वांकडे
वृत्तीचे मळ जाउनी मग मना अत्यंत ये शुद्धता
ह्या भावानुभवांत चित्त बुडतां वाटे किती धन्यता! ११ ॥
गेला वेळ किती न कांहीं कळलें त्या मोहनी चिंतनीं.
आलें भान मला पुन्हा परत तों तेथें नसे कामिनी.
आकाशीं चपला तशी विलसली झाली पुढें गुप्त ती,
नाहीं ठाउक नांव गांव अथवा कांहीं तिची माहिती;॥ १२ ॥
चित्तीं जी प्रतिमा परंतु उठली आहे तिची स्पष्टसी,
जो स्वाल्पवधि चिंतनांत गढला, हीं राहिली मानसीं-
वृत्तींच्या विषयांस शब्द नसती वर्णावयाला पुरे
जाणे वृत्तिचें त्यांस एक, ह्मणुनी हें वृत्त माझें सरें ! १३

BEE.

---

१. अध्यात्म शास्त्रांत चार देह कल्पिलें आहेत—स्थूळ, सूक्ष्म, कारण आणि महाकारण. या पैकीं स्थूळ देहाच्या सर्व कृती ह्मणजे चलन, वलन, सीतोष्ण ज्ञान इत्यादि सर्व व्यापार बंद झाले.

२. सूक्ष्मदेह—ह्यासच लिंगदेह अथवा हिरण्यगर्भ ह्मणतात. हा वासनात्मक आहे आणि मुख्यत्वें करून मनाचे विकार, कल्पना, वृत्ति यांचा बनलेला आहे.

वऱ्हाडसमाचार

मिती कार्तिक वद्य ६ शके १८१९

# राष्ट्रीय सभा.

राष्ट्रीय सभेचा १३ वा वार्षिक समारंभ उमरावतीस पूर्व संकेता प्रमाणें खात्रीनें होणार आहे असें अश्वासन प्रसिद्धपणें राष्ट्रीय सभेच्या व्यवस्थापक मंडळीकडून मिळाल्या नंतर देखील कुतर्क व खोड्यानाच्या बातम्या कांहीं पत्रकार अद्याप प्रसिद्ध करितात हें मोठें नवल होय. आह्मी पुन्हा सर्व लोकांच्या माहिती साठीं प्रसिद्ध करितों कीं राष्ट्रीय सभा यंदा उमरावतीस खास भरणार आहे आणि सभा भरविण्या विषयीं सरकारची हरकत नाहीं. वऱ्हाड-सरकार जे प्लेग संबंधानें तपासणीचे व क्वारंटाईनचे नियम करितील ते यथायोग्य पाळण्यांत येतील आणि अशा नानाविध पण अनिवार्य अडचणी सोसून राष्ट्रीय सभा भरविण्यांत अधीक श्रय व पुण्य आहे अशा दृढ संकल्पानें येत्या समारंभाची तयारी कडेकोट चालू आहे आणि सर्व गोष्टी मोठ्या समाधानकारक रितीनें अमलांत येत आहेत.

सत्कार्याला वर्गणी देणें श्रेयस्कर आहेच पण ती वर्गणी बिनचूक रितीनें मागणी होण्यापूर्वीं योग्य माणसाकडे पोंचती करणें मनाचा मोठेपणा होय. ही गोष्ट राष्ट्रीय सभेच्या वर्गणीला सर्वतोपरीनें उत्तम लागू पडते. अशा राष्ट्रीय कार्याचें महत्व समजूनच लोक वर्गणीदार होतात. त्यांस हें ठाऊक असतें कीं सार्वजनिक कार्याला वर्गणी वेळेवर मिळाली तर ती गोळा करण्याचे परिश्रम वांचतात, जमत असलेल्या फंडाची योग्य कल्पना बरोबर होते, आणि फंडाच्या बेतानें आरब्ध कार्याचा विस्तार किंवा संकोच करितां येतो. वर्गणी गोळा करण्याचे परिश्रम लक्ष्यांत घेतले ह्मणजे असें दिसून येईल कीं वेळेवर न मागतां १० रुपये देणारा वर्गणीदार २० रुपये वर्गणी कटकट करून देणाऱ्या पेक्षां पुष्कळ चांगला ठरतो. वर्गणीचे आंकडे घालणारे गृहस्थ थोर थोर असतात तेव्हां आपल्या देणगीचें मोल वाढविण्याची गोष्ट त्यांच्याच हातीं असते. आह्मीं उमेद बाळगतों कीं राष्ट्रीय सभेचे वर्गणीदार आपापली वर्गणी मोठ्या दीलदारीनें योग्य समयीं पोचती करितील आणि स्वागत-मंडळीच्या कार्याला तशा करण्यानें दांडगी मदतच करितील.

यंदा राष्ट्रीय सभेला जाण्या संबंधानें देखील मोठी जबाबदारी सर्व राष्ट्रावर आहे. प्लेग, दुष्काळ, धरणीकंप, तुफान इत्यादिकामुळें लोकसमुच्चय थोडाबहुत कमी होईल हें उघड आहे. तथापि प्रत्येक सुखवस्तु राष्ट्रभक्तानें ही गोष्ट ध्यानांत धरली पाहिजे कीं ज्यांस साधनें अनुकूल असतील त्यांनीं आपली पराकाष्ठा करून राष्ट्रीय सभेला आल्या शिवाय राहता कामा नये. या वर्षाची जबाबदारीच कांहीं विलक्षण आहे. अशा विकट समयीं चोहींकडून देशभक्तीनें स्फुरण पावणारी मंडळी आपल्या कृतीनें राष्ट्रीय संस्थेचा महिमा कायम राखतील अशी आह्मी उमेद बाळगतों.

—०—

राष्ट्रीय सभेच्या बरोबरीनें राष्ट्रीय सामाजिक परिषद् ही मामूल वहिवाटी प्रमाणें राष्ट्रीय सभेच्याच मंडपांत उमरावतीस भरण्यांत येईल. या वर्षीं अध्यक्षस्थानाचा मान एका विद्वान व खऱ्या सुधारकाला देण्याचा विचार व्यवस्थापक मंडळीनें केला आहे. रा. रा. वामन कृष्ण कोल्हटकर, स्माल काज कोर्ट जज्ज, जबलपूर या थोर पुरुषांची निवड अध्यक्षस्थानीं करण्याचा संकल्प ठरला आहे आणि राजश्री वामनरावजी यांचा रुकार मिळविण्यासाठीं तो ठराव त्यांच्याकडे लिहून जाणार आहे. हे गृहस्थ वऱ्हाडांत व मध्यप्रांतांत बहुतजणांच्या परिचयांतले आहेत. हे मूळचे वांईचे रहिवाशी होत हे उच्च कुळांतले असून यांच्या घराण्यांतली मंडळी चांगली हुद्देदार, विद्वान व लौकिकवान आहेत. राजश्री वामनराव यांनीं मोठ्या धैर्यानें एका गतभर्तृकेला गृहस्थाश्रमांत आणिलें आणि हे आपल्या भाषणानें सुधारणेची दिशा दाखवितात इतकेंच नाहीं तर यांच्या कृतींत सुधारणेचीं पाऊलें उमटलेलीं पाहून लोक त्यांचा धन्यवाद गातात. एकंदरीनें, ही निवड मोठी नामी आहे आणि ती सर्वत्र मान्य करण्यांत येईल अशी आशा आहे.

नामदार राव बहादूर महादेव गोविंद रानडे यांनीं येत्या सभेपुढें निघणाऱ्या विषयांची मालिका प्रसिद्ध केली आहे. हे विषय लोकांच्या परिचयांतले आहेत तेव्हां कायमची दुसरी मालिका ठरल्यावर आह्मी ते विषय एकत्र प्रसिद्ध करणार आहों. सामाजिक सुधारणा कशा कराव्यात अशा विषयीं मद्रासचे सुप्रसिद्ध गृहस्थ नामदार आनंदाचार्लू यांनीं गेल्या १ ले तारखेस मच्छलीपट्टन येथील मंडळीस उत्तम बोध केला तो येत्या सभेच्या वेळीं लोकनिदर्शनास आणण्यासारखा आहे. नामदार साहेब ह्मणतात कीं हल्लींचे इंग्रजी शिकलेले लोक पाश्चिमात्य कल्पनांनीं संस्कृत असतात पण त्यांचे सुधारणेचे मार्ग जनसमूहास एकीकडे सोडून जाण्याचे असतात ही मोठी चूक आहे. आपलीं शास्त्रें सुधारणेला अनुकूल आहेत पण शास्त्रभांडारांत शिरलेल्या शास्त्रीमंडळास सुधारक पक्षाचे लोक विचारीत नाहींत आणि त्या बेपरवाईचा परिणाम असा घडतो कीं शास्त्रीमंडळ व त्यांच्या तर्फेचा जनसमूह सुधारकांस प्रतिरोधक क्रिया करूं लागतात. ही चूक खरोखर दुरुस्त करण्यासारखी आहे आणि ती लोकांच्या दृष्टीला यंदा आणून दिली पाहिजे. सुधारक आपल्या विरुद्ध पक्षीया विषयीं तिरस्कार दर्शवितात हीच मोठी गोम सुधारणेला बाधक होते.

इसलामपूरच्या ‘ प्रतोद ’ पत्राच्या प्रकाशकांला व मालकाला काळेपाण्याची शिक्षा राजद्रोहप्रवर्तक लेख लिहिल्या बद्दल झाली तेव्हां पासून सर्व राष्ट्राचे डोळे मुंबई हायकोर्टांत त्या शिक्षेवर दाखल झालेल्या अपिलाच्या निकालाकडे लागले आहेत. या निकालांत मुंबई हायकोर्टाचें खरें मत पिनलकोडच्या १२४ (अ) च्या अर्था संबंधानें जगापुढें मांडण्यांत येणार आहे. जों जों एखाद्या गोष्टीचा छंद लागावा आणि उत्कंठेनें व काळजीनें मन चंचल व्हावें तों तों हें अपील लांबणीवर पडत चाललें आहे आणि आशा व निराशा यांच्या युद्धामध्यें सर्व लोकांचीं मनें उद्विग्न व उदास झालीं आहेत. आतां अखेरीस हें महत्वाचें अपील नामदार चीफ जस्टिस फारन, रानडे व पार्सन यांच्या समोर येत्या बुधवारीं निघणार आहे. पिनलकोडच्या वेदसूत्राचा अर्थ लोकांच्या समजुती प्रमाणें व कल्पने प्रमाणें ठरो आणि राजद्रोहाचीं काल्पनिक बंडें वर्तमान पत्रकारांवरील टळोत अशी परमेश्वरापाशीं सविनय प्रार्थना आहे.

मद्रासचे गव्हरनर सर हॉवलाक यांनीं बोलून दाखविल्या प्रमाणें इंडियन प्रजेची राजनिष्ठा कायम व अजरामर आहे तोंपर्यंत सरकारी दृष्टीनें चुकलेल्या व राजद्रोहाच्या लेखाबद्दल माफी मागितल्यावर वर्तमान पत्रकारांवर माफी करणें हें न्यायी पण दयाळू सरकारचें पहिलें कर्तव्य होय. रुष्ट व क्षुब्ध झालेल्या मुंबई सरकारानें देखील ही गोष्ट ‘ पुणेवैभव ’ व ‘ मोदवृत्त ’ या वर्तमान पत्रांवरील खटल्यामध्यें अमलांत आणिली. परंतु अशी दया देखील मुरादाबाद येथील पत्रकर्त्याला दाखविण्यांत आली नाहीं. रा. रा. अंबाप्रसाद कायस्थ हे ‘ जम्मी-उल-अलम ’ नांवाच्या पत्राचे संपादक आहेत. त्यच्यावर गेल्या जुलै महिन्यांत राजद्रोहाचे लेख लिहिल्या बद्दल खटला करण्यांत आला. मि. सी. रुस्तुमजी नांवाचे गृहस्थ डिस्ट्रीक्ट माजिस्ट्रेट हे न्यायाधीश होते. त्यांनीं नामदार टिळकांचा खटला आपल्या ठरावास आधारभूत केला आणि आरोपी राजश्री अंबाप्रसाद यांनीं सरकारापाशीं अपराध कबूल केला व माफी मागितली तथापि नामदार टिळकांच्या १८ महिन्यांच्या शिक्षे इतकी शिक्षा अंबाप्रसाद सारख्या अप्रसिद्ध पत्रकाराला दिल्या शिवाय न्याय बरोबर होणार नाहीं असा न्यायाधीशांचा पक्का आग्रह पडला आणि अखेरीस गरीब बिचारा पत्रकार सरकारच्या कायद्यानें धुळीस मिळाला ! कायदा ही एक अजब शक्ती सरकारच्या हातीं आहे आणि ह्मणूनच उभयता सरदार नातू चौकशी शिवाय तुरुंगखान्यांत काळाचे दिवस कंठीत आहेत.

The Berar Samachar

MONDAY NOVEMBER 8 1897

## ADMINISTRATIVE WAVES

When a well trained, experienced and high minded administrator like Lord Ripon came to preside over the destinies of India, and endeavoured to inaugurate a liberal policy calculated to initiate the people of the country into the high art of materially helping actively in the noble work of administering their own affairs, the liberalism dear to his heart was soon seen to reflect not only in all that his lordship said and wrote but also in the annual reports made by subordinate officers, faintly and timidly at first, but clearly and boldly later on. It was under the regime of that nobleman, that the scheme of Local Self Government was evolved out of the small local Committees which existed before, and launched into practice with great caution. Only a small measure was put forward giving very limited powers to administer the local funds and a fraction of a few other taxes. It is very likely that the august originator of the scheme intended that greater advance should be made, after the country got used to the first instalment of liberalism, but five years' period is not long and on its expiry Lord Dufferin on assuming the reins of Government declared that his chief aim it was to prune and take care of the plant of liberalism that was reared by his predecessor. The succeeding viceroys not only never made the contemplated advance, but some of them distinctly set the tide back. The jury notification promulgated in Bengal was the first prominent indication of the impending change, and the victory which the people gained by getting the said notification cancelled, showed that people had made considerable progess in the art of constitutional agitation set on foot to preserve existing rights Now it would appear that we are in the middle of the wave of what for want of a better name may be called "Imperialism" as opposed to Liberalism. This admits of being shown conclusively by citing and explaining the bearing of a sufficient number of events which occurred in various parts of India. But to confine our attention to our own small province we may mention the "Report on the Local Funds in the H. A. D. for the year 1896—97." At page 19 of it, the Commissioner, in his general remarks premises that "the district boards in Berar are chiefly composed of pleaders and professional men whose time is otherwise occupied," and naturally adds the other premiss that "they have neither leisure nor inclination to go out of their way and see that the Local Funds which they are called upon to administer are being profitably laid out and not being misappropriated." The truth of the first and the axiomatic nature of the second of these propositions being taken for granted as it would naturally be when they occur in an official report, the conclusion obviously is that "The natives of Berar are certainly not sufficiently public spirited and disinterested to supervise public duties as unpaid agents of Government and few, if any, have the knowledge and education required for such work." The old Deputy Commissioners and the race of those administrators who were present at the time of the inception of the Local Government scheme, stand discredited, and the former as whilom subordinates come in for their share of blame. "Now" says the Commissioner "from my observations during the past year, it seems to have been the policy of a good many of the older Deputy Commissioners to let Local Self Government have a free hand to allow committees to go their own way and merely to stand by and occasionally find fault. This in my opinion was an attitude fatal to the good working of the Local Funds administration."

The opinion thus carefully reasoned out and formulated is naturally echoed from the Residency in the words: "Local Government is still in its infancy in Berar, and the Boards require a strong leaven of official members to keep them up to mark." Then comes later on the suggestion that "Possibly it might be expedient to adopt in Berar the Madras system under which the members of a Taluka Bound are nominated, not elected." Further on it is remarked that "It is probably advisable in Berar that in every district the office of chairman should

be held either by the Deputy Commissioner or by the senior Assistant Commissioner and that of Vice Chairman by a qualified non-official."

Let us pause a bit to briefly note the results on the hypothesis that all the extracts which we have reproduced above, correctly represent the official mind. Starting with the general proposition that the District Boards in province are composed of pleaders and other professional men, and assuming that they cannot move about in the district to see how the execution of works is going on, it follows that they should have a "strong leaven" of official members. The Taluka Boards should be composed of "nominated, not elected" members with probably the unlaid down corrolary, that the members of the district Boards should be either elected or chosen by or from, the members of the Taluka Boards, and presided over either by the Deputy Commissioner or his second in command. Thus the future Taluka Boards would be bodies of gentlemen all nominated by Government and District Boards would be composed of nominated members once filtered either by election or further nomination, and probably both but at least one of these and the more important of them should be presided over either by the highest or the next highest executive. This then, is, the future composition of the Local Self Government. in this province, and any body can compare the picture with that with which Lord Ripon's Government thought fit to make a start.

If all the propositions which lead to this unhappy conclusion were true, we should be very sorry but all the same, keep our peace and persevere in a sullen silence. It happens however that the basal proposition is so very imperfectly true, that it falls much below even an inaccurate statement. The District and Taluka Boards are composed not mostly of pleaders and other professional men but mostly of Patils, Patwaris Deshmukhs Deshpandias or ex Pargana officers. Now and again a solitary Marwadi or an agriculturist simply or solely is to be found, and generally there is a pleader or two. Why then is "the pleader" put foremost? Probably to point out that he can not move about and watch the progress of works to be executed within his jurisdiction. This defect in him, gets generalized and stated in the sweeping form of the inhabitants of the country not being sufficiently public spirited to be entrusted with the administration of Local Funds. Then the suggestions follow to lead to the sequel.

We sincerely trust that our remarks will not be misunderstood. All we wish to point out is, that the result which the official report formulates may have been brought about by encouraging the official element to oppose and throw discredit, no matter whether deserved or otherwise, on the working of non-official heads of the bodies. We are afraid there are many who would draw this conclusion and if they do, they will say that a wave of Imperialism as opposed to Liberalism is passing over us.

## वऱ्हाड

राव बहादूर श्रीराम भिकाजी जठार बी. ए. सी. आय. इ. शाळाखात्याचे माजी डायरेक्टर यांची स्वारी पुण्याहून येऊन वाशिमास चिरंजीव राजश्री काशिनाथपंत यांच्याकडे गेली आहे. यांचें हें आगमन ऐन राष्ट्रीय सभेच्या सुमाराला घडल्यामुळें वऱ्हाडच्या मंडळीस मोठा आनंद झाला आहे.

मेजर ग्यारेट, डायरेक्टर लांड रेकार्डस हे मामुली प्रमाणें गेल्या शनिवारीं मूर्तिजापूर तालुक्यांत फिरावयास गेले.

चालू असलेल्या नवीन मोजणीचें काम यंदा उमरावती, मोर्शी व इलिचपूर या तीन तालुक्यांत गेल्या आक्टोबरच्या २० वे तारखेपासून सुरूं झालें आहे.

येत्या बुधवार पासून वऱ्हाड शाळाखात्याचा शिक्षक समाज उमरावतीस भरणार आहे.

वऱ्हाडची सामाजिक सभा यंदा उमरावतीस गुरुवारीं सायंकाळीं रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी यांच्या अध्यक्षते खालीं भरणार आहे.

यंदाच्या राष्ट्रीय सभेला मदत करण्याच्या कामीं मध्यप्रांतस्थ मंडळींनें थोडीशी कचर खाल्ली होती. परंतु उमरावतीहून वं आकोल्याहून कांहीं थोर गृहस्थ मुद्दाम नागपुरास गेले होते आणि त्यांनीं तेथें सभा करून तिकडील गृहस्थांस त्यांच्या कर्तव्याजोगें विषयीं केलें आश्वास उमेद आहे कीं या प्रत्यक्ष भेटीचा लाभ मोठा नामी आहे आणि नागपूरच्या भागाकडून राष्ट्रकार्याला दांडगी मदत मिळेल.

आजच्या अंकाबरोबर एक जाहिरात पुरवणीच्या रूपानें पाठविली आहे. ही जाहिरात रा. रा. दत्तु भारुती नंननवरे बुकसेलर व कमिशन एजंट, पुणें, यांची आहे. तिकडे वाचकांनीं अवश्य लक्ष्य पुरवावें.

वाडेगांव येथील देवराव नांवाच्या विद्यार्थ्यानें सहाव्या इयत्तेची परीक्षा न उतरल्या मुळें नदींत बुडी मरून आत्महत्या केली.

### NOTICE

It is hereby published for general information of the people living within the limits of the Akola Municipality that assessment lists of the Town Fund Tax for the year 1897—98 due by all persons residing, or practising any profession or art, or carrying on any trade or calling, are complete and ready for inspection in the Municipal Office during office hours (from 11 A. M. to 5 p. m.).

Persons concerned, are requested to see what tax has been imposed upon them, and to take objections, if any in writing to the same. within one month from the date of the notice. The tax is payable in one instalment on the 1st of January 1898.

Objections of those who will submit them in writing within the time above stated will be heard and disposed of on the 16th December 1897 at 7-30 A M. in the Town Hall. Objections of those who will not appear prepared to substantiate their contentions on the day and time fixed above will be taken to be rejected.

Dated Akola 13th November 1897 — K. G. Damle, Secretary, A. M. C.

### नोटीस

ह्या नोटीसीनें अकोलें, म्युनसीपल हद्दींतील सर्व लोकांस कळविण्यात येतें कीं अकोलें म्युनसीपल हद्दींत राहणारे किंवा कोणताही धंदा, कलेचें काम, किंवा उद्योग अगर धंदा करणारे सर्व लोकांवरील सन १८९७।९८ सालचे टौनफडांच्या आकारणी बद्दल याद्या तयार झाल्या आहेत त्या म्युनसीपल आफीसांत आफीसचे वेळांत सकाळीं ११ वाजल्या पासून संध्या काळचे पांच वाजे पर्यंत पाहाण्याला ठेविल्या आहेत. तरी कळविण्यांत येते कीं, सर्व लोकांनीं आपापल्यावर किती कर बसविला गेला आहे हें पाहून सदर्हू बसविलेल्या आकारणी बद्दल तक्रार असेल तर ती नोटिसीचे तारखे पासून एक महिन्याचे आंत लेखी दाखल करावी सदर्हू कर तारीख १ ज्यानेवारी सन १८९८ इसवी रोजी सालीम दिला पाहिजे.

जे लोक ठरावा विरुद्ध तकरार करितील त्यांनीं तकरारीच्या चौकशीची तारीख १६ माहे दिसेंबर सन १८९७ इसवी रोजीं नेमिली आहे. त्या तारखेस सकाळीं ७॥ वाजतां टौनहालांत पुराव्यानिशीं हजर व्हावें. जे लोक वक्तशीर हजर न होतील त्यांची तक्रार नामंजुर केली असें समजलें जाईल. कळावें तारीख १३।११।९७ इ.

K. G. Damle
Secretary
A. M. C

### नोटीस

रा झिंगऱ्या, गोविंदा, हिऱ्या वल्लद संभ्या महार रहाणार मळसूर तालुके बाळापूर जिल्हा अकोला यांसः—

दावलखा वल्लद सुलतानखा आतार रहाणार मौजे मळसूर तालुके बाळापुर जिल्हा अकोला हा नोटिशीनें असें कळवितों कीं, तुमच्याशीं माझा जो देवघेवीचा वगैरे व्यवहार सप्टेंबर सन १८९७ इ. पावेतो झाला त्याजबद्दल सर्व प्रकारचें तुमचें देणें निघालें ते रुपये १५०० त्याबद्दल आह्मी तुह्मास आमचे खात्याचें शेत सर्वे नंबर २६ (उभे पिकासुद्धा) व एक बैलजोडी व सदर्हु शेताचे खातें तुमचे नांवें आह्मी करून देऊन तुमच्या सर्व प्रकारच्या ऋणामधून मुक्त झालों. तुमचें मी एक कवडीसुद्धां देणें ठेविलें नाहीं. आमचा तुमचा देवघेवीचा सर्व प्रकारचा व्यवहार माझे साक्षात ५ भाऊ यांज बरोबर जो होता तो तारीख ९ माहे अक्टोबर सन १८९७ इ. रोजीं सदर्हु शेतांचें खाते तुमचे नांवें करून सर्व निकाल केला. आतां तुमच्याशी जो व्यवहार आमचा झाला याबद्दलचे सर्व कागद पत्र जे तुमचे जवळ आहेत त्या कागदपत्रांत आमच्या दोन शेताचे आह्मी तुह्मांस खरेदीकागद करून देऊन आह्मी आमच्या पोटापाण्यास तुह्मापासून जें जें कांहीं घेतले ते व इतर मिळून सर्व देणें रु. १५०० शें ठरले व सदरील लिहिले प्रमाणें तुमचा आह्मी निकाल केला. आता खरेदीकागद व इतर पुर्जे हे सर्व पोकळ आहेत. ते तुह्मी परत दिले पाहिजे होते. पण अद्यापही दिले नाहींत. तुमचा सर्व प्रकारचा व्यवहार संपविला याजबद्दल तुमची अलाहिदा पावती आह्मांजवळ आहे. तर तुह्मी मागें पुढें मजवर फिर्याद केल्यास मी कोणचेही प्रकारचे संबंधानें जबाबदार नाहीं, ह्मणून तुह्मी जर फिर्याद केली व मजला त्या बद्दल जबाब देण्याकरितां, माझा कामधंदा बुडवून जावें लागले तर सर्व नुकसान भरून घेतले जाईल. कळावे तारीख १३।११।९७ इ.

सही

सहीची निशाणी बखर—दावलखा वल्लद सुलतानखा राहणार मळसूर तालुके बाळापूर याच्या हातची असें.

### नोटीस.

रा० रा० फकीरचंद नवलाजी पाटील राहणार मदाखेड तालुके जळगांव, जिल्हे आकोला— यांस

तुह्मी मौजे वडसिंगी तालुके जळगांव येथील आमचे दुकानचे जें देणें आहे त्याची फेड नोटीस पोचल्या तारखे पासून आठ दिवसाचे आंत करावी. या पुढे आपल्या कडे खातें बाकी ठेवण्याचा आमचा विचार नाहीं. सदर्हू प्रमाणें बाकी चुकती न केल्यास कोर्ट मार्फत या नोटिशिच्या व इतर खर्चा सहीत सर्व रक्कम वसूल केली जाईल. कळावें, तारीख १२ माह नोवेंबर सन १८९७ इसवी.

सही.

देवकिरण गिरधारालाल द. खु.

### नोटीस.

रा० आनंदराव यशवंतराव राहणार आळंदे तालुका आकोला— यांस

या लेखानें कळविण्यांत येते कीं तुह्मी आमचे कुलमुखत्यारनाम्याच्या आधारें जीं कामें केलीं त्यांचा सर्व हिशोब ही नोटीस पोंचल्या तारखे पासून आठ दिवसांचे आंत आमच्या दुकानीं बाळापुरास समजून द्यावा आणि आमचे कागदपत्र व वह्या वगैरे सर्व चीजवस्तु आमच्या हवालीं करावी. या प्रमाणें न केल्यास तुह्माविषयीं कोर्ट मार्फत योग्य तजवीज करण्यांत येईल. कळावे. तारीख १३ माहे नोवेंबर सन १८९७ इसवी.

सही

न्यामतखा वल्लद बिलनखा
दस्तुर खुद्द.

### जाहिरनामा.

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं आमचे कुलमुखत्यार रा० रा० आनंदराव यशवंतराव राहणार आळंदे तालुके आकोला यांनीं सुमारें बारा महिन्यापासून आमचे काम सोडून दिलें आहे आणि त्यापूर्वी त्यांनीं तेव्हांगे मुक्कामीं कोर्टा संबंधी जीं आमचीं कामें केलीं तीं बरोबर व कायदेशीर झालीं नाहींत असें आतां नजरेस आलें आहे. ह्मणून आह्मी या जाहिरातीनें त्यांचे मुखत्यारपत्र रद्द केले आहे, यापुढें सदर्हू राजश्री आनंदराव हे आमच्या संबंधानें कोणाशी व्यवहार करणार नाहींत आणि इतर लोकांनींही कुलमुखत्यारी वरून काढल्यामुळें त्यांच्याशी कांहींच संबंध ठेवूं नये. या उपर जर कांहीं व्यवहार घडेल तर त्या बद्दलची जबाबदारी आह्मावर व आमच्या इस्टेटीवर नाहीं. कळावें तारीख १३ नोवेंबर सन १८९७ इ०

सही.

न्यामतखा वल्लद बिलनखा
दस्तुर खुद्द.

## वर्तमानसार.

हिंदुस्थानच्या टाकसाळांत चांदीचे रुपये पाडण्याची जी बंदी केली आहे ती दूर करून त्या टाकसांळा पुन्हा सुरू कराव्या व आह्मीही चांदीचें नाणे सुरू करून दवघेव करण्यास तयार आहों अशी अमेरिका व फ्रान्स या दोन्ही सरकारांनीं विलायत सरकारास सूचना केली होती. विलायत सरकारानें हिंदुस्थानसरकारचें मत विचारलें. बंद केलेल्या टाकसाळा पुन्हा सुरू केल्यास आमचे नुकसान होऊन अव्यवस्थाही होईल असा हिंदुस्थानसरकारानें रपोट केला. स्टेट सेक्रेटरी यांनीं हिंदुस्थानसरकारचा रपोट मंजूर करून अमेरिका व फ्रान्स यांच्या सूचना प्रमाणें हिंदुस्थानच्या टाकसाळा पुन्हा सुरू करण्याचें नाकारलें.

जपान व टर्की यांच्या दरम्यान तीन वर्षे कायम राहाणारा एक तह झाला असून त्यांत एकमेकांचे वकील परस्परांच्या दरबारीं राहावे आणि एकमेकांचा माल एकमेकांच्या राज्यांत जकाती वाचून येऊं द्यावा असें ठरलें आहे. हा जपानी कावा दिसतो.

चित्रळ रस्ता केल्यामुळें सरहद्दीवरचा हल्लींचा बंडावा माजला आहे हें ह्मणणे खरें कीं खोटें याबद्दल विलायतच्या लोकांत जारीनें चर्चा सुरू आहे.

पैशासारखा दुष्ट कोणी नाहीं. अलीपर येथें पुष्कळ संपत्ती जवळ असणारा एक माणूस आजारी पडला. या दुखण्यांत आपली सुश्रुषा करण्यांकरितां त्यानें गया येथील आपल्या एका नातलगास बलावणें पाठविलें. नातलग अलीपूर येथें आला व त्या दुखणेकऱ्यास पेजपाणी देऊं लागला. सुमारे एक महिना झाल्यावर तो दुखणेकरी बरा बरा होऊं लागला, अर्थात त्या दुखणकऱ्याचे डबोलें मिळण्याची आशा नाहीं असें त्यास वाटू लागलें. हा दुखणेकरी ज्या घरांत होता त्या घरांत या गयेहून आलेल्या नातलगानें एक खाडा खणला आणि संधी साधून त्या दुखणेकऱ्यांस जिवंतच त्या खाड्यांत घालून पुरून टाकलें. आणि त्याचे डबोले बगलेत मारून तेथून फरारी झाला. हा पेजपाणी देणारा कोठें दिसत नाहीं व रोग्याच्या घराचें दार बंद आहे हें पाहून शेजाऱ्यास संशय आला त्यांनीं दार फोडून तपास केला तो वरील सर्व प्रकार बाहेर आला.

चितागंज येथें नुकतेच तुफान होऊन शहरांतली अर्धी घरें जमीनदोस्त झाली झाडापाडांचें फारच नुकसान झालें. पातीया ठाणा मुन्सफ कोर्ट व खासमहाल हपीसें या इमारतीही जमीनदोस्त झाल्या गरीब लोक घरांवाचून उघडे पडले आहेत. हा प्रकार ऐकून गव्हरनरजनरलांस दुःख झाले असून ते त्या गरिबांकरितां कांहीं तजवीज करणार आहेत.

रशियाच्या प्रधानानें टर्कीशी बोलणें केल्यावरून टर्की व अबिसिनिया यांच्या दरम्यान इजिप्त स्वतंत्र करण्याच्या बाबतींत एक गुप्त तह झाला आहे. या तहावर सह्या शिक्के होण्यापूर्वी तो रशिया व फान्स या सरकारच्या पसंती करितां पाठविण्यांत येणार आहे. त्या तहांत आह्मी आपल्या राज्यांत इतर खिस्ती व खिस्ती देवळें यांचा जसा सन्मान राखतो त्याच प्रमाणें तुमच्या देवळांनाही राखू असें टर्कीनें आपणास बांधून घेतले असून तुमच्या देवस्थानांचा व धर्माध्यक्षांचा आह्मीही तसाच मान राखू असें अबिसिनियानें आपणास बांधून घेतले आहे. तसेंच अबिसिनियाच्या राज्याची जी हल्लींची सरहद आहे त्याच्या दक्षणेस व पूर्वेस आपली हद्द वाढविण्यास अबिसिनियाच्या बादशहास पूर्ण मोकळीक आहे असें टर्कीच्या सुलतानानें वचन दिले आहे. टर्की सरकार या पुढें आपल्या कागद पत्रांत अबिसिनियाच्या राजास पादशहा असें लिहिणार.

प्रोफेसर न्युमन नावाचा एक साहेब नुकताच ९२ वर्षांचा होऊन मेला. हा मांस व दारू यास न शिवणारा असून तबांकूचे व्यसनही त्यास नव्हतें.

बड्या राजांनीं मसदा करून दिल्याप्रमाणें ग्रीस व टर्की हे तह करण्यांत गढून गेले आहेत, पण त्या लढाईच्या वेळी खासगी लोकांचे जें नुकसान झाले तें कोणी भरून द्यावें याबद्दल एक लढा उत्पन्न झाला आहे.

ठा० अ०

आह्मास कळविण्यास फार वाईट वाटतें कीं राजा रघु केसरी देव, कालाहंडी ( करोंड ) संस्थानचे राजे, य.स त्यांच्या कोणी दुष्ट चाकरानें गेल्या आठवड्यांत गोळी घालून ठार मारलें व लगेच त्यानें आपणासही मारून घेतले. हा नोकर हे दुष्ट कर्म करण्यास कां प्रवृत्त झाला याचे विश्वसनीय कारण अद्यापि समजले नाहीं हें तरुण राजे नाग कुलांतील असून क्षत्रिय होते. ह्यांचे वय अगदीं अल्प ह्मणजे २५ वर्षांचे होते. यांचा जबलपूर येथील राजकुमार कालेजांत आणि नंतर रायपूर येथील राजकुमार कालेजांत अभ्यास झाला होता यांस एक लहान मुलगा आहे. यांचे शिक्षण संपल्यावर सन १८९५ सालीं जानेवारी महिन्यांत रायपूर येथें मोठा दरबार भरवून मि. [ आतां सर ] वुडबर्न यांनीं या राजेसाहेबांस गादीवर बसवून संस्थानचा अधिकार दिला. यांस नऊ तोफांच्या सलामीचा बहुमान सरकारांतून दिलेला होता. कालाहंडी संस्थानचे वार्षिक उत्पन्न सुमारे सवा लक्ष रुपये आहे. पैकीं बारा हजार रुपये इंग्रज सरकारास नजराणा द्यावा लागतो. आतां हें संस्थान नांदगांवाप्रमाणें सरकारच्या देखरेखीखाली येईल हें उघडच आहे.

सध्यां लाहोर येथें म्युनिसिपालिटीमध्यें नेटिव्ह व युरोपियन सभासद यांच्यामध्यें कामाचा फार मोठा असा वांधा पडून तिचे काम बंद पडल्यासारखेंही झालेलें आहे. नेटिव्ह लोकांचे ह्मणणे असें आहे कीं तेथें कारखाने उभारूं देण्यास कांहींच हरकत नाहीं आणि युरोपियन ह्मणतात कीं ते तेथें उभारूं देऊं नये.

न्या. सु.

हल्लीं आरमारखात्यांतील तोफा फक्त सुमारें पाउणशेंवेळां बार काढण्यास उपयोगीं पडतात. त्यापुढे त्या रद्द होतात, असें सांगतात.

सोडावॉटर वगैरेंचा खप—लंडन शहरांत रोज एक लाख सत्यायशी हजार ग्यालन सोडावाटर वगैरे पेयाचा रोज खप होतो, अशी सरासरी काढली आहे.

इंग्लंडच्या ब्यांक नोटीचा कागद इतका चिवट असतो कीं, त्याला पीळ घालून त्याची दोरी बनविली तर ती दोरी ३९९ रत्तल ह्मणजे सुमारें ४॥ मण ओझें उचलूं शकेल !

लंडन आणि नॉर्थ वेस्टर्न रेल्वे कंपनीकडून आपल्या नौकरचाकर लोकांस दररोज ८,००० पौन्ड मुशाहिरा वांटावा लागतो ह्या मानानेंच तिचें उत्पन्न असलें पाहिजे हें उघड आहे.

अविवाहितावर कर—इंग्लडच्या पार्लमेंटनें इ. स. १६९५ सालीं सर्व अविवाहित पुरुषावर कर बसविला होता व हाच कर इ. स. १७९५ सालींही पुनः बसविला होता परंतु आलीकडें चालू शतकाच्या प्रारंभी हा कर मुळींच काढून टाकण्यांत आला आहे.

छप्पन्न वेळा नाश !—अफगाणिस्तानांत असें एक शहर आहे कीं, त्याचा आजपर्यंत ५६ वेळा नाश करण्यांत येऊन तितकेंच वेळां तें शहर पुनः बांधण्यांत आलें. ह्या शहराचें नांव काय तें मात्र ह्याच बातमींत प्रसिद्ध झालें नाहीं. असें कां ?

विचित्र गाडी!—जर्मनी देशांत मि हरकरब नांवाच्या एका कल्पकानें एक प्रकारची विलक्षण गाडी तयार केली असून .ही गाडी रणसंग्रामांत योध्यांच्या उपयोगीं पडावी ह्मणून तिची योजना केली आहे. ह्या गाडींत यांत्रिक तोफा ठेवून त्यांजकडून आपाप शत्रुदलावर गोळीबार व्हावा, अशी व्यवस्था केली असते. गाडीवर माणसें बसलेली राहून त्यांचेवर शत्रुदलाकडून होणारा गोळीबार वर्षू नये ह्मणून त्या गाडीवर उत्तम पोलादी पत्र्यांची छाया केलेली असते. तेणेंकरून ही नवीन गाडी बसण्यास व युद्धक्रिया करण्यास फार सोयीची आहे असें सिद्ध झालें आहे. ज्ञा.

भितीचा धक्का?—सोलापूर क्यांपस्कूलचे आक्टिंग हेडमास्तर रा. शंकरराव उमराणी यांस तिकडील प्लेग अधिकाऱ्यांनीं बोलावून नेऊन, घर तपासणीचें काम सांगितलें. तें शब्द एकताच भितीनें घेरी येऊन ते खालीं पडले व लागलीच अंगांत ताप भरून दुसरे दिवशीं ते मरण पावले.

निजामसरकारच्या दुसऱ्या पायदळ पलटणींतील १०० शिपाई व चार अंमलदार हे निजाम सरकारच्या राज्यांत प्लेग झालेले लोक येऊं नयेंत ह्मणून सोलापुराकडे निजाम सरकारचे राज्याचे हद्दीवर बंदोबस्त ठेवण्या करितां रवाना झाल्याचें इंग्रजी पत्रावरून कळते.

क. त.

निर्मळची यात्रा प्लेगमुळें बंद राहिली.

मद्रासेस कॉलरा सुरू झाला आहे.

सिंकदरियांस गेलेल्या पांच ब्रिटिश मनवारी तेथून दुसरीकडे रवाना झाल्या आहेत

न्यूयार्कच्या मेयरच्या जागीं जज्ज वान वाईक यांची नेमणूक झाली.

ता' १४-१५ स पुष्कळसे तारे तुटून पडतील असें एका इंग्रजी ज्योतिषानें भाविष्य केलें आहे.

लिबरल पक्षाचा जय—पार्लमेंट सभेंतील कानसरवेटिव पक्षाचे बार्नसली प्रांतातर्फेचे सभासद मि. अर्ल कांपटन हे उमरावांच्या सभेंत गेल्यामुळें त्यांची जागा रिकामी झाली होती व त्या जागेकरितां लिबरल पक्षातर्फें मि. वाल्टन, कान्सरवेटीव पक्षातर्फे ब्लाईथ व मजूर लोकातर्फें मि. कॅरन असें तीन उमेदवार पुढें आले होते यांत मि. वाल्टन यांस ६७४८, मि ब्लाईथ यांस ३४५४, व मि. करन यांस १०९१, याप्रमाणें मतें मिळाली व लिबरल पक्षाच सभासद चार हजार अधीक मतांनीं निवडून पुढें आलें

स. वि.

अहमदनगर जिल्ह्यांत राहुरी मुक्कामी एक ८०० शें वर्षांचा संन्याशी आहे त्याचे नांव श्री नारायणदास महाराज असें आहे दंतकथा अशी आहे कीं, तो ३०० शे वर्षांचा आहे परंतु नुकतेच त्यानें एका मामलेदारापुढें मी ८९६ वर्षांचा आहे असें शपथेवर सांगितले. तेव्हां मामलेदारानें एक मनुष्य इतके दिवस कसा जगेल ह्मणून त्याला विचारले तेव्हां त्या सन्याशानें उत्तर दिले कीं प्रत्येक शतकाचे शेवटीं एक नियमीत काळ असतो आणि ह्या काळांत जो कोणी एक महिनापर्यंत समाधी लावून बसते त्याला पुन्हा तारुण्यावस्था प्राप्त होते व याचेंच सांगण्यावरून हा गेल्या दोन शतकांत बनारस येथें जंगली बुवा व गुजराथेंत पारिखिनीबुवा या नांवानें प्रसिद्ध होता व या दोन शतकांत त्यानें काय काय गोष्टी केल्या त्याचें त्याला चांगले स्मरण आहे.

बेळगाव येथील माजी सिव्हिलसर्जन व हल्लीं पेनशन घेऊन लंडनचे इंडिया आफिसांत असलेले कामगार मे० बर्डउड साहेब यानीं बंगालयांत तयार होऊन अमेरिकेचा प्रवास करून आलेलें एक " सांबाचें लिंग,, ज्याचा आपल्या दिवाणखान्यांत ८।१० वर्षे योग्य सन्मान केला, ते लिंग गेल्या आठवड्यांत दिवाळीच्या सुमुहूर्तावर लंडनाहून आपले खर्चानें खानापुरास पाठविले आहे. सदर लिंग बंगाली ११ मण वजन असून तें संगमरवरी दगडाचे आहे हें लिंग इकडे पाठविण्याचा त्यांचा मुख्य उद्देश असा आहे कीं सदर साहेबांचा जन्म बेळगांवांत झाला असून त्याची आमच्या देव वर पुज्य भक्ति असे व ह्मणूनच त्यांनीं इतके दिवस या लिंगाची योग्य व्यवस्था ठेविली होती. पुढें आपले पश्चात कदाचित योग्य व्यवस्था राहणार नाहीं व हा हिंदूचा देव असल्यामुळें त्याची त्यांजकडून पूजा आर्चा वगैरे यथासांग व्हावी अशा पूज्य बुद्धीनें यांनीं हें लिंग चागल्या रितीनें प्याक करून पाठवून दिलें आहे व त्याची स्थापना येत्या मार्गशीर्ष मासी मोठ्या समारंभानें व्हावयाची आहे आणखी असें समजतेकीं, सदर साहेबांजवळ एक रुद्राक्षमाळा व अशाच प्रकाचा दुसरा एक जिन्नस असे यांजवळ आहेत हे दोन जिन्नस आपणाकडे पाठविल्यास त्याचा स्वीकार आपण कराल काय असें खानापूर यथील श्री आत्मानंद स्वामींस विचारण्यांत आले असल्याचें समजतें.

स० शो०

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यानीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर „ ७ „ १ ८

किरकोळ अंकास .......................८

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत रु० १

दर ओळीस........८१ ०६

दुसरे खेपेस .... ......८१

Six monthly......... 3 ............... 8 as

Single copy .................................4as

Advertisement

Below 10 lines ...... 2 Rs

Per line over 10 ......4 as

Repetition Per line...3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXI AKOLA MONDAY 22 NOVEMBER 1897 NO 45

वर्ष ३१ आकोला सोमवार तारीख २२ माहे नोवेंबर सन १८९७ इ० अंक ४५



## जाहिरात

### आयुर्वेदविद्यालय.

प्राचीनार्वाचीन शुद्ध सरणीनें शिकून तयार झालेले वैद्य उत्पन्न होऊन, आपल्या देशाच्या वैद्यकाचें खरें तज्ज लोकांच्या उपयोगीं पडावें ह्मणून हें विद्यालय सुरू करण्यांत आलें आहे हें आतां निराळें सांगणें नकोच. कारण, हें सुरू करण्यास ज्याप्रमाणें मान्य, वजनदार व विद्वान् लोक पुढारी होते, त्याप्रमाणेंच दिवसेंदिवस याचें काम समाधानकारक झालें आहे हें, त्याच्या आजपर्यंतच्या व्यवस्थेवरूनच सिद्ध झालें असून, नवीन व्यवस्थाही विशेष समाधानकारक करण्यांत आली आहे हें प्रत्यक्ष अनुभवानें सर्वांस कळण्याजोगें आहे.

या विद्यालयाच्या पहिल्या वार्षिक परीक्षेंत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे दुसऱ्या वर्षाचे वर्ग, बुधवार ता. १ डिसेंबर सन १८९७ पासून सुरू होणार आहेत.

### नवीन विद्यार्थी दाखल करण्याची प्रवेशपरीक्षा,

सोमवार ता. ६ डिसेंबर रोजीं विद्यालयांत सुरु करण्यांत येईल. दाखल होण्याची इच्छा करणारे विद्यार्थ्यांनीं, साधारणपणें मराठी पांच सहा यत्तांपर्यंत व संस्कृत गद्यपद्याचे अर्थज्ञानपर्यंत अभ्यास केलेला पाहिजे. संस्कृत सेकंड ल्यांगवेज घेऊन म्याट्रिक्युलेशन परीक्षेंत किंवा तशाच रीतीनें ट्रेनिंगस्कुलांत पास झालेल्या विद्यार्थ्यांस, ही परीक्षा देण्याचें भाग पाडण्यांत येणार नाहीं. मराठी ६ व्या यत्तेच्या परीक्षेंत पास झालेल्यास, फक्त संस्कृतांतच तपासण्यांत येईल. डिसेंबर पासून पुढील प्रमाणें वर्ग सुरू होतील:—

| वर्ष १ लें | वर्ष २ रें |
|---|---|
| वनस्पतिशास्त्र. | औषधी–गुणदोष. |
| शारीर. | विष–प्रकरण. |
| औषधी–क्रिया. | आरोग्यता विषय |
| वाग्भट. | वाग्भट |
| औषधांचें मिश्रण करण्याची माहिती. | औषधें करून दाखविण्याची माहिती. |

### नवीन दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांनीं आपले अर्ज,

सोमवार ता. २९ नवेंबर पर्यंत पाठविले पाहिजेत. विशेष माहिती व्यवस्थापकांबरोबर पत्रव्यवहार करण्यानें मिळेल.

ता. २९।१०।९७
आयुर्वेद विद्यालय आफीस
वैद्य प्रभुराम जीवनराम औषधालय
अनंत ऋषीची वाडी, भुलेश्वर मुंबई

पोपट प्रभुराम वैद्य,
एल्. एम्. अँड एस्.,
व्यवस्थापक आनि.


## नोटीस.

ती. मा. श्री शामाई व मंजाई मर्दे पुंजाजी माळी चिंचोळकर राहणार वाडेगांव तालुके बाळापूर या उभयतांस नोटीस देणार सोनाजी व. नारायण माळी चिंचोळकर राहणार वाडेगांव तालुके बाळापूर याजकडून नोटीशीनें असें कळविण्यांत येते कीं तुह्मी माझ्या चुलत्या असून माझ्या चुलत्यानें तुह्मा दोघींस गंधर्वानीं केल्या होत्या हल्लीं माझा चुलता मरण पावला आहे. माझ्या चुलत्यापाशीं जी सर्व जिंदगी स्थावर व जंगम होती ती जी हल्लीं वडिलोपार्जित जंगम जिंदगी आहे शिवाय स्थावर माल शेतें ६ सहा या पैकी निमे शेतें ही जमीन वाडेगांवची असून व तामशी गांवचें १ एक असें शेत हेंही वडिलोपार्जित आहे त्याजबद्दल तुह्मी मे. तहशिलदार साहेब बाळापूर यांच्या पुढें तकरारी केल्या परंतु सदरहु शेताचें खातें माझें नांवानें झालें असून त्या सर्व शेतांवर व जंगम मालावर मी सरळ वारीस आहे हल्लीं वाडेगांव येथील तुह्मी दोन चार इसमाचे नादी लागून त्या जिंदगीवर कर्ज काढण्याचे इरादयांत आहां असें आह्मांस समजतें करितां तुह्मास या नोटीशीनें असें कळविण्यांत येते कीं तुह्मा उभयतांचा हक्क अन्नवस्त्राचा आहे तो असा आहे कीं तुह्मी पुंजाजी व. मानाजी माळी राहणार वाडेगांव हा मयत याचे नांवावर आमरणांत रांडमुंड राहिलें पाहिजे ह्मणजे तुमचा चालत आलेला वडीलपणाचा मान कायम आहे. पुंजाजी वल्लद मानाजी माळी याची स्थावर व जंगम वगैरे इस्टेट जी आहे त्याची कोणतेही प्रकारची व्यवस्था करण्याचा तुह्मांस बिलकूल कोणत्याही प्रकारानें काडी इतका हक्क नाहीं फक्त अन्नवस्त्राचा तुह्मी पुंजाजी यांच्या नांवावर रांडमुंड राहिल्यास तुमचा हक्क आहे.

माझा चुलता नामे पुंजाजी वल्लद मानाजी मयत झाल्यावर तुह्मी लोकाचे नादी लागून मजला लोकाचें कर्ज काढणें भाग पडलें व हल्लीं स्थावर जिनगी आज रोजीं मी सावकारास त्या कारिता गाहाण लिहून दिली आहे वरून तुह्मांस सुचना करण्यांत आली आहे ह्मणून दिली नोटीस ता. २०।११।९७ इ०

सही

सहीची निशानी वखर सोनाजी वल्लद नारायण माळी चिंचोळकर राहणार वाडेगांव तालुके बाळापूर नि० खुद्द हातची असे

## जाहिरात

सर्व लोकांस खालीं सही करणार याजकडून या जाहिरातीनें असें जाहीर करण्यांत येतेकीं शामाई व मंजाई मर्दे पुंजाजी माळी चिंचोळकर राहाणार वाडेगांव तालुके बाळापूर या दोघीजणी वाडेगांव येथील एक दोन मनुष्याचे नादी लागून वाडेगांव येथील जंगम व स्थावर जिनगीची अफरातफर करण्याच्या विचारांत असून विनाकारण लोकांचें कर्ज करण्याचे इरादयांत आहेत ह्मणून ह्या जाहिरातीनें कळविण्यांत येते कीं सर्व जंगम व स्थावर इस्टेटीचा मालक मी आहे. व शामाई व मंजाई या उभयतां पासून मैयत पुंजाजी वल्लद मानाजी याची स्थावर व जंगम वगैरे सर्व प्रकारची इस्टट जी आहे, ती कोणी गहाण, खरेदी, बक्षीस वगैरे कोणत्याहि प्रकारानें माझ्या संमती शिवाय घेऊं नये घेतल्यास त्याबद्दल जबाबदार सदर्हू मैयत पुंजाजी याची स्थावर व जंगम इस्टेट व आह्मी बिलकूल नाहीं ज्याचा तो आहे. शामाई व मंजाई यांस ही एक निराळी नोटीस दिली आहे. या उभयतांचा हक्क मैयत पुंजाजी यांच्या मागें मरेपर्यंत त्या रांडमुंड राहिल्यास । ह्मणून दिली जाहिरात कळावें. ता २०।११।९७ इ०

सही

सही वखर सोनाजी वल्लद नारायणजी माळी चिंचोळकर रहाणार वाडेगाव ता० बाळापूर निशानी खुद्द हातची असे.

## नोटीस

तुकाराम वल्लद कृष्णाजी पावसे राहणार मौजे पमगेरी तालुके संगमनेर जिल्हा अहमदनगर यास खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मौजे मजकूर येथील शिवारातील आमचे खरीदीची व मालकीची जमीन सर्वे नंबर १६ एकर १०८।९ ही धान्य बाजरी सोळापण वैरण १५०० या प्रमाणें मक्त्यानें व सर्वेनंबर १२७ पैकी एकर ७८७ ही अर्धेलीचे करारानें; (उत्पन्नातील निमे हिस्सा) दोन वर्षाचे मुदतीनें तुह्मास वाहण्यास दिली त्याप्रमाणें तुमची मुदत सालमजकुर संपली पुढें तुह्मास जमीन वाहितीस देण्याची नाहीं तरी तुह्मी सदर्हू जमिनीतील खरीप पीक काढून घेऊन जमीन आमचे तर्फे आमचा भाऊ रामचंद्र गणेश पांडे याचे ताब्यांत द्यावी व मक्त्याचे धान्य वैरण व सर्वेनंबर १२७ याचे निमे उत्पन्नाचे धान्य वैरण सुद्धां त्यास देऊन पावती घ्यावी व जमिनीची नांगरणी करूं नये. तुमची आमची शर्त व भाडेपट्टा ही फक्त खरीप पिकाचा आहे. रबीचे पीक करूं नये. वर लिहिल्या प्रमाणें एक महिन्याचे आंत तुमचे कडून न झाल्यास कायदेशीर तनवीज करावी लागेल व सदर्हू नोटिशीचे खर्चासह एकंदर खर्चे तुह्मास द्यावा लागेल. कळावे तारीख १३ नोव्हेंबर सन १८९७ इसवी.

सही

अनंत गणेश मोजणीदार रिवीजन सर्वे (सी) पार्टी तालुके मोर्शी जिल्हा उमरावती

### JOCK O' HAZELDEAN

'Why weep ye by the tide, ladie?
 Why weep ye by the tide?
I'll wed ye to my youngest son,
 And ye sall be his bride:
And ye sall be his bride, ladie.
 Sae comely to be seen'—
But aye she loot the tears down fa'
 For Jock ot Hazeldean.

'Now let this wilfu' grief be done,
 And dry that cheek so pale;
Young Frank is chief of Errington
 And lord of Langley-dale;
His step is first in peaceful ha',
 His sword in battle keen'—
But aye she loot the tears down fa'
 For Jock of Hazeldean.

'A chain of gold ye sall not lack,
 Nor braid to bind your hair,
Nor mettled hound, nor managed hawk,
 Nor palfrey fresh and fair;
And you the foremost o' them a'
 Shall ride our forest-queen'—
But aye she loot the tears down fa'
 For Jock of Hazeldean.

The kirk was deck'd at morning-tide
 The tapers glimmer'd fair;
The priest and bridegroom wait the bride,
 And dame and knight are there:
They sought her baith by bower and ha';
 The ladie was not seen!
She's o'er the Border, and awa'
 Wi' Jock of Hazeldean.

*Sir W. Scott*

### वसंत पुरस्थ जनार्दन

उगिच कां रडतेस वदे तटीं ।
तटिनिच्या जलसान्निध गोमटि ! ॥
मजसवें चल गे तुजला सये ! ।
वरिल मत्सुत कामिनि ! निश्चयें ॥ १ ॥
तव मनोहर भामिनी! आकृती ।
ममसुतासि वरी; जगिं हो कृती ।
परि वसंत पुरस्थ जनार्दना ।
स्मरुनि ढाळित अश्रु वरांगना ॥ २ ॥
उगिच खेद नको. तंव नाद हा ।
विफल. अश्रु न ढाळि उगी रहा. ॥
सुत मदीय कालिंगपती असे ।
शत तुरंगम संगतिं घेतसे ॥ ३ ॥
वचन लोलुप योषित संगतीं ।
असिलता राणि तीक्ष्ण तदीय ती ॥
पारि वसंत पुरस्थ–जनार्दना ।
स्मरुनि ढाळित अश्रु वरांगना ॥ ४ ॥
कनक भूषण काय तुला उणें ।
स्तन युगीं धरि हार वरांगने ॥
वरुन भर्जरि घे रति मंजरी ! ।
झटिति सुंदरि ! ये सुतमंदिरिं ॥ ५ ॥
कमालिनीस जसा अलि सेवितो ।

तव पदीं सुत होईल लीन तो ॥
परि वंतत पुरस्थ—जनार्दना ।
स्मरूनि ढाळित अश्रु वरांगना ॥ ६ ॥
झटिति मंडप भव्य उभारिला ।
उषसि सर्व सुहृद्गण पातला ॥
द्रविण लोलुप ये भट तत्स्थलीं ।
वर उभा वरमायहि पातली ॥ ७ ॥
भवनि शोधिति शोधिति अंगणीं ।
परि वधू गवसे नचि त्या क्षणीं ॥
ननु वंतत पुरस्थ जनार्दना– ।
सह वनांतरि जाय वरांगना ॥ ८ ॥

---

वऱ्हाडसमाचार

---

मिती कार्तिक वद्य १३ शके १८१९

---

यंदा सरकारी वार्षिक रिपोर्ट नियमित वेळेवर प्रसिद्ध झाले परंतु इतर अधीक महत्वाच्या विषयांच्या गर्दीमुळें आह्मांस त्या रिपोर्टा संबंधानें लोकांस माहिती देतां आली नाहीं. निरनिराळ्या खात्याच्या रिपोर्टा पैकीं आह्मी प्रथम फौजदारी न्यायखात्याचा रिपोर्ट आज घेत आहों. मे० आवर्ड साहेबांचे रिपोर्ट माहितीनें भरपूर असतात आणि त्यांची लिहिण्याची शैली अगदीं साधी पण अत्यंत मनोहर असल्यामुळें त्यांच्या रिपोर्टांच्या वाचनानें मनुष्याला पुष्कळ गोष्टी शिकतां येतात. गेल्या १८९६ सालीं वऱ्हाडांत एक सेशन जज्ज, ६ जिल्हा मानिस्ट्रेट, २३ माजिस्ट्रेट वर्ग १, १७ वर्ग २, १९ वर्ग ३, १२ स्पेशल माजिस्ट्रेट, ४ बेंच माजिस्ट्रेट मिळन ७८ फौजदारीची अव्वल कोर्टें होतीं. एकंदर १९२२३ गुन्हा संबंधानें खबर देण्यांत आली पण त्या पैकीं २३५९ खटले रद्द करण्यांत येऊन ७५८ गुन्ह्याच्या खबरी खोट्या ठरल्या. बाकी १६१०६ खटले खरे ह्मणून दप्तरीं शेरिक करण्यांत आले आणि त्यांपैकीं १३८६८ गुन्हे फौजदारी कोर्टापुढें चालविण्यांत आले.

सन १८९५ साला पेक्षां १७४६ खटले १८९७ सालीं अधीक होते. गुन्ह्यांची संख्या वाढण्याला कारणें दोन प्रकारचीं दाखविण्यांत आलीं आहेत. पहिलें कारण दुष्काळ होय. दुखापती, मारामारी, प्रतिबंध, आगळीक इत्यादि अपराधांची संख्या पुष्कळ वाढली आहे आणि आनररी अव्वाची, वगैरे माजिस्ट्रेटांकडे फिर्यादीही अधीक दाखल झाल्या व केव्हां केव्हां एका अपराधा बद्दल दोन्ही बाजूंनीं फिर्यादी केल्या. हीं कारणें दर्शवून त्याशिवाय मे. आवर्ड साहेब या संबंधानें लिहितात कीं लोकसंख्येची वाढ, नव्या नव्या कायद्याखालीं वडणारे नवे गुन्हे आणि सालोसाल गुन्ह्यांच्या गणती विषयीं घेतलेली काळजी यावरून पाहतां गुन्ह्यांची संख्या वाढली पाहिजे असें सहजीं अनुमान होतें. गुन्ह्याची संख्या अशा प्रकारें वाढली तथापि ज्या वाईट कृतीला सर्व लोक गुन्हा मानतात त्या कृतीसंबंधाचे पुष्कळसे गुन्हे नसतात हें विशेष ध्यानांत धरलें पाहिजे.

आरोपीला बोलावण्या पूर्वींच २३५९ फिर्यादी काढून टाकण्यांत आल्या. १८९५ पेक्षां १७१ नें ही संख्या कमी आहे तथापि मे. आवर्ड साहेबांनीं फिर्यादी काढून टाकण्याबद्दल मोठ्या बारकाईनें चौकशी केली आहे. बुलढाणें जिल्ह्यांत फिर्यादी पहिल्याच चौकशीच्या वेळीं कमी काढून टाकल्या यांचें कारण क्यापटन कोलंब यांची दक्षता होय. फिर्याद विनाकारण रद्द होत नाहीं हें पाहण्याकडे त्यांचें विशेष लक्ष्य पोचलें होतें आणि ह्मणूनच बुलठाणें जिल्ह्यांत फिर्यादी अगदीं कमी रद्द झाल्या. इतर जिल्हा माजिस्ट्रेटांनीं या बाबतींत चांगलें लक्ष्य पुरविलें आहे. अशा देखरेखीनें कनिष्ठ माजिस्ट्रेटांवर दाब राहतो आणि सर्व काम विशेष कसोशीनें व चोखपणानें होतें. वाशिमचे डिपुटी कमिशनर मि. रुस्तुमजी व अकोल्याचे डिपुटी कमिशनर मि० मीडो यांनीं आपल्या हाताखालींल माजिस्ट्रेटांच्या हातून फिर्याद विनाकारण रद्द होऊं नये ह्मणून पुष्कळ देखरेख केली आहे. फिर्यादींतला मजकूर, फिर्यादीची तपासणी, किंवा पूर्व चौकशी समाधानकारक नाहीं ह्मणूनच फिर्याद रद्द होते असें नाहीं. या शिवाय दुसरीं कारणें ह्मणजे अपसांत समजूत, फिर्यादीची गैरहजिरी, प्रोसेस फ्री न देणें, दिवाणी कोर्टाकडे जाण्यासाठीं दिलेली समज वगैरे आहेत. या दुसऱ्या प्रकारच्या विविध कारणामुळें एखादी फिर्याद रद्द झाली तर ती २०३ कलमा खालीं रद्द झालेल्या फिर्यादी मध्यें खरोखर दाखल होऊं नये परंतु मे. आवर्ड साहेबांच्या मतानें व्यावहारिक उपयोगा साठीं तिची गणती तशी केली तरी हरकत नाहीं परंतु सर्व कचेऱ्यांतून अशीच एक सारखी गणती करण्या विषयीं पद्धत चालूं असली पाहिजे. उमरावतीचे डिपुटी कमिशनर मि. लुकस यांनीं या बाबतींत अगदीं दुर्लक्ष्य केलें आहे. त्यांची सबब अपूर्व आहे. ते ह्मणतात कीं वऱ्हाडांतील कारभाराची मला माहिती नाहीं. पण मे. आवर्ड साहेब व अलिशान रेसिडेंट यांनीं मार्मिकपणानें सालंकृत बक्षीस दिलें आहे कीं वऱ्हाडची शीस्त लवकरच झपाट्यानें या राजश्रीला लागत चालली आहे आणि तीच इतर प्रांतांतल्या पेक्षां उत्तम आहे अशी यांची मनाची शहानिशा होईल. मि. लुकस यांच्या विषयीं मे. आवर्ड ह्मणतात कीं दुसरा वार्षिक रिपोर्ट लिहिण्याच्या सुमाराला वऱ्हाडच्या रिती बहुत करून त्यांना लागतील आणि या विषया वरील त्यांचे अभिप्राय व टीका हीं मला पुढील वर्षीं वाचण्यास मिळतील अशी उमेद आहे; त्यांचा अभिप्राय व टीका वाचून आपणास एखाद्या नवीन गोष्टीचा विचार सूचेल. मि. आवर्ड साहेब मनुष्यस्वभावाचे पूर्ण वेत्ते आहेत आणि कोणाची कशी गंमत करावी व त्याला मार्गाला लावावें हें त्यांच्या रिपोर्टां वरून उत्तम शिकण्या सारखें आहे. व्यक्तिविषयक गोष्टी लिहितांना ते मोठी आल्हादकारक खुबी योजतात आणि उपरोधिक किंवा लाक्षणिक दूषणें लावण्याच्या भानगडींत पडत नाहींत. मोठ्या सरळ व निर्भीड मनोवृत्तीनें अभिप्राय कसा लिहावा हें यांच्या रिपोर्टांवरून चांगलें कळतें.

गुन्ह्याच्या स्वरूपावरून गुन्ह्यांची वर्गवारी केली तर असें दिसून येईल कीं चोऱ्या दरवडे, अपक्रिया वगैरेचे गुन्हे ३६२ वाढले. एकंदर २७५० गुन्हे घडले. खुनाचे खटले देखील पुष्कळ झाले. पण सर्व प्रकारच्या गुन्ह्यामध्यें १०७० नें दुखापतीचे अधीक गुन्हे कोर्टा पुढें आले एकंदर अशा गुन्ह्यांची संख्या ३२७१ आहे. या विलक्षण वाढी संबंधानें अनेक अधिकाऱ्यांनीं अनेक कारणें दाखविलीं आहेत. मि० लुकस साहेब ह्मणतात कीं १८९५–९६ सालीं पीकें चांगलीं आलीं, लोकांच्या हातीं पैसा आला आणि ह्मणूनच लोकांनीं फिर्यादींत तो उधळून टाकला. हें कारण अगदीं चुकीचें आहे हें विशेष स्पष्टतेनें कळविण्याची जरूरच नाहीं. कारण मात्र कल्पनेला श्रमवून शोधल्या प्रमाणें भासतें. आंब्याचा मोसम चांगला होता ह्मणून तंटे बखेडे फार झाले असें ही कित्येक ह्मणतात. मे आवर्ड साहेब या संबंधानें ह्मणतात कीं या रिपोर्टाच्या वर्षीं लोकांचा स्वभावच चिरचिऱ्या बनला होता. वर्षभर दुष्काळ होता. उन्हाळा कडक होऊन पाऊस आरंभीं पुष्कळ पडल्यावर एकदम नाहींसा झाला, व बाजारभाव फार तेज झाले या मुळें लोकांचें स्वास्थ्य लयास गेलें, ते चिरडखोर झाले, आणि नाना निकराच्या गोष्टीकडे त्यांचे विचार धावल्यामुळें वेळ येई तेव्हां ते मनाची उसळी बाहेर काढूं लागले. १८९६ च्या साल अखेरीला दुष्काळाचा कडाखा उडाला तेव्हां फौजदारी खटले पुष्कळ करण्यांत आले आणि त्यामुळें त्या वेळीं नेहमी पेक्षां तुरुंगांत अधीक आरोपी राहिले गेले.

( पुढें चालू )

---

नामदार बाळ गंगाधर ठिळक यांच्या खटल्याची समग्र हकीकत इंग्रजींत मेसर्स देशपांडे व सेटलूर या विद्वानांनीं प्रसिद्ध केल्या पासून इंग्रजी भाषा जाणणाऱ्या सर्व लोकांस त्या खटल्याचा इतिवृतांत फार सुंदर रितीनें कळला आहे. नामदार टिळक तुरुंगखान्यांत देह झिजवीत आहेत तथापि सर्व राष्ट्र त्यांचें अभीष्ट चिंतण्यांत व त्यांची शिक्षेंतून मुक्तता करण्यासाठीं परमेश्वरास आळविण्यांत मनोभावानें पण मुकेपणानें निश्चल व चिंतातूर झालें आहे. नामदार स्ट्राची यांनीं राजद्रोहात्मक लेखाची व्याख्या आपल्या संजीवनी टीकेच्या प्रकाशानें कितीही चांगली खुलासेवार केली तरी ज्या कायद्याला लोकसंमती नाहीं व जो कायदा अशा अर्थाच्या संबंधानें मोडला गेला असतांना लोकांस विषाद न वाटतां उल्लंघन करणाऱ्याची मानमान्यता होते तो कायदा सरकारच्या उपयोगी पडला ह्मणून तो चांगल्या कायद्याच्या पदाला पोंचत नाहीं. राजकीय गोष्टींत राजभक्त व प्रजानिष्ट लोकाग्रणीवर असा पिनल कोडाचा गोळीबार राजद्रोहाच्या मिषानें चालतो हें आमच्या देशाचें दुर्भाग्य होय.

---

प्लेगचा फैलाव मोठा भयप्रद झाला आहे हा रोग संसर्गानें अतिशय वाढतो आणि याचा पाय एकदां ज्या भागांत शिरला तेथें तेथें मृत्यूचें ठाणें जबरदस्त बसतें. पुण्यास अगदीं गहजब उडाला आहे. पुणें शहर ओस पडण्या जवळ जवळ येत चाललें आहे. सोलापूरची वस्ती सगळी सहावी हिस्सा राहिली आहे. मुंबईसही या रोगानें माणसें मरत आहेत पण हो मरणाची संख्या कमी आहे तथापि तिची वाढ मनाला मोठी काळजी उत्पन्न करिते मालेगांवाला प्लेगची मजल येऊन पोचली आणि तिचा प्रवेश आंतील भागांत होत चालला आहे. गुजराथ, सिंध, पंजाब, वायव्य प्रांत इत्यादि भागांत या रोगाचें वास्तव्य होऊं पहात आहे. वऱ्हाड, मध्यप्रांत, बंगाल इलाखा व मद्रास इलाखा हे प्रांत या रोगापासून अलिप्त दिसतात पण ही अलिप्तता कितपत टिकेल याची भ्रांतीच आहे वऱ्हाडचा मुलूख केव्हां ग्रासला जाईल याचा नेम नाहीं; आणि इकडील भागांत प्लेग आला ह्मणजे त्याचा विस्तार किती बाजूंनीं वाढेल हें कल्पनेनेंच कळण्या सारखें आहे. इंडियाच्या बरोबर मध्यभागीं हा प्रांत आहे आणि याचा संबंध रेल्वे पासून दूर असलेल्या पुष्कळ भागांशी आहे.

प्लेगच्या प्रसाराचीं दुष्ट चिन्हें ओळखून अलिशान रेसिडेंट साहेबांनीं वऱ्हाड प्रांता साठीं प्लेग संबंधानें कडक नियम केले आहेत. यांचा हेतु इतकाच कीं या प्रांतांत निदान प्लेगचा शिरकाव न होऊं देण्या विषयीं माणसाच्या हातचे सर्व प्रयत्न करून सोडावे. या नवीन नियमांनीं कमिशनर व डिपुटी कमिशनर या अधिकाऱ्यांस संपूर्ण अधिकार दिले आहेत. प्रसंग पाहून जो योग्य दिसेल तो उपाय त्यांनीं बेलाशक योजावा. लोकांस विनाकारण त्रास न होईल, लोकांचे रितरिवाज पाहून व स्त्री जाती विषयीं योग्य खबरदारी घेऊन तपासणी वगैरे आवश्यक गोष्टी करण्यांत येईल, आणि आजारी माणसाची इच्छा व सौख्य हीं न विसरतां बरोबर पाहण्यांत येतील अशा धोरणावर सर्व आवश्यक व्यवस्था सार्वजनिक संरक्षणा साठीं करावी आणि त्याबद्दल लोकांचीं मनें अनुकूळ करून घेण्यासाठीं आपली पराकाष्ठा करावी असा डिपुटी कमिशनरांस हुकूम आहे. या नियमांतलि मुख्य मुख्य गोष्टी लोकांच्या माहिती साठीं आह्मी खालीं देतो:—

( १ ) ज्या भागांत प्लेगची भीती वाटेल तेथें प्लेगला प्रतिबंध करणारी प्लेगविषयक अधिकारी मंडळी नेमण्यांत यावी.

( २ ) प्लेगविषयक अधिकारी रेल्वे स्टेशनावर उतारूंची तपासणी कडक रितीनें करावितील. जरा संशयाचें स्थळ वाटलें तर त्या उतारूस खालीं उतरून घेतील.

( ३ ) शहराचे किंवा गांवाचे बाहेर चौकी बसवून रोगग्रस्त किंवा संशयित उतारूस तपासणी साठीं रोखून ठेवण्यांत येईल.

( ४ ) एखाद्या भागाला तसाच नियम लागू केला तर तेथील घरोघरच्या लोकांनीं आपल्या घरीं [ अ ] आजारी मनुष्य झाल्यास, ( ब ) मृत्यु झाल्यास ( क ) प्लेग-ग्रस्त भागांतून कोणी पाहुणा आल्यास त्या

बद्दलची खबर प्लेगकडील अधिकाऱ्यांस दिलीच पाहिजे.

( ५ ) ज्या मनुष्याला प्लेग झाल्याचा किंवा होत असल्याबद्दलचा संशय येईल त्याला दहा दिवसांच्या मुदती पर्यंत अडकविण्यांत येईल.

( ६ ) सेग्रीगेशन क्यांप मध्यें ज्या लोकांस नेणें जरूर वाटेल त्यांस नेण्यांत येईल.

( ७ ) जें घर अस्वच्छ वाटेल तें बंद करण्यांत येईल जरूर पडल्यास लोकांस आपलीं घरें, महेला किंवा एखादा विविक्षित भाग सोडावा लागेल. आणि प्रसंगविशेषीं घरें, झोपड्या, कपडेलत्ते, चीजवस्त वगैरे दूर करण्यांत किंवा जाळण्यांत येईल.

( ८ ) जत्रा, ज्ञातिभोजनें, समाज वगैरे देखील कमिशनर साहेबांच्या मंजुरातीनें तहकूब करण्याचा अधिकार देण्यांत आला आहे.

( ९ ) खेडे गांवांतील पाटलानें आपल्या गांवच्या संरक्षणासाठीं बाहेरच्या प्लेगग्रस्त दिसणाऱ्या लोकांस गांवांत येऊं देऊं नये.

( १० ) जो कोणी सरकारचा कोणताही हुकूम मोडील त्यास पिनल कोड प्रमाणें शिक्षा होईल.

---

## टिळकांचें अपील नामंजूर.

अखेरिस नामदार टिळकांच्या खटल्यांत प्रीव्ही कौंसिलाकडे अपील झालें आणि गेल्या शुक्रवारीं निव्वळ कायद्याच्या मुद्यावर अपील नामंजूर झालें. ! खटल्यांतील गोष्टीकडे प्रीव्ही कौंसिलनें लक्ष्य पुरविलें नाहीं कोणतें शद्ब राजद्रोहाचे आहेत हें सरकार तर्फे दाखविण्यांत आले नव्हतें आणि Disaffection ( अप्रीती ) या शद्बाचा अर्थ न्यायाधिशांनीं चुकीचा जुरीला समजावून दिला या मुद्यावर अपील होतें आणि तें रद्द झालें. ईश्वरी इच्छेला सादर राहिलें पाहिजे. न्यायकार्टाची मजल संपली!

आतां मुंबई हायकोर्टांतून 'प्रतोद' पत्रावरील खटल्याचा निकाल बाहेर पडावयाचा राहिला आहे. निकालाची दिशा दिसतच आहे.

वऱ्हाड शिक्षक समाजाला गेल्या बुधवारीं प्रारंभ होऊन गेल्या शनिवारीं समाजाचे विसर्जन राव बहादूर वटवर्धन डायरेक्टर साहेबांच्या हातून झालें. पुष्कळ उपयुक्त विषयांवर व्याख्यानें व वादविवादहीं झालीं, या शिवाय इतर गृहस्थांचीं 'महमदाचे चारित्र' 'अज्ञेय मीमांसा' व 'नैतिक शिक्षण' या विषयावर भाषणें झालीं- साद्यंत हकीकत मागाहून देण्यांत येईल.

वऱ्हाड सामाजिक सभेची वार्षिक बैठक रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी यांचे अध्यक्षते खालीं गेल्या बुधवारीं उमरावतीला झाली. मंडळी पुष्कळ जमली होती. नामदार आनंदा चार्लू यांच्या देवस्थानाच्या कारभारा विषयींच्या बिलावर व 'धर्मादाय' या विषयावर व्याख्यानें झालीं. राव बहादूर रानडे यांनीं सुचविलेले सर्व विषय राष्ट्रीय परिषदेपुढें मांडावे असें ठरलें.

# The Berar Samachar

MONDAY NOVEMBER 22 1897

The plague is very bad in several parts of India. The cup of human misery is filled to the brim where it prevails most. The disease betrays man's failure to grapple with it. Man has to learn to abide the decree of God. No one knows when and how it will be stamped out. Prevention is the only remedy in provinces free from the plague. The Local Government was alive to the immense loss of life that its spread threatens in all probabilities. In right earnestness the Resident has issued a circular order dated 17th current with a view to strengthen the hands of the officers in the province with sufficient provisions of law to prevent the outbreak or spread of the deadly disease. Stringent measures are proposed to check its spread in Berar. Full authority is vested in the Commissioner and the Deputy Commissioners to take any steps that the occasion, the public safety and the general convenience will dictate to them. We hope that God will save this province from all sorts of remedies proposed in these rules. We can however assure the Government that there will be loyal and heartfelt cooperation on the part of the people in whatever measures they will deem fit to adopt in the common interest of the people.

Owing to the spread of the plague we have our own misgivings about the programme of the Congress. The question recurs obtrusively to our mind that whether we should or should not have the Congress in December next. The problem is of great magnitude to the public safety and we request the Reception Committee to consult twice before they decide once for all. The Local Government have obliged us by their favourable attitude towards the Congress but the plague—rules contain a prohibitory measure to stop *assemblages which are likely to assist the spread of the plague.* No one knows when this measure will become a matter of extreme necessity. The Commissioner will also be in a fix as well as the Reception Committee when he honestly determines to take this decisive step. The matter is urgent and requires a prudent and careful consideration. It is not yet too late to consult the other Congress—Committees in this connection. The communication which Mr. R. N. Mudholkar, Secretary of the Reception Committee addressed to Mr. F. S. Bullock I. C. S. C. I. E. on the 2nd instant was no doubt a happy one and we think that an assemblage of 3000 people in all will pass off successfully without a friction. But to our plain mind, the position of affairs seems less secure and rather changed. We shall be glad if the Receiption Committee once more give out their final decision.

The Tilak appeal faild to secure a hearing from the Privy Council. The matter ends here and we are sorry for the honorable gentleman— a viction of law! It is indeed a political thunderbolt to the whole nation!

A case which excited a great deal of interest not only in legal but in all other circles, has at last, within the last fort-night, been settled in a manner, which we are sure, will be considered satisfactory by all who have hitherto taken any the least interest in it. Our readers probably remember, that in consequence of information given by a man, taken up by another, and communicated by a third who is an honorable gentleman in good official position, a notice was issued to Mr. Desai. a leading local pleader, to show cause why his case should not be brought to the notice of the Local High Court with a view to his conduct which his accusers alleged to be unprofessional, being dealt with according to law. Mr. Desai showed cause, and the court which issued the notice, after recording some evidence discharged the rule on the ground of the evidence in support of it being discrepant. This freed Mr. Desai from the intanglement in which his accusers sought to involve him, but he could not rest satisfied with the result because, his character was not cleared He therefore applied for permission to prosecute the most prominent of his accusers. One of them rendered what was considered a sufficient apology and obtained Mr. Desai's forgiveness. Over the head of the other the application for permission to prosecute remained hanging but was rejected by the highest magistrate here. Against this order of refusal of sanction, an appeal was presented to the Civil and Session's Judge and that officer, after studing carefully all the facts of the case, formally declared the conduct of Mr. Desai absolutely stainless. Thus the accuser who, by the bye, is not a man of consequence, drops out of view, and *statu quo ante* is completely restored. Incidentally a sharp lesson has been read to those who offended against society by eavesdropping and carrying tales. We heartily congratulate Mr. Desai on his scoring in all directions.

## वऱ्हाड

हवामान—थंडी चांगली पडत असेत. रोगराई विशेष ह्मणण्या सारखी नाहीं. पीकें ८।१० आणे आलीं आहेत.

रा. रा. नारायण रामराव क्लार्क आफकोर्ट, वाशिम हे पुन्हा चार महिन्यांच्या रजेवर आजारीपणामुळें जात आहेत.

रा. रा. हरी कुकाजी शेगांव, यांनीं एकाला मोठी दुखापत केली होती त्या बद्दल त्यास मे. अजिजुद्दीन साहेबांनीं ५०० रुपये दंड व दोन दिवसाची साधी कैद अशी शिक्षा दिली.

भुसावळच्या बाजूनें येणाऱ्या प्रत्येक उतारूंची मलकापूर स्टेशनावर तपासणी होईल. संशयाचा प्रकार वाटल्यास त्यास खालीं उतरून घेऊन ७ दिवस पर्यंत त्यास तपासणी करितां पृथक् ठेवण्यांत येईल.

मि० प्रीडो साहेब डेपुटी कमिशनर यांची स्वारी सध्या आकोले तालुक्यांत फिरत आहे. साहेब बहादूरांच्या दवऱ्याच्या तारखा गांववारीनें सर्व लोकांच्या उपयोगासाठीं आह्मी खालीं देत आहों:—

| तारीख. | मुक्कामाचा गांव |
|---|---|
| २२ नोवेंबर | पिंजर. |
| २३।२४ | दोनद. |
| २५ | एरंड. |
| २६ | कानसिंणी |
| २७ | पातूर. |
| २८।२९ | कुरणखेड. |
| ३० | बोरगांव |

औरंगाबाद कांटोनमेंट येथील असिस्टंट कमिशनरची एक जागा कमी करून तिच्या ऐवजीं दोन एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनरच्या जागा नवीन करण्यांत आल्या. त्यांवर तारीख ७ एप्रिल सन १८९७ पासून खालील आफिसरांस बढती देण्यांत आली आहे:—

| मिस्टर | ए. अ. कमि चा वर्ग. |
|---|---|
| एदलजी जमशेटजी संजाना, आकोला | ३ रा. |
| हैदरअल्ली, अव्याची यवतमाळ. | ४ था |

रेसिडेंट साहेबांचे असिस्टंट व सेक्रेटरी मि. ए. एफ. पीन्हे याची बदली दुसरी कडे झाल्या मुळें त्यांच्या हुद्यावर मि. सी. एच. ए. हिल पोलिटिकल एजंट वर्ग २ यांस नेमण्यांत आलें.

इंग्रजी ४।५।६ या इयत्तांच्या वार्षिक परीक्षांचा निकाल स्थळवारीनें असा आहे:-

| शाळा. | इयत्ता. ४ थी | ५ वी | ६ वी. |
|---|---|---|---|
| उमरावती | ६६ | ५९ | ३३ |
| पास. | ३३ | ३७ | २३ |
| आकोला | ९१ | ६३ | ३२ |
| पास. | २६ | ४० | १८ |
| आकोट | १९ | १० | |
| पास. | ९ | ४ | |
| मलकापूर | १२ | ११ | |
| पास. | ५ | ९ | |
| मेहकर | ६ | | |
| पास. | ४ | | |
| जळगांव | १२ | | |
| पास. | २ | | |
| वाशिम | ११ | | |
| पास. | २ | | |

आकोल्याच्या दोवा प्रसिद्ध वकीलांवर धंद्याच्या संबंधानें तोहमत आल्या बद्दल आमचे बंधु वैदर्भकार यांनीं प्रसिद्ध केलें होतें तें वाचकांस स्मरत असेलच. आह्मास कळविण्यांस आनंद वाटतो कीं रा. रा. नारायण काशिनाथ दाते बी. ए. यांच्या वरील प्रकरण निरर्थक आहे व त्यांत कांहीं गैरगोष्ट नव्हती असा मे. प्रीडो साहेबांनीं नुकतांच निकाल केला आणि रा. रा. व्यंकटेश कृष्ण देसाई यांच्या संबंधानें सेशन जज्ज यांनीं निकाल केला कीं त्यांचें वर्तन निर्दोष असून कांहीं एक चूक त्यांच्याकडे नाहीं.

## आकोला बाजारभाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ८८ रुपये |
| जवारी | ८५ रु० |
| दादरी | ९० रु० |
| गहूं ( कांठे ) | १३० रु० |
| ,,( वनशी ) | १४० रु० |
| चणे | ११५ रु० |
| तेल | ६॥ रु० मण |
| तूप | ८ मण |
| मीठ | ३॥।= मण. |
| सोनें | २५ तोळा |
| चांदी | ७५ |

## वर्तमानसार.

एक मुका बोलूं लागला !—किमो येथील एक २१ वर्षांचा गार्डड नांवाचा मनुष्य, लहानपणीं एका भयंकर रोगानें आजारी होऊन त्याची वाचाशक्ति मुळींच नाहींशी झाल्यामुळें अगदीं मुका झाला होता. परंतु थोडे दिवसाखालीं त्याची वाचाशक्ति पूर्ववत त्याला येऊन तो आतां बोलूं लागला ! एके दिवशीं तो आपले बहिणीला खुणेनें सुचवीत होता कीं, मला तंबाखू प्यावयाची आहे; तर ती व नळी आणून दे. परंतु ती दुसऱ्या कांहीं कामांत गुंतली असल्यामुळें तिचे त्याच्या खुणांकडे लक्ष्य गेलें नाहीं; व त्या गर्दींत त्याचे तोंडून एकदम "तंबाखू पाहिजे" असे विनतूक शब्द निघाले. आणि तेव्हांपासून तो आतां सर्व प्रकारचा भाषणव्यवहार करण्यास समर्थ झाला !

राजा उदार झाला × × × !—लीथ (स्कॉटलंड) येथील मुख्याधिकारी (प्रव्होस्ट) यांस स्कॉटलंडच्या सेक्रेटरीमार्फत राणीसरकारांनीं एक ज्युबिलीचा चांद पाठविला. महाराणीसाहेबांकडून हा चांद आपल्याला बक्षीस आल्याबद्दल सदर अधिकारी तेथील टाऊन कौन्सिलमध्यें आभार मानण्यास उभा राहून त्यानें कळविलें कीं, आमच्या राज्याधिकारिणीकडून मला दोन शिलिंग किंमतीचा (दीड रुपयाचा) आलेला चांद मी सादरें स्वीकृत करितों, पण हा त्यांनीं पाठविला नसता तरी मी शांत खुष राहतों. कमी किंमतीच्या पदकामुळें सदर अधिकाऱ्यास वाईट वाटलें असें त्याच्या उद्गारांवरून दिसतें. पण त्यानें योगाच्या हातचा प्रासादिक नारळ हाच मोठा मानदायक व किंमतवान् आहे असें समजावयास पाहिजे. ही समजूत त्याजमध्यें कमी असावी असें दिसतें.

शिकंदर नशीब!—सिवट नांवाच्या एका आगबोटीवरील चौथा ऑफिसर मि० क्लिफर्ड या नांवाच्या तरुण दर्यावर्दीनें, मि० बार्नेवान्योटो नांवाच्या एका गृहस्थाचा झोक जाऊन तो समुद्रांत पडल्या वेळीं जीव वांचविण्यासाठीं आगबोटीवरून समुद्रांत उडी मारली व श्वास वांचविले. हें क्लिफर्ड याचें शौर्य पाहून त्यास आजन्म दर आठवड्यास ९ पौन्ड प्रमाणें तैनात देण्याचा ठराव झाला असून, त्याच आगबोटीवर मि० बुल्क जोल नांवाचा श्रीमान् गृहस्थ होता त्यानें मि० क्लिफर्ड याचें शौर्य पाहून तेथल्या तेथें १,००० पौन्डाचा चेक त्यास बक्षीस दिला. क्लिफर्ड याच्या धैर्यशौर्याचें अभिनंदन इतकेंच होऊन राहिलें नाहीं, तर त्याचें शौर्याचें काम पाहणारांमध्यें त्या आगबोटीवर दक्षिण आफ्रिकेंतील एका श्रीमान् युरोपियन व्यापाऱ्याची एकुलती एक तरुण मुलगी होती, तिनें त्याचे बरोबर लग्न करण्याचें ठरविलें आहे. ह्यावरून सदर मि० क्लिफर्ड याचें शिकंदर नशीबच ह्मटलें पाहिजे!

एका दगडाचें ख्रिस्ती भजनालय.—इओवा (यु. स्टे. अमेरिकेंतील एक शहर) येथें वाटर्लू प्रेस्बिटेरियन चर्च नांवाचें एक ख्रिस्ती प्रार्थनालय आहे. तें सबंध एका दगडाचे बनविलेलें आहे ! त्यां भागांत दगडाची फार दुर्मिळता असून आसपास एकही दगडाची खाण नाहीं. इओवा येथें एक भजनालय बांधण्याचें ठरविलें. पण त्याला दगड कोठून आणावे असा प्रश्न निघाला. पुढें त्या शहरापासून चार कोसांवर मैदानांत एक मोठा दगड असलेला आढळला. हा जमिनीवर ८ फूट उंच दिसत होता. तेव्हां तो जमिनींत किती खोल आहे तो पाहतां असें आढळून आलें कीं, तो २८ फूट उंच, ३० फूट रुंद आणि २० फूट जाड होता तो दगड तेथून काढून इओवा शहरास मोठ्या प्रयासानें आणून त्याचें भजनालय कोरण्यांत आलें आणि आतां त्याजमध्यें प्रार्थनेंकरितां मंडळी जमते. ह्या दगडाचें एकंदर वजन अजमासें २९०० टन (२८ मणांचा टन—७०,००० मण किंवा ३९०० खंडी) होतें!

नमुनेदार पत्र—एकानें आपल्या सावकाराला पुढीलप्रमाणें पत्र लिहिलें:" रा. रा.—यांचे सेवेशीं. वि. वि. आपल्या एकंदर देण्याची रक्कम आजपर्यंत ५०० रु. व्याजासुद्धां झाली असून, त्या रकमेचा ब्यांकेचा चेक ह्या सोबत पाठविला आहे. रकमेची भरपाई करून पैसे पावल्याची पावती रीतीप्रमाणें पाठवावी. ही विनंति.

"ताजाकलम. आपलेकडून निकडीनें पैशाची मागणी झाल्यावरून आपल्या एकंदर रकमेची फेड ब्यांकेचा चेक पाठवून वरील प्रमाणें आपल्याकडे पत्र लिहिलें असेंत. परंतु आज मजजवळ एक पैसाही नसल्यामुळें आपल्या रकमेची एव्हां कांहीं एक तजवीज करितां येत नाहीं. हें कळविण्यास मला अत्यंत संकोच वाटतो !" ज्ञा. च.

भूक—जो विकार योग्य तितका असल्यामुळें गरीबांची प्रकृति बरी राहते व त्यांच्या हातून काम होतें, आणि जो नसल्या मुळें श्रीमंतांचे अंगीं आळस व रोग यांची समृद्धि होते असा विकार.

लज्जा—ज्यांच्या ठिकाणीं पुष्कळ वेळां दिसावा पण खरोखर मुळींच दिसत नाहीं असा एक विकार.

विडी—पानांत अगर कागदांत बांधलेली तंबाखूची वळकटी. हिच्या एका टोंकाला विस्तव व दुसऱ्या टोंकाला मूर्खाचें तोंड लागलेलें असतें

मुत्सद्दीपणा—केवळ खोटें न बोलता खरें लपविण्याची कला कीं जिच्या योगानें राष्ट्रेंची राष्ट्रें ठकविण्यास सांपडतात.

विधवा—जिचें रक्षण करण्याला कोणी नाहीं यामुळें पाजींचा पाजीपणा चालावण्यास व निंदकांची जीभ पाजळण्यास स्थान होते अशी गरीब स्त्री.

लोकापवाद—ज्या गोष्टी रचण्यांत अर्धे जग आणि त्यांवर भरंवसा ठेवण्यांत बाकीचे जग सदैव तत्पर राहतें अशा गोष्टी.

पुस्तकपरीक्षण—अक्कल नसतां आहे असें दाखविण्यास आणि शहाण्यांची हुरेवडी करून आपल्या तोंडाभोंवती दिवा ओवाळून घेण्यास मूर्खाच्या हातचें एक साधन.

पुस्तकालय—प्रतिष्ठित चव्हाटा-जेथें लोकांस शांतपणें वाचण्याच्या मिषानें जाऊन सगळ्या जगाच्या कुटाळ्या करण्यास चांगलीच सवड मिळते.

जिव्हा—ज्याला ताब्यांत ठेवणें ह्मणजे महाकाम कठिण; नको तेव्हां हटकून चुरचुरायचा आणि चांगले करण्यापेक्षां वाईट करायचा असा अवयव.

वकीलपत्र—पचेलसें खोटें बोलणें आपल्याला बोलतां येणार नाहीं हें जाणून धंदेवाल्या लबाडाला आपल्या वतीनें तें बोलण्यासाठीं दिलेलें मुखत्यारपत्र. क

अमेरिकेंतील स्त्रियांचें कसब—अमेरिकेतील कुमारिका पण वयांत आलेल्या पोरी नी आपल्या उदरनिर्वाहाची युक्ति चांगली शोधून काढली आहे ना बहुतेक फौजखात्यांत पेन्शन घेतलेल्या लोकांशींच लग्नें करितात, असें करण्याचा त्यांचा मुख्य हेतु हा असतो कीं ते शिपायी थोड्याच दिवसांत मरण पावतात व त्यांना मिळत असलेले पेन्शन या स्त्रियांना जन्मभर मिळतें व त्या योगानें त्यांना चैनही बरीच उडवितां येते. कित्येक अमेरिकन मुलींनीं तर याच उद्देशानें पेन्शनवाल्या शिपायांबरोबरही लग्नें लाऊन घेतलीं आहेत, खीचरित्राचा हा एक मासलाच आहे.

नवीन कल्पना—विलायतेतील एका कल्पकानें चिमणींत जळणारी मातीची वात तयार केली आहे. त्यांत फार बारिक बारिक छिद्रें असून त्यांतून तेल वर चढतें व साधारण वातीपेक्षां फार धिमें जळून तेलही कमी खर्च होतें व प्रकाशही चांगला पडतो. कल्पना बरी आहे.

म्हाताऱ्यांस दांत—गया जिल्ह्यांतील पाऽई नांवाच्या गांवांत एक म्हातारा १०९ वर्षांचा झाला असून आतां त्याला पुनः नवे दांत निघूं लागले आहेत असें ह्मणतात.

साधूंचें भविष्य—कत्र शहराहून कांहीं साधु लोक चालले असता तुह्मी कोठें जातां असें कोणी त्यांस विचारलें त्यावर त्यांनीं सांगितलें कीं, हिंदुस्थानांत प्रळय होणार आहे या करितां आह्मी उत्तरखंडांत जातों. न्या० सि०

तीन क्यारेटपेक्षां अधिक वजनाचे व चांगले आबदार माणीक तितक्याच वजनाच्या हिऱ्यापेक्षां अधिक किंमतवान असतात.

कित्येक किडे जन्मल्या पासून ३० मिनिटांच्या आंतच आपल्या पूर्ण वयांत येतात.

१७ व्या शतकांतील कित्येक चाली हल्लीं नव्या रूपानें अर्वाचिन सुधारकानीं अस्तित्वांत आणल्या आहेत.

स्पेन देशांतील कित्येक गांवांत, अद्यापिही बैल, डुक्कर वगैरेंच्या कातड्याच्या बंड्या करून लोक आंगांत घालतात.

फ्रान्स देशांतील कित्येक प्रसिद्ध हॉटेलांत हिशेब ठेवण्याचें काम बहुतकरून स्त्रियाच करतात.

आर्जेन्टाईनच्या प्रजासत्ताक राज्यांत आज मितीला १ कोट गुरें आहेत, आणि ती सोळाव्या शतकांत ब्राझील देशांत नेलेल्या आठ गाई व ह्मशी याचा विस्तार आहे ह्मणतात.

युरोपांतील एकंदर राष्ट्रांत सडकेवरून जाणाऱ्या येणाऱ्या प्रत्येक इसमानें डाव्या हातानेंच चालावें असा कायदा फक्त ग्रेटब्रिटन व आस्ट्रियांतच आहे.

आईसलंड टापूंतील लोक फारच प्रामाणिक असल्याची ख्याती आहे. त्या बेटांत चोऱ्या, विश्वासघात वगैरे गुन्हे एकही दिवस होत नाहींत, तसेंच त्या बेटांत जन्मजन्मांतरीं खून होत नाहीं त्या सगळ्या बेटावर फक्त एकच पोलिस अंमलदार असतो तो सहा महिने बेटावर फिरविण्यांत घालवितो व सहा महिने तुरुंगांतील महालांत रहातो तुरुंगांतील त्याचा महाल फारच सुंदर व प्रेक्षणीय आहे. सगळा तुरुंग बारांवर चोवीस वर्षें रिकामा असतो, तो तुरुंग तेथल्या रहिवाशांना फक्त भिति करतां बांधून ठेवलेला आहे, वास्तविक पाहतां अपराध्यांना रहाण्याकरतां तेथें उत्तम प्रकारच्या कोठड्या आहेत नरम असे बिछाने आहेत. व खाण्याला उत्तम प्रकारचें अन्न मिळेल ह्मणून तुरुंगाबाहेरील भिंतीवर लावलेल्या जाहिरातींत ह्मटलें आहे, तशा प्रकारची व्यवस्था त्या बेटांत रहाणारांची ही नाहीं पण अपराधीच कधीं कोणी सापडत नाहीं यावरून तें बेट व त्यांतील रहिवासी लोक किती सुखी असतील बरें !

लाहोरचे प्रसिद्ध वक्ते पंडित दीनदयाळ हे हल्लीं निजामहैद्राबादेस गेले असून आपल्या अस्खलित व जोरदार शास्त्रीय विषयांच्या व्याख्यानांनीं त्यांनीं तिकडील लोक समुदायास गुंग करून सोडलें आहे. त्यांच्या व्याख्यानास चांगले चांगले मुसलमानही मोठ्या आवडीनें जात आहेत. गेल्या आठवड्यांत त्यांनीं वेदांत या विषयावर जें व्याख्यान दिलें त्यांत हिंदू, पारसी, मुसलमान वगैरे लोकांच्या धर्मांतील नियमांचा सारखेपणा मोठ्या मुद्देसुत रीतीनें प्रतिपादन केला होता. त्यानंतर मनुष्य प्राण्याचें शरीर व मन यांच्या रचनेविषयीं विवेचन करतांना त्यांनीं असें सांगितलें कीं, विद्या व शुचिर्भूतपणा यांच्या योगानेंच मन प्रगल्भ होतें तिकडील मंडळी, हरिकीर्तनाप्रमाणें पंडितजींची आपापल्या घरीं व्याख्यानें करूं लागली आहेत. यावरून पंडितजी बरेच दिवस त्या प्रांतीं रहातीलसें वाटतें.

मुंबई म्युनिसिपालिटींतील नौकरांनीं कामें बंद पाडण्यासंबंधानें १८९० सालीं अमलांत आलेला आक्ट, येत्या ता. १९ जानेवारी पासून बेळगांव म्युनिसिपल हद्दींतही म्यु. क. च्या नोकरास लागूं करण्यांत आला आहे. गु०

विंचवावर औषध—दोन चिमटी नवसागर घेऊन सुमारें अर्धा तोळा पाण्यांत विरघळावा, व त्या पाण्यांत एक चिरगुटाची दुहेरी घडी भिजवून विंचू चावलेल्या जागीं सभोंवार ती घडी सुमारें एक तासभर बांधून ठेवावी. मधून मधून अमोनिया दोन चार वेळां हुंगावा. अमोनिया नसल्यास एका बाटलींत थोडा नवसागर, चुना व पाणी घालून त्याची वाफ ओढावी. वरील उपाय चांगला अनुभवशीर आहे.

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास ......................४
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........४१ ०६
दुसरे खेपेस .... .......४१

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Six monthly........ 3 ............. 8 as
Single copy ..............................4 as
Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ...... 4 as
Repetition Per line...3 as

VOL XXXI AKOLA MONDAY 29 NOVEMBER 1897 NO 46

वर्ष ३१ आकोला सोमवार तारीख २९ माहे नोवेंबर सन १८९७ इ० अंक ४६

## नोटीस.

अमृती मर्द रावजी पाटलीण राहाणार जउळके भेंडगाचे तालुके मलकापूर जिल्हे बुलढाणें इस व गंगु मर्द रामभाऊ डबरवाट मौजे सावरगांव तालुके जळगांव जामोद इस नोटीस देणार भगवानदास गुरू रामजीदास राहाणार मौजे जउळके भेंडगाचे तालुके मलकापूर जिल्हे बुलढाणें. नोटिसींनें असें कळवितों कीं अमृती मर्द रावजी इनें आह्मा-पासून कर्ज रुपये ५०० शें दर शेंकडा २ दोन रुपये व्याजा प्रमाणें करार करून सदर्हू कर्जाच्या सालबंद्या १० दाहा करून दिल्या व सालबंदी पडल्यास लगाईत मिती पासून सालबंदीची फेड करून देऊं व ह्या कर्जांत आह्मास मोहेवाले शेत, व गोधनवाले शेत, व टाकणीवाले शेत, अशा तीन शेतामधील जमिनीचा निमे निमे भाग आह्मास सदरहू कर्जाबद्दल तारण दिलेला आहे, आतां अमृती मर्द रावजी ही गंगु मर्द रामभाऊ इजकडून सर्व कारभार करवीत आहे. व अमृती मर्द रावजी ही आपल्या माहेरी मोहोगींगांवी राहात आहे (मोहोगीगांव तालुके मलकापूर जिल्हे बुलढाणें येथें आहे) आतां ह्यावेळ पावेतो आमच्या कर्जाबद्दल कांहींएक विचार झाला नाहीं, यास्तव ही नोटीस देणें भाग पडले, तर ही नोटीस पावल्या पासून १५ पंधरा दिवसाचे आंत आमचे कर्ज व्याजासह आणून देऊन आमची पावती घ्यावी असें न केल्यास आह्मी योग्य कोर्टांत कायदेशीर काम चालवू व सदरहू तीन शेतांतील निमे निमे हिस्सा जो आह्मापासी कर्जांत तारण आहे तो सरकार मार्फत आह्मी आमच्या ताब्यांत घेऊन सदरहू आमच्या कर्जाची फेड करून घेऊं. या कामात काम सुरू झाल्यापासून अखेर निकाल होईपर्यंत सर्व प्रकारचा खर्च व जी आमची नुकसान होईल ती या नोटिसीच्या व निराळी जाहिरात दिली आहे त्याच्या खर्चासह भरून घेतली जाईल. कळावे, तारीख २३ माहे नोवेंबर सन १८९७ इसवी.

सही.

भगवानदास गुरू रामजीदास

दस्तुर खुद्द.

---

## नोटीस

अमृती मर्द रावजी पाटलीन राहणार जऊळकें भेंडगाचे तालुके मलकापूर जिल्हा बुलढाणें इस व सर्वत्र लोकास नोटीस देणार भगवानदास गुरु रामजीदास राहणार मौजे जउळके भेंडगाचे तालुके मलकापूर जिल्हा बुलढाणें नोटिसींनें असे कळवितो कीं अमृती मर्द रावजी इनें आह्मापासून रुपये २०० दोनशें कर्ज घेतले व त्यास व्याज दरमह दरशेकडा अजमासे रुपया १॥ प्रमाणें करार केला व या कर्जांत तिनें आपले राहते घर गढीचें आंतील त्या घराचा निमे हिस्सा व बैल बांधण्याचा कोठा २१ एकवीस खाबी व त्याच्या भोंवतालची खालीं जागा असें आह्मास सदर्हू कर्जांत तारण दिला आहे. तर आमच्या संमती शिवाय जर कोणी खरीद विक्री किंवा गहाण वगैरे घेईल तर त्याचे जबाबदार आह्मी किंवा घर व कोठा वगैरे कोणी नाहीं, ज्याचा तो आहे. आता अमृती मर्द रावजी इजला आह्मी आज पावेतो सदर्हू ऐन व मुद्दल मागीत असता निकाल केला नाहीं ह्मणून ही नोटीस देणें भाग पडले. सदर्हू नोटीस पावल्या पासून १५ पंधरा दिवसाचे आंत आमचे आह्मास ऐन व व्याज जे हिशेबानें होईल ते आणून देऊन आमची पावती घ्यावी असें न केल्यास आह्मी कायदेशीर सरकारांत काम चालवून अखेर निकाल होईपर्यंत जो जो खर्च आह्मास लागेल तो व जी आमची नुकसान होईल ती या नोटिसीचे खर्चासुद्धां सर्व भरून घेतले जाईल ह्मणून दिली नोटीस.

तारीख २३।११।९७ इसवी.

सही

भगवानदास गुरु रामजीदास दस्तूर खुद्द

---

## जाहिरात

सर्वत्र लोकांस भगवानदास गुरू रामजीदास रहणार जऊळके भेंडगाचे तालुके मलकापूर जिल्हे बुलडाणे हें असे जाहीर करतात कीं रावजी वल्द विठोबा पाटील रहाणार जऊळके भेंडगाचे तालुके मलकापूर जिल्हे बुलढाणें हा मैयत होऊन आज बरीच वर्षें झाली रावजी यांस सरळवारिस त्याची बायको अमृती मर्द रावजी ही विद्यमान आहे हिनें आह्मा पासून रुपये ५०० पाचशें अक्षरी पांचशे दर शेकडा २ रुपये प्रमाणें व्याजाचा करार करून सदर्हू रुपया बद्दल आह्मांस तारण शेते तीन देऊन रीतशीर कागद करून दिला आहे व त्या कागदांत सालबंद्या १० दहा दरसाल रुपये ५० व्याजासह देण्याचा ठराव केला आहे. सालबंदी पडल्यास सदरील व्याजा प्रमाणें लगायत मिती पासून जी सालबंदी पडली ती फिटे पर्यंत व्याज सदर्हू प्रमाणें घेतले जाईल असा करार करून तीन शेते तारण गहाण घेतली आहेत त्यांची नावे १, शेत मोहावाले, व दुसरे गोधनवाले, तिसरे टाकणीवाले, या तिन्ही शेतात जी जमिन आहे त्या पैकीं अमृती मर्द रावजी हिचा निमे हिस्सा आहे. व तोच हिस्सा सदर्हू रुपये ५०० यात तारण आमचे इकडे आहे. आतां तिच्याकडे आमचे रुपये ५०० व्याजासह सालबंद्या पडल्या आहेत त्या तिला मागत असतां आज पावेतो दिल्या नाहींत. यावरून तिचे मनांत कांहीं माझा पैसा देण्याची इच्छा नाहीं हें उघड दिसतें याज करितां तिला व सर्वत्र लोकांस असे कळविले जातें कीं सदर्हू तीन शेता पैकीं आमचा निमे निमे हिस्सा जर कोणी गहाण खरीदी बक्षीस कर्ज वगैरे देऊन आमच्या संमती शिवाय घेईल तर त्याज बद्दलचे जबाबदारी कोणत्याही प्रकारानें आह्मी व सदर्हू तीन शेतातील निमे निमे हिस्सा जो आमच्या पाशी तारण आहे तो ह्या कोणावरही नाहीं ज्याचा तो जबाबदार आहे. ह्मणून दिली जाहिरात तारीख २३।११।९७ इ०

सही

भगवानदास गुरु रामजीदास

रहाणार जउळक भेंडगाचे

दं० खु०

---

### LOVE'S PHILOSOPHY

The fountains mingle with the river
And the rivers with the ocean,
The winds of heaven mix for ever
With a sweet emotion;

Nothing in the world is single,
All things by a law divine
In one another's being mingle—
Why not I with thine?

See the mountains kiss high heaven
And the waves clasp one another;
No sister flower would be forgiven
If it disdain'd its brother:

And the sunlight clasps the earth,
And the moonbeams kiss the sea—
What are all these kissings worth,
If thou kiss not me?

वाहे ज्याचें झुळझुळ सदा नीर ते स्त्रोतसंघ
जावोनीया अमित मिळती निम्नगेला अमोघ।
बंधुप्रेमें कवळिति मरुद्वीचि-कल्लोल-वृंद
आकाशीं—ते सहजचि जना ओपिती दिव्य
मोद ॥ १ ॥

क्षोणी भागीं मज न दिसतें एकटी वस्तु येथें
प्रत्येकीला सदृश दुसरी वस्तु ते प्राप्त होते।
सर्वांनाही अनुपम विधिन्याय हा मान्य
आहे।
मी कां कांते तव दृढ वेदे संगमा योग्य
नोहे ? ॥ २ ॥

कांते ! येथें महिधर पहा तुंग शृंगें नभाला।
चुंबी तसी तटिनि लहरी वेष्टिते ही दुजी ॥
येती पुष्पें विपुल लतिके बंधुसा भाव यात।
सा ल्यें ते क्षम परिभवा मानवीया
नितांत ॥ ३ ॥

चंडांशूच्या किरण निवहे श्लिष्ट ही
रत्नगर्भा।
अंभोधींचें जल सरसंभ पीतसे इंदुचीभा ॥
याचें मौल्य प्रियसखि वदे ! कायगे !
काय आहे !
मी स्नेहार्द्री जरि सखि तुझ्या चुंबना पात्र
नोहे ॥ ४ ॥

---

रा रा वऱ्हाडसमाचार कर्ते यास वि वि.

सुमारें १०।१५ वर्षामागें आपल्या ह्या हिंदुस्थान देशांत राजकीय आणि सामाजिक विषयांची चर्चा करणारी एकही संस्था नव्हती, व त्या वेळेस ती असावी असें बद्दलही कोणाचे मनांत कल्पना आली नाहीं असें वाटतें. त्यावेळीं आपण फार अज्ञानांधकारांत तरी असलों पाहिजे अथवा तिजबद्दल फारशीं जरूरी नसली पाहिजे पण जसजसे आपण पश्चिमात्य शिक्षणाशीं निकट निकट येऊं लागलों, व पारतंत्र्यतेचें प्रतिबिंब हृदयांत वास करूं लागलें तसतें, वरील सारख्या जरूरीच्या व महत्वाच्या संस्थे बद्दल विचार सुचला व तो अमलांत आणण्या बद्दलही कळकळ वाटूं लागली. होतां होतां इ. स. १८८५ सालीं राजकीय विषयांची चर्चा करणारी "इंडियन नॅशनल कांग्रेस" स्थापन झाली. तिची पहिली बैठक मुंबईस झाली. राजकीय चळवळीचे प्रतिनिधींनीं असें ठरविलें कीं राजकीय विषयांचा उहापोह झाल्यानंतर सामाजिक विषयांचाही उहापोह व्हावा; कारण समाजांत अडचणी फार असल्यामुळें प्रत्येक इसमास जो त्रास सोसावा लागतो त्यानें फक्त एकाजातीचेंच नव्हे तर राष्ट्राचें फारच नुकसान होत आहे. कांहीं निराळ्याच अडचणीमुळें जरी तिची बैठक त्याच सालीं झाली नाहीं, तरी ती लागलीच २ वर्षा नंतरच अस्तित्वांत आली. तीच आपली "राष्ट्रीय सामाजिक परिषद" होय. तिचा संबंध राष्ट्रांतील सर्व जातीशीं असल्यामुळें तिला राष्ट्रीय हें नांव द्यावयाचें. तिची बैठक ही कॉंग्रेसच्याच मंडपांत व्हावी असेही तिच्या प्रतिनिधींनीं ठरविलें. व पुणें शिवाय करून सर्व ठिकाणीं ती त्या प्रमाणें भरतही आली. यंदाची तिची ११ वी बैठक आहे, व ती मोठ्या थाटानें उमरावतीस यंदा होईलच. तिचे जे प्रतिनिधी आहेत त्यात नामदार रानडे, डा० भांडारकर अशी मोठमोठी मंडळी आहेत हें सर्वांस माहीत आहे.

सामाजिक परिषदेच्या बैठकींत जे जे एकंदर विषय पास होतात, ते विषय, व ज्यांचीं ज्यांचीं भाषणें होतात, तीं भाषणें, हीं सर्व फारच विचार करण्या जोगीं असतात यांत तिळमात्र शंका नाहीं. परंतु त्या सर्वांचा आह्मांस जो फायदा मिळावयास पाहिजे तो मिळत नाहीं ही फार दुःखाची गोष्ट आहे. पाहिले व मुख्य कारण असें आहे कीं आह्मांत मानसिक धैर्याची कमतरता आहे. सभेंत मात्र सभ्या हात गप्पा ठोकण्यास आह्मी तयार असतों, परंतु स्वतःचें आमचेंच आचरण आमच्या बोलण्याच्या अगदीं उलट असतें. समाजाचे धुरीणत्व जर आह्मी पत्करणार तर आमचे आंगीं अशीं व्यंगें बिलकूल असतां कामा नयेत. व तीं जों पर्यंत आह्मास सोडणार नाहींत, तों पर्यंत आम-

वक्तृत्वाचा उपयोगही अज्ञ समाजांवर "पालथ्या घागरीवर पाणी" या प्रमाणेंच होणार. समाजाची स्थिती ही कांहीं अंशीं मेंढ्याच्या कळपा सारखीच असते. आह्मी मेंढपाळ जर जाणुन बुजून शिंगें मोडून वासरांत शिरूं लागलों तर त्यास कोण काय करणार ! असो आमचे एकंदर वर्ग साधारण पणें तीन होतात. ( १ ) फक्त बोलकं. ( २ ) बोलून स्वतः तशा प्रकारची वर्तणूक ठेवणारे. ( ३ ) बोलणें अगदीं विरुद्ध परंतु कृतीनें मात्र पक्के सुधारक. ( २ ) नंबरचे शिवाय करून बाकीचे, वर वर्णन केलेल्या व्याख्ये खालीं येतात. ह्मणजे अर्थात त्यांचा समाजास कवडीचा ही फायदा होत नाहीं

ज्या महत्वाच्या गोष्टींनीं समाजाची सुधारणा होईल त्यापैकीं कांहीं थोड्याचें वर्णन करूं. आपल्या मनांत सत्यप्रियता, सहानुभूती, व न्यायाची बुद्धी यांचा नेहमी प्रादुर्भाव झाला पाहिजे. व दिवसानुदिवस त्याची वाढ होत गेली पाहिजे. आपण अशा वादग्रस्त बाबतींत नेहमी आपल्या राजकर्त्यों चें उदाहरण डोळ्या पुढें ठेविलें पाहिजे. आपली नेहमीची वर्तणूक फारच उत्तम तऱ्हेची ठेविली पाहिजे. आपल्या समाजांत असलेली एकमेकांस पराजित करण्याची महत्वाकांक्षा ही ही आपल्या नुकसानीस कारण होते. जातींतला जातींतच मत्सर व बलिष्टाची कमकुवताशी झुंजण्याची इच्छा ह्या समूल नाहींशा करून टाकिल्या पाहिजेत जनापवादास न भितां सत्यतेनें उचित कृत्य करण्या विषयींची मानसिक हौस ही पूर्ण दशेप्रत पोचविण्यास भितां कामा नये. आपला होत असलेला सामाजिक ऱ्हास हा न होऊं देण्या बद्दलच कायावाचा मनें झटलें पाहिजे. आपली सामाजिक उन्नतीही जर लंगडी राहील तर राष्ट्रीय उन्नतीची गोष्टही मनांत आणावयास नको, हें तत्वहृदयांत पूर्णपणें ठेविलें पाहिजे. वर दर्शविलेल्या गोष्टी पैकीं एखादी साध्य करण्या करितां कितीही जरी अडचणी आल्या, तरी त्या सर्व सोसल्याच पाहिजेत. अशा रीतीनें चाललें असतां समाजोन्नती होणार नाहीं काय व धुरीणत्वाचें काम बजावलें असें नाहीं कां होणार? पण उपदेशांतल्या सूचक गोष्टी वर्तमान पत्रांतच राहिल्या तर त्याजबद्दल अपयश धुरीणाचें माथीं आहे हें विसरता कामा नये. असो. आज इतकेंच पुरे.

आपला
" सारासार विचारी "

वऱ्हाडसमाचार

मिती मार्गशिर्ष शुद्ध ६ शके १८१९

अलिकडे इंडियांतील विद्यादानाच्या संबंधानें मोठा बोभाटा होत असतो. या देशांत उच्च प्रतीच्या विद्या शिकविण्यांत आल्या मुळें लोक प्रस्तुत राज्यव्यवस्थे विषयीं दोष दाखविण्याला प्रवृत्त होतात, असंतोषाचें बीज पेरतात आणि राज्यकारभारांत उच्च उच्च जागा मिळविण्याची महत्वाकांक्षा धरतात. इतिहास विषय हल्लीं शिकवितात तसा चालूं ठेविल्यास विद्याप्रसार इंडियांत राजद्रोह वाढवितो. असे आक्षेप नामदार टिळकांच्या खटल्या पासून फार जोरदारीनें बाहेर पडतात. स्टेट सेक्रेटरी लार्ड हामिल्टन असेंही बोलले कीं सध्यांचा विद्यादानाचा क्रम बदलला पाहिजे ह्मणजे सरकारचे दोष काढून राजकीय उन्नती साटीं त्रागा करणारे विद्वान लोक निपजणार नाहींत. नामदार भावनगरी तर असें प्रतिपादतात कीं इंडियन लोकांस लोहार, सुतार, कोष्टी, चांभार इत्यादि धंदेवाले लोक बनवावे ह्मणजे असंतोषाचें कारण लयास जाईल व विद्यमान दारिद्र्यही कमी कमी होऊन देश सुसंपन्न होईल. सारांश, उच्च प्रतीचें शिक्षण बंद करावें आणि औद्योगिक शिक्षणाचा प्रसार करावा असा आंग्लो इंडियन लोकांचा पक्का बेत दिसतो. आह्मी औद्योगिक शिक्षणाची मातबरी कमी करूं इच्छीत नाहीं परंतु आमच्या मतें उदार शिक्षण व औद्योगिक शिक्षण हीं परस्परांस पोषक आहेत तेव्हां त्यांची तोडातोड केल्या वांचुन जी गोष्ट आह्मांस लाभेल ती आह्मांस पाहिजे.

इंडियांत औद्योगिक शिक्षणाचा फैलाव चांगलासा होत नाहीं या संबंधानें मि. जे. ए. बेन्स साहेबांचा अभिप्राय ध्यानांत धरण्या सारखा आहे. सन १८९१ सालीं हे लोकगणतीच्या खात्याचे मुख्य अधिकारी होते ते ह्मणतात कीं ( १ ) प्रथम, इंडियाची सामाजिक रचनाच अशी आहे कीं औद्योगिक शिक्षणाची मोठीशी गरज वाटत नाहीं; ( २ ) औद्योगिक शिक्षणाची ग्राहकता अंगीं येण्याला जी सामान्य मूलविद्या लागते ती सुद्धां इंडियांत पुष्कळ लोकांना येत नाहीं ( ३ ) औद्योगिक विद्या ज्या ज्या जातींत किंवा वराण्यांत वंशपरंपरेनें चालत आल्या आहेत, त्या त्या सुलभतेनें लोक ग्रहण करितात. हे धंदेवाले लोक नित्य व्यवहारांतल्या नडी भागवितात आणि त्यांस विशेष प्रकारच्या ज्यास्ती औद्योगिक शिक्षणाची मोटीशी गरज नसते. इंडियांतील बहुतेक प्रजा शेतीवर चरितार्थ चालवितात आणि त्यांच्या संसारांतील गरजा फार माफक व साध्या असतात. या गरजाच्या मानानें हस्तकौशल्याचे धंदेवाले गांवोगांव आपला पिढीजादा धंदा चालवितात आणि त्या व्यतिरिक्त ते कोणत्याच गोष्टीची काळजी करीत नाहींत. यूरोपांत जसा औद्योगिक शिक्षणाला आवश्यक सामान्य मूलविद्यांचा प्रसार सर्वत्र झाला आहे तसा इंडियांत नाहीं आणि त्यामुळें औद्योगिक विद्या या देशांत अगदीं मागसलेल्या आहेत. सामान्य मूलविद्या व उदार शिक्षण यांचा प्रांत फार लहान आहे. त्यांची गोडी जनसमूहास ह्मणण्यासारखी नाहीं आणि त्यामुळें कोणतेंही विद्यादान या देशांत उर्जित दशेला पोंचण्याचा संभव नाहीं. वैद्यक, इंजिनिअरींग, कायदेपांडित्य इत्यादि विषयांच्या शिक्षणापासून चांगले चांगले लाभ होत आहेत. तथापि इंडियाच्या स्थितीच्या मानानें उदार शिक्षण व औद्योगिक शिक्षण हीं दोन्ही एकसारखीं कांहीं वर्षे चालतील तर शास्त्रीय औद्योगिक शिक्षणाची अभिवृद्धि स्वतंत्रपणें करण्याची वेळ पुढें येण्याचा संभव आहे.

यंदाचा वऱ्हाडांतील शिक्षकसमाज— आज बरींच वर्षे हा समाज आळीपाळीनें अकोल्यास व उमरावतीस भरत असतो. परंतु त्याच्या स्वरूपांत कांहीं विशेष फरक अगर वयोमानानें त्याच्यांत अधिक महत्व आलेलें दिसत नाहीं हें पाहून फार दिलगिरी वाटते. त्याचें मुख्य कारण रा० सदाशिवराव भागवत यांनीं आपल्या भाषणात दर्शविल्या प्रमाणें ज्यांचीं मुलेंबाळें शाळांतून शिकत आहेत अशीं सुशिक्षित आईबापें या समाजांत जितकें मन घातलें पाहिजे तितकें घालीत नाहींत हें होय. दर वर्षी आपण काय काय नव्या अगर महत्वाच्या गोष्टी केल्या, काय काय अडचणी आपल्या कामांत आल्या व कोणत्या आपण दूर केल्या वगैरे बद्दल सर्व शिक्षकगण एकत्र मिळून विचार करितात. परंतु त्या ऐकून त्यांना मदत करून आपल्या मुलांचें शिक्षण अधिक सोईचें करण्याचा तर विचार दूरच परंतु निदान ज्या आपल्या मुलांना हे शिक्षक शिक्षण देतात त्यांचे शिक्षणासंबंधानें काय विचार आहेत हें समजावून घेण्याचे इच्छेनें ही कोणी तेथें जात नाहींत. ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. एकदां मुलें शिक्षकाचे स्वाधीन केलीं कीं झालें आपलें काम मग त्या संबंधानें पूर्ण दुर्लक्ष करावयाचें. मुलगा फी मागेल ती मात्र जरा त्रासानें अंगावर फेकून द्यावयाची. परंतु मुलगा शिकतो काय, शिक्षक शिकवितो काय, शिक्षणक्रम आपल्या उपयोगी कितपत आहे, त्यांत काय फेरबदल केला पाहिजे ह्याबद्दल जर कोणी विचार करील तर शपथ. वर्षातून नियमानें निदान दोन वेळ तरी मुलाचे शिक्षकाची गांठ घेऊन अगर अन्यतऱ्हेनें विशेष विचारपूस करणारे आपणांत शेकडा किती सांपडतील बरें ? मोठमोठ्या वकील व्यापाऱ्यांचीं मुलें पुष्कळ वेळां अगदीं अजागळ निघतात. ह्याचें कारण त्यांची आपल्या मुलांचे शिक्षणा संबंधानें पूर्ण उदासीनता हेंच होय. ह्याचा अनुभव पुष्कळांस येतच असेल. असो.

यंदां रा० शेवडे, येथील ट्रेनिंगकालेजचे प्रिन्सिपाल, यांनीं "अध्यापन व परीक्षण" या संबंधी एक मोठ्या पोक्त विचारांनीं भरलेला निबंध वाचला. त्यांनीं त्यात एके प्रसंगीं मात्र थोडा अतिप्रसंग केल्याबद्दल बराच वादविवाद होऊन समाजानें त्यांस थोडे खिन्न केलें. कित्येक शिक्षक मुलांस कॉपी करण्यास उत्तेजन देतात अगर त्याकडे काना डोळा करितात अशा अर्थाचे शब्द त्यांनीं वापरल्यामुळें अर्थात शिक्षकांवर प्रसिद्धपणें आरोप केल्याबद्दल रा० व० पटवर्धन व रा० सा० महाजनी ह्यांनीं त्यांचा निषेध केला परंतु कोणचाही दोष जरा मोठा करून दाखविल्या शिवाय त्याचेकडे जावें तसें लक्ष्य जात नाहीं ह्यामुळें त्यांनीं त्यास असें महत्व दिलें; असेंच रा० तळवळकरांप्रमाणें आमचेंही मत आहे. या खेरीज एकंदर निबंध पोक्त विचारानें भरलेला होता तो सवडीनुसार आह्मी प्रसिद्ध करूं.

या शिवाय दुसरा शिक्षणासंबंधी महत्वाचा निबंध झाला ह्मणजे रा० देवभानकर बी० ए० यांचा होय. त्यांनीं मि० गुइने नांवाच्या ग्रंथकारानें स्वतः अनुभवानें व विशेष शोधानें केलेल्या परभाषा शिकण्याच्या नवीन सोप्या पद्धतीची हकीकत निबंधरूपानें सांगितली या पद्धतीचें मुख्य अंग ह्मणजे लहान मुलांचें अनुकरण करणें होय. ह्मणजे लहान मूल जसें पदार्थांचें अवलोकन करून नंतर त्याचें नांव लक्षांत धरतें. उदाहरणार्थ आंबा हा पदार्थ पाहिल्यावर तो त्याचे मनांत पक्का बिंबल्यावर आंबा हा शब्द त्याचे लक्षांत राहतो. अथवा पूर्ण वाक्याचा तात्पर्यार्थ त्याचे लक्षांत येतो व त्या अर्थाचे बोधक वाक्य-संबंध वाक्याचें वाक्य-लक्षांत ठेवून तें वाक्य मूल पुन्हा उच्चारितें. व वाक्यांशीं वाक्यें लक्ष्यांत धरून निरनिराळ्या वाक्यांची परस्पर तुलना करून नंतर तसलीं दुसरीं वाक्यें तें स्वतां बनवितें. लिंग, वचन, वाक्यरचना हीं त्यास शिकवावीं लागत नाहींत. हुशार मूल बोलूं लागल्या पासून सुमारें दीड दोन वर्षात त्यास जन्म भाषेचें साधारण ज्ञान होतें. ती भाषा त्यास चांगली बोलतां येते व बोललेली समजते. अशा प्रकारानेंच शिक्षण देण्यासाठीं कांहीं लक्षीपुत्रांनीं स्वतंत्र शाळा स्थापन केल्या व त्यांत त्यांना चांगलें यश आलें व ही पद्धत फ्रान्स देशांत मोठमोठ्या शाळाधिकाऱ्यांचे ही मनांत भरली. भाषा शिकण्याचें इंद्रिय कान होय. डोळे नव्हत. असा निबंधाचा आशय होता. परंतु निबंधकारांनीं त्यांतच कांहीं बाधक गोष्टीचा स्वतंत्र विचार केला असतां तर उपकार झाले असते. आह्मांस असें वाटतें कीं हीं साधनें स्वभाषा शिकण्याचे मात्र कामाचीं. कोणचीही भाषा शिकण्याचें मुख्य इंद्रिय ह्मणज कानच परंतु परभाषा शिकण्यास डोळ्याचा उपयोग फारच होतो. लहान मुलाची स्मरणशक्ति अगदीं ताजी असते. ग्राहक शक्तीचा उपयोग तर नुकताच सुरू होतो. पूर्वज्ञान अगदींच नसतें व नवीन गोष्टींची जिज्ञासा अत्यंत उत्कृष्ठ असते. विशेष गोष्ट ही कीं आपले विचार प्रकट करण्याचें साधनच नसतें त्यामुळें भाषाज्ञानाकडे त्यांचें विशेष लक्ष असतें. परंतु ज्यास एकदां एक भाषा अवगत झाली व आपले विचार एका भाषेत प्रकट करितां येऊं लागले त्यानें लहान मुला प्रमाणें भाषा शिकणें ह्मणजे बराच वेळ फुकट घालविणें होय. अशा स्थितींत पर भाषा शिकण्यास एकच मार्ग चांगला दिसतो. तो हा कीं स्वभाषेचें ज्ञान चांगलें झाल्या नंतर परभाषेचे शब्दज्ञान, वाक्यरचनादिकांचें ज्ञान करून घेऊन स्वभाषेच्या व परभाषेच्या नियमांच्या तुलनेच्या साहाय्यानें परभाषा शिकणें. व ह्यांत काना पेक्षा डोळ्याचाच उपयोग ज्यास्त आहे. परंतु भाषेचें ज्ञान असणें ह्मणजे लिहिलेली भाषा-समजणें अगर ती लिहितां येणें यवढेंच नव्हे; तर ती बोलतां येणें व ऐकली असतां समजणें हें होय. तथापि प्रौढ वयांत पुस्तकाचे ह्मणजे डोळ्याचे सहाय्यानें परभाषेचें ज्ञान करून नंतर अगर तशा रीतीनें शिकतानांच बोलण्याचा व ऐकण्याचा विशेष राबता ठेविल्यानें ती भाषा जितक्या अल्प काळांत जितक्या चांगल्या रीतीनें ती शिकतां येईल त्याचे दसपट अवकाशांत व त्याचे दशांशही ज्ञान केवळ कानांवर भरंवसा टाकून होणार नाहीं असें वाटतें. मात्र स्वभाषेचें चांगलें ज्ञान असलें पाहिजे. हल्लीचे नवीन पदवीधरांस इंग्लिश भाषेचें ज्ञान परिमितच असतें असा जो पुष्कळ गवगवा ऐकूं येतो त्याचें कारण असें दिसतें कीं त्याची माय भाषा चांगली अवगत होण्या पूर्वींच इंग्रजी शिक्षण सुरू होतें. व यामुळें परभाषा ज्ञानाचें उत्तम साधन जें स्वभाषेशी तुलना तेंच लंगडें पडल्यामुळें इतकेंच नास्ती

परंच न लभ्यते" अशी स्थिति इंग्लिश शिकण्याचे साधनांची हल्लीं 'लयलूट' झाली असतांनांही होत.

या शिवाय मानसिक उन्नति, लेखन, शिक्षण, फोटोग्राफी ह्या विषयावर ही व्याख्यानें शिक्षक मंडळींचीच झालीं. बाहेरील मंडळीचीं व्याख्यानें फार सुरस झालीं. सदाशिव राव भागवत ह्यांनीं दोन सूचना केल्या होत्या कीं शिक्षण क्रमांतील पुस्तकांतील मुलांस शिकण्यास अयोग्य असे भाग काढून टाकण्याची अधिकारिवर्गानें काळजी घ्यावी व तहशिल दारासारख्या अमलदाराचे सहाय्यानें सर्वांस सक्तीनें शिक्षण द्यावें. ह्याचें उत्तर राव. पटवर्धनानीं परिसमाप्तीचें भाषणांत दिलें. रा. काळे वकील ह्यानीं "अज्ञेय मीमांसा" या विषयावर व्याख्यान दिलें. त्यांत ज्या गोष्टी स्पेन्सर साहेबांनीं अज्ञेय ह्मणून सांगितल्या त्या शंकराचार्यांनीं बऱ्याच अंशीं ज्ञेय व सिद्ध करून दाखविल्या असें सांगितलें. रा. काणे वकील ह्यांनीं महंमदाचे चारित्राची हकीकत वाचली व रा. प्र. ना. जोग यांनीं "धर्मोन्नति" वर व्याख्यान देऊन श्रोतृसमूह अगदीं तल्लीन करून सोडला होता.

बाहेरील गृहस्थांची व्याख्यानें विशेष जोरदार व अधिक गहन विषयावर झालीं नाहीं ही योग्यच झालें. चार दिवस एके ठिकाणीं जमून जन्मभर लागलेल्या जन्मकटकटीचे संबंधानेंच सदां बोलणें हेंही शिक्षकांस कंटाळवाणेंच होतें, त्यांस ह्या सद्गृहस्थांनीं आपला वेळ खर्चून आपल्या ज्ञानाचा लाभ करून दिला ह्या बद्दल सर्वांनीं त्यांचे आभार मानिले पाहिजेत व तसे मानण्यांत ही आले.

समाज विसर्जनाचे वेळीं रा. ब. पटवर्धन यांनीं रा. भागवतांस उत्तरा दाखल सक्तीचें शिक्षण देण्याची ही वेळ नव्हे व भागवतांनीं सांगितल्या प्रमाणें तहाशिलदाराचे मदतीनें होण्याजोगें सोपेंही काम नाहीं. आधीं पोटोबा व मग विठोबा, खायला मिळेना तर शेतांचीं घरचीं लहानसान कामें टाकून मुलें शाळेंत कोण पाठवितो? शिवाय सक्तीचे शिक्षणास पैसा पाहिजे तो निदान उत्पन्ना पैकीं १० टक्के तरी असावा. इंग्लंडांत असाच पैसा खर्च होतो. व जेथें जेथें सक्तीनें शिक्षण द्यावयाचें तेथें असाच पैसा सरकार खर्चतें आपल्या सरकारा जवळ पैसा नाहीं देऊं ह्मटल्यास देऊं शकेल पण देत नाहीं व त्या मुळें सक्तीचें शिक्षण देतां येत नाहीं आहे त्यांत कसें तरी भागवावयाचें इतकेंच. शाळाखातें ह्मणजे आंतबट्ट्याचा व्यापार जितका पैसा घालावा तितका तें खातें. प्रत्यक्ष उत्पन्न कांहीं नाहीं व ह्मणून सरकार तिकडे पैसा खर्चण्यास कचरतें. राव बहादूरांनीं उपसंहाराच्या वेळीं शिक्षक व परीक्षक यांच्या गुणा संबंधानें चांगली माहिती देऊन उपदेशपर व अभिनंदनपर उत्तर भाग समाप्त केला.

---

## The Berar Samachar

MONDAY NOVEMBER 29 1897

We are glad to notice the favourable attitude of the Local Government towards the programme of the Congress. A big assembly like the Congrees is, no doubt, a cause of alarm when the spread of the plague in sister provinces is excessive and wide in extent. The prime duty at present is to secure immunity from the plague. The Resident has issued a series of stringent measures for the adoption of local authorities. Mr. Bullock is immensely diligent in watching the safety of public life, but he is very obliging in proposing no strong measures in connection with the Congress. He continues with a firm resolve not to interfere with the sessions of the Congress. To all practical intents he seems to be willing to help it on, if no necessities on account of the plague constrain him in his steady and liberal policy. We are thankful to him for his direct control over the sanitary arrangments of the Congress. Our misgivings of the last week have rather been dispelled and we can confidently declare that God willing, we shall behold the 13th national Congress held at Amraoti in the next Christmas. Even to a casual looker-on it will be evident that the Local Government have well decided the problem at such a critical time. They are fully alive to the difficult situation in regard to public health and they are as well aware of the magnitude and importance of allowing the Congress to be held in the province. Thus Mr. Bullock minimses neither the importance of the public health nor the greatness of a national assembly.

---

The moral of the prosecutions of the native journalists for attempts at disloyalty is of great consequence for their future guidance. The liberal flow of public sentiments will come to a dead-lock and henceforth writings in news—papers will either contain praises in honour of the rulers or will contain substantially things worth nothing. In the stronghold of the proverbial Indian loyalty no talk of dis—affection has any meaning to sane minds. Such a control over the effusion of the people's minds, as the Government will secure through the powerful exercise of the Penal Code will be of no avail to check the least tinge of disloyalty if it be rankling in the public mind No law of sedition has ever kept people loyal and devoted to the throne. It is the inner spring of man's mind that gives birth to such worthy feelings of loyalty and devo—tion. When the Government continues to be benevolent, people rise in gratefulness to offer their worship of heart. For a complete mastery of the meaning of dis-affection we summarise it below from the judgments of the learned Full Bench of the Bombay High Court in the case of the Pratoda Appeal:—

"The noun "disaffection" is defined as "absence or alienation of kindly feeling—dislike—hostility." *Specially.* "Political alienation or discontent, a spirit of disloyalty to the Government or existing authority."

In this last sense it is, I think, employed in the main portion of the section we are considering. An attempt to excite feelings of discontent to the Government is thus equivalent to an attempt to produce political hatred of Government as established by law, to excite political discontent and alieniate the people from their allegience.

Turning to the explanation, we find that disapprobation of the measures of Government is not disaffection provided that it is of such a nature as to be compatible with a disposition to obey Government and to support its lawful authority against attempts to resist or subvert it. The meaning of that passage appears to me to be that a loyal subject who disapproves Government measures is not to be deemed disloyal or disaffected on that account if, notwithstanding, his disapprobation of such measures, he is ready to obey and support Government. If he is at heart loyal he is not disaffected, merely because he disapprobates certain measures of Government. The converse proposition does not appear to me to be true or deducible from the explanation, namely, that a subject who is ready to obey Government and support its lawful authority is necessarily loyal or well affected. He may be a rebel at heart though for the time being prepared to obey and support Government. The distinction is doubtless fine, but I think it exists, and it consequently follows that the publication of a libel exciting to disaffection against Government itself—the constitution established by law—may be an offence, though the libel may insist upon the desirability or expediency of obeying and supporting Government. The ordinary meaning of the term disaffection in the main portion of the section is not, I think, varied by the explanation."

We shall do our best to discharge the true duty of a loyal journalist and to make people more devoted to the British throne but we confess to our extreme inability to understand the exact province of a right criticism of the Go—vernment policy as distinguished from that of disaffection. One would be rightly mistaken in appreciating the linear divisions between lawful criticism and disaffection. The broad gauge of common sense and sincere loyalty will fail to help on an honest journalist when the rigours of the penal Code will begin to play an active part in the concerns of daily life.

---

## वऱ्हाड

हवामान—यंदी चांगली कडाक्याची पडूं लागली आहे सार्वजनिक आरोग्य समाधानकारक असून पीकाच्या दर्शनानें लोकही दुष्काळ विसरून आनंदित आहेत. बाजारभावही उतरत आहेत.

मे. मीडो साहेब डिपुटी कमिशनर यांची स्वारी आकोले जिल्ह्यांत फिरत असून त्यांचे पुढील आठवड्याचे मुक्काम येणें प्रमाणें आहेतः——

| तारिख | मुक्कामाचा गांव |
|---|---|
| २९ नावेम्बर | कुरणखेड. |
| ३० " | बोरगांव मंजू. |
| १ दिसेंबर | आखतवाडा. |
| २ | दोनवड |
| ३।४ | सांगवी खुर्द. |
| ५ | कांचनपूर |
| ६ | मोरगांव |
| ७ | बोरगांव |

येथील श्रीमान साहू रा. रा. बिहारीलाल भगुलाल यांजवर सिव्हील जज्ज साहेबांच्या कोर्टांत साक्षीदार या नात्यानें खोटी जबानी दिल्या बद्दल आरोप होता. त्या आरोपाची चौकशी अगदीं बारकाईची व कसोशीची करून मे. मिडो साहेब यांनीं त्यास दोषमुक्त केलें हें कळविण्यास आनंद वाटतो.

आह्मास लिहिण्यास अत्यंत दुःख वाटतें कीं रा. रा. कृष्णराव हरी कोल्हटकर एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर यांस रविवारीं पहाटेस अर्धांग वायूच्या विकृतीनें देवाज्ञा झाली. राजश्री दाजी साहेब हे अलीकडे बरेच महिने आजारी होते पण मध्यंतरीं प्रकृती बरी झाली व त्या नंतर पक्षवाताचा आजार उलटला आणि आमच्या वऱ्हाडांतील एक सद्गृहस्थ पेनशनीच्या समयाला मृत्युमुखीं पडला. हे स्वभावानें फार गोड व परोपकारी असत. यांच्या सारखे जुने, अनुभवी व प्रेमळ अधिकारी थोडेच आढळतील. ईश्वरास जें आवडलें त्याला सादर होऊन त्यांचे बंधु राजश्री वामनरावजी आदिकरून सर्व आप्तमित्रांनीं मनाचें सांतवन केलें पाहिजे.

---

### नोटीस

सखाराम बल्लद उकर्डा माळी राहणार अकोट यांस खालीं सही करणार यानकडून नोटीस देण्यांत येते कीं जिनिंगचे हिस्सा बद्दल नफ्याचे संबंधानें आह्मास बरेच वेळां हिशोब मागितला असता दिला नाहीं असें तुह्मी तारीख १२।११।९७ चे नोटीसींत ह्मणता हें ह्मणणें तुमचें खरें नाहीं. हिशोब पाहून घेण्या बद्दल वारंवार तुह्मास सुचना करीत गेलो असता तिकडे तुह्मी दुर्लक्ष केलें. अखेरीस आह्मी रजिष्टर करून पोष्टातून तुह्मास नोटीसही दिली होती ती पावल्या बद्दल तुमची सही आहे.

प्रथम हिस्सा आह्मी द्यावा अशाबद्दल तुह्मी आह्मास मुळींच विचारले नाहीं. विचारलें होतें हें तुमचें ह्मणणें लबाडीचें आहे.

रुपये ९८०० स लाधुरामजी यांस आमचे संमती वांचून हिस्सा देण्याचे तुह्मी ठरविले असून ८००० हजारास विकला असें आह्मास खोटेच सांगत आहा ही गोष्ट साबीत करण्या इतका बळकट पुरावा आमचे पाशीं आहे.

किती रुपयास हिस्सा घेण्याचे ठरले असें ज्या वेळीं लाधूरामजी सेट यांना विचारण्या करितां आमचे मुखत्यार नारायणराव यांस आह्मी पाठविले त्यावेळीं लाधुरामजी यानीं खरी हकीकत सांगितली कीं ९८०० रुपयास हिस्सा घेतला असून केवळ सखाराम माळी याचे ह्मणण्यावरून दस्ताऐवज मात्र ८००० हजार रुपयाचा होणार आहे. प्रतीज्ञेवर जेव्हां कोर्टांत जबाब देण्याची वेळ येईल तेव्हां लाधुरामजी काय बोलतील ते पाहू.

आमची तारीख १४।१०।९७ ची नोटीस तुह्मास पावल्यावर तुह्मीही चांगल्या संभावित गृहस्था समक्ष कबूल केलें कीं ८००० हजार रुपयाचा दस्तऐवज खरा नाहीं. मारुती नाईक हे घेत असल्यास ९८०० रुपयास त्याना मी देतों ही गोष्ट आह्मास समजल्यावर आह्मी तुह्मास भेटलो व तुह्मी ९८०० रुपये घेण्याचे कबूल केले आणि झालेला लाधुरामजीचा दस्ताऐवज वांपस आणला असें असता हल्लीं तुह्मी ह्मणता कीं ८००० रुपयांस हिस्सा घ्यावा.

यास्तव तुह्मी स्पष्टपणें कळविलें जातें कीं ९८०० रुपये घेऊन तुह्मी आपला हिस्सा आह्मास खरिदी करून द्यावा. असें न केल्यास पुढें सरकार दरबार होऊन जे होण्याचें तें होईल हें मात्र पक्के लक्षांत ठेवावे.

तारीख २६।११।९७ इसवी.

सही

मारुती नाईक भासाकार अकोट
जिंनिंग फ्याक्टरीचे एजंट
तर्फे प्रल्हाद नारायण
जोग वकील

---

## वर्तमानसार.

एकानें पोहणाऱ्याकरितां हातमोजे तयार केलें आहेत. ह्यांत बोटांच्यामध्यें जाळी करून बदकाच्या पंजा प्रमाणें ते हातमोज्यांचें पंजे बोटाशीं बोट गुंतवलेले किंवा गुंफलेले असतात. तेणेंकरून बदकाप्रमाणें पोहणारांस मदत होते.

लॉर्ड रे साहेब यांनीं कोल्स्टन येथील मेजवानीच्या प्रसंगीं भाषण करितांना सांगितलें कीं, हिंदुस्थानच्या सरहद्दीचे प्रश्नाचा निकाल होम गव्हर्मेंटकडूनच झाला पाहिजे. लॉर्ड एल्गिनकडून होतां उपयोगी नाहीं.

जर्मनींतल्या आगगाड्यावरील एंजिन् ड्रायव्हरांच्या १० वर्षांच्या बिनधोक व निरपघात नौकरीबद्दल जर्मनसरकारकडून प्रत्येकांस सोन्याचें पदक आणि १०० पौंड रोख येणें प्रमाणें बक्षीस मिळतें.

समुद्राच्या कांठीं असलेल्या किंवा समुद्रांत टाकलेल्या तारायंत्राच्या तारा ४०वर्षे टिकतात. परंतु मोठमोठ्या कारखान्यांच्या शहरांतल्या तारा दहा वर्षे टिकतात असा अनुभव पाहिला आहे

न्यूयार्क शहरची वस्ती ३० लाख असून, लंडनच्या खालोंखाल हें शहर असल्यामुळें जगांत लंडनशिवाय त्याच्यासारखें सुखी, सुव्यस्थित आणि आबाद शहर दुसरें कोणतेंही नाहीं, अशी आख्या आहे.

सींत्कारकारी मत्स्य.—फिजी बेटांच्या जवळ ईल जातीचे विलक्षण मत्स्य सांपडलें आहेत. ह्या मत्स्याच्या कंठाची रचना चमत्कारिक असून, तो जेव्हां रागावतो तेव्हां ह्या कंठांतून मोठमोठ्यानें शीळ वाजवतो. हा मासा १९ फुटीवर लांब आणि अनेक इंच रुंद असतो.

लंडनशहरांत १४००० पोलिस असून प्यारिस व न्यूयॉर्क या शहरांत अनुक्रमें ६००० व ३८०० आहेत. न्यूयॉर्क शहरांत दरसाल ८५००, प्यारीसमध्यें लाख आणि लंडनमध्यें १॥ लाख अपराधी पोलिसाकडून पकडले जातात, अशी सरासरी निघाली आहे.

नारिंगाचा रस काळ्या बुटांना चकचकी आणणारा फार वस्ताद आहे, बूट मळकट झाला ह्मणजे नारिंगाची एक पाकळी घेऊन ती त्यावर चोहोंकडे घांसावी. आणि मग त्या बुटावरून मऊ ब्रशानें खूप चोळावें ह्मणजे बूट अगदीं नवीन दिसून आरशासारखा चकाकतो.

सर चार्ल्स डिल्के यांनीं ता० १२ नोव्हेंबर रोजीं लंडनच्या फेबियस सोसायटीपुढें भाषण करितांना हिंदुस्थानच्या संबंधानें असें कळविलें कीं तेथील जमाखर्चाच्या पद्धतींत कांहीं तरी चांगलीच उलथापालथ होऊन सुधारणा होण्याची आवश्यकता वाटूं लागली आहे. यांच्या तोंडांत साखर पडो !

जमिनीच्या आश्रयानें राहणारे वेस्टइंडीज बेटांतले खेकडे प्रतिवर्षी एके दिवशीं लाखों मिळून नियमित रांगेनें जमून समुद्राकडे जातात. आणि समुद्रांतल्या बेली आपल्या पाठीवर बांधून घेऊन समुद्रांत राहतात. तेथें त्यांची वीण होते. सर्व खेकडे मोठ्या ऐक्यानें राहतात हा ह्यांचा नियमीत क्रम आश्चर्यावह आहे ह्यांत संशय नाहीं.

लंडन व प्यारिस येथील मोठमोठ्या पथिकाश्रमांत ( हाटेलांत ) आगींतून बचावण्याच्या नवीन योजना करण्यांत आल्या आहेत. मोठमोठ्या गाद्यांच्या लोखंडी खुर्च्या ह्या हॉटेलांत ठेवल्या असून ह्या खुर्च्यांना गाद्यांखालीं एकेक पेटी ठेविली असते व त्या पेटींत एकेक दोऱ्यांची शिडी ठेविली असते. आगीच्या प्रसंगीं ही खुर्ची हॉटेलाचे इमारतीच्या खिडकीच्या बाहेर टांगून तिला ती शिडी अडकाविली ह्मणजे खालीं उतरून जाण्यास उत्तम मार्ग होतो, आणि आगींत सांपडलेल्या लोकांचा तत्काळ व सहज बचाव होतो. ज्ञा० च०

झडकिलचे भाविष्य— आंग्लज्योतिषी प्रसिद्ध झडकिल साहेब यांणीं सन १८९८ सालही कष्टदायकच होणार असें वर्तविलें आहे. ते ह्मणतात कीं—येते वर्षी जगभर घोटाळे माजतील, एप्रील १८९८ हा महिना फार गडबडीचा जाणार. त्या महिन्यांत युनैटेडस्टेट ( अमेरिका ) आणि कानडा प्रांत याचे खडाष्टक येऊन शांततेचा भंग होईल. आक्टोबर महिन्यांत पराज्याबरोबरील संबंधांत विरोध येऊन इजिप्तांत किंवा सौदन प्रांतांत कटकट होईल; शिवाय हिंदुस्थानच्या सरहद्दीवर जास्त युद्ध होईल. १८९८ त चांगलें ह्मणून जे काय होईल, तें पोष्ट आफिसांत उपयुक्त सुधारणा होईल हेंच. ह्या सालीं सत्ताधीश राजास ग्रहानुकूलता नाहीं. स्वीडनच्या राजाचा देहांत होण्याचा योग आहे. त्या प्रमाणेंच रशियाचे झाराची प्रकृती फार भीतिदायक होऊन जर्मनीचे बादशहासही कांहीं तरी अपघात होईल असें झडकील साहेब ह्मणतात. हिंदुस्थानच्या पैशाची रांगोळी उडविणारे सरहद्दीवरील युद्धकांड लौकर आटपेल असें आह्मास वाटत होतें. परंतु आक्टोबर १८९८ पर्यंत त्याचें सुताडें झडकिल बुवांनीं नेऊन पोंचाविलेंच आहे ! !

गाईला वाघ झाला—रत्नागिरी तालुक्यांत वणके तेथें मुळ्ये यांजकडे परवां एका गाईला वासरूं झालें, तें अगदीं वाघासारखें असून अजून जिवंत आहे. पाहणार लोकांस त्याची फार भीति वाटते असें तेथील एक गृहस्थ कळवितात.

एवरेस्टवर चढण्याचा प्रयत्न—'म्यांचेस्टर गार्डियन' मध्यें असें प्रसिद्ध झालें आहे कीं लवकरच हिमालय पर्वतावरील एवरेस्ट शिखरावर चढून जाऊन तेथील देखावा पहाण्याच्या उद्देशानें विलायतेहून कांहीं लोक हिंदुस्थानांत येणार आहेत. हिमालयावरील अतिशय उंच भाग ह्मटला ह्मणजे एवरेस्ट हाच असून याची उंची २९,००० फूट आहे. आजपर्यंत मनुष्य अतिशय उंच ह्मणजे २४,००० फूट गेला आहे व हा प्रयोग गेल्या जानेवारी महिन्यांत साउथ अमेरिकेतील आकोनकगस नावाच्या पर्वतावर करण्यांत आला. हिमालयावर आजपर्यंत जे लोक चढले आहेत ते २१,००० फूटापर्यंतच चढले आहेत. या शिखरावर चढण्याचा प्रयत्न सफळ झाल्यास बऱ्याच नव्या गोष्टींचा शोध लागणार आहे. अ०

फरीदकोटचे महाराज फार आजारी असल्याचें समजतें.

मालवण तालुक्यांपैकीं आचरे गांवीं रांगोळीची खाण सापडली आहे.

टोळधाडीच्या भीतिमुळें नाशिक जिल्ह्यांतील पिकें कापण्याचा हुकूम झाला आहे.

कराचीस कापड वगैरे सामान रेलवेनें नेआण करूं नये असा हुकूम झाला आहे.

स्कूल फायनलची परीक्षा तारीख ६ दिसेंबर रोजीं मुंबई, कराची, बेळगांव व अमदाबाद येथें सुरू होणार.

हल्लीं जसें उतारू लोकास जागोजाग क्वारंटाईन मध्यें ठेवण्यांत येतें त्याचप्रमाणें सामानसुमानही क्वारंटाईन मध्यें ठेवण्याचें ठरलें आहे. स० वि०

मथुरेच्या लायब्ररींत वानरांस नौकर ठेविले आहे. दोघे वानर आहेत ते वाचणारांस पाहिजे असेल तें वर्तमान पत्र मागावे ह्मणजे लागलीच आणून देतात.

विलायतेस एका शिकारी मनुष्याजवळ ४ कुत्रे असून त्याणें त्या कुत्र्यांना तंबाखू ओढण्यास शिकविलें आहे. त्यांना आतां तलफ आणि वेळेला तंबाखू न मिळाली तर तीं कावरी बावरी होऊन फार त्रास देतात.

कांहीं महिन्यांपूर्वी फ्रान्स देशांत डाक नेणाऱ्या पक्ष्यांची शर्यत झाली. त्यांत एक पक्षी ३ तास ३४ मिनिटांत ३१० मैल उडून गेला.

इटालींतील एका बड्या गृहस्थाजवळ एक घोडा आहे, त्याची उंची सारी पावणे दोन फूट आहे. हा घोडा अगदीं कुत्र्यासारखा दिसतो. न्या० सु०

मुंबई इलाख्याची प्लेग मृत्युसंख्या.

१२ नोवेंबर पर्यंतच्या आठवड्यांत मुंबई इलाख्यांत कोणत्या ठिकाणीं किती लागले व किती मेले त्याचा तपशील पुढील प्रमाणें आहे:—

| ठिकाण | लागले | मेले |
|---|---|---|
| मुंबई शहर | ७७ | ६० |
| पुणे शहर | ५१२ | ३९३ |
| सुरत | ३०९ | १९३ |
| ठाणे | ५ | २ |
| अमदाबाद | ३९ | २८ |
| नाशीक | ४७ | ३५ |
| पुणे | १६९ | ११८ |
| सातारा | ९१५ | ७७६ |
| सोलापूर | १४५ | ११९ |
| कुलाबा | १३ | ७ |
| बेळगांव | १८ | १५ |
| बडोदें | १ | ० |
| कच्छ | १११ | ७७ |
| जंजिरा | ४ | ३ |
| पालनपूर | २५ | ३ |
| कराची | १९ | १६ |
| एकूण | लागले २३०६ | मेले ११२६ |
| | यापूर्वी मेलेले | ४३,६८७ |
| | मिळून आजपर्यंत मेले ते | ४५,९१३ |

महाबळेश्वराचें प्लेगपासून रक्षण करण्यास नवे नियम करून प्रसिद्ध केले आहेत.

सोलापुरास प्लेगचा आजार फार आहे. गुदस्ता ज्या आठवड्यात सोलापुरास ४१ माणसें मेलीं त्याच आठवड्यांत यंदा १६५ मेलीं!

गोव्यास नाकेबंदी झाली असून, ज्यांस अडकविलें जाईल त्याच्या अन्नवस्त्राची जबाबदारी गोवे अधिकाऱ्यांकडे नाहीं असें प्रसिद्ध झालें आहे.

दक्षण महाराष्ट्रातला प्लेगचा आजार कमी न होतां वाढत चालला आहे. औंध संस्थानांत सुरूं झाला. शाळा वगैरे बंद झाल्या. आळंदीची यात्रा बंद केली.

रोगास पुण्याच्या छावणींतून काढण्याचे उपाय चालूं झाले आहेत.

प्लेगरोगनाशक मंडळ्या नेमून त्यांणीं प्लेग प्रांतांत फिरत राहून रोगाचा नाश करण्याकरतां झटावें असें करण्याचे विचार चालू झाले. तसें झालें ह्मणजे जमाबंदी कलेक्टर प्रमाणें हे रोगनाशक कलेक्टर होतील.

मुंबईस क्वारन्टाइन बसलें. ६,००० लोकांस राहण्या सारखी जागा केली आहे. पहिल्याच दिवशीं हजार पंधरशें लोकांस क्वारन्टाईनमध्यें घातलें. हल्लीं वरून येणाऱ्या गाड्या कल्याणास उभ्या करतात प्लेग प्रांतांतून आलेल्या उतारूंस वेगळाल्या डब्यांत घालून बंद करतात आणि ते डबे क्वारन्टाइनच्या जागीं सोडून लोकांस कोंडून टाकतात अशी व्यवस्था चालूं आहे.

धारवाड, सातारा व मनमाड येथें प्लेगकरतां नाकेबंदी झाली आहे. मनमाडच्या पुढें जाणाऱ्या सर्व थर्डक्लास उतारूंस व त्याच्या सामानास शुद्धी करणाऱ्या तीर्थानें स्नान मिळणार.

पुण्याचा प्लेग कमी न होतां वाढतच चालला आहे. बहुतेक शहर ओसाड पडलें असून लोकांनीं शहर सोडून रानावनांत जावें ह्मणून अधिकाऱ्यांकडूनही सूचना होऊं लागल्या आहेत लोक अगदीं हवालदील झाले असून कोणत्यावेळीं कोणावर धाड येईल याचा नेम नाहीं अशी लोकांस भीति पडली आहे घरें सोडून बाहेर गेलेल्यास माल मिळकतीचीही काळजी लागली आहे काय होणार कोण जाणे.

अमिराचा इंजनर पिनसाहेब इतक्यांत हिंदुस्थानांत येणार आहे.

सरहद्दीवरचे कित्येक लोक तंटा करण्याचे सोडून आमच्या सरकारच्या स्वाधीन होत आहेत.

कित्येक लोक मोठाले जमाव करून आमच्याशी झगडण्याचा विचार करीत आहेत

गवत व सामान सुमान आणण्यास बाहेर जाणाऱ्या आमच्या लोकांस हरकत होण्याचें बंद झाले आहे.

सारणसूर येथें एक झगडा होऊन त्यांत शत्रूचे ५० मेले व ८० जखमी झाले.

ले. कामरन थोडे जखमी झाले. ओराकझे तहास आले, पण अझून शर्ती ठरल्या नाहींत. टा० अ०

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवाशी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.